
# श्री साईलीला



[न]ोव्हेंबर १९७९ ]     दिवाळी विशेषांक     [ किंमत १-२५ पैसे

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

रा की भगीरथ उद्योग ।
केना प्रारब्ध कर्मभोग ।
स्य भावित्वाचा योग ।
याचा वियोग अशक्य ॥ १०४ ॥

जैसे ये दुःख अवांछित ।
सुखही तैसेंच अकल्पित ।
देह प्रारब्धाची ही गत ।
आधींच अवगत संतांस ॥ १०५ ॥

खंड तत्समावर्तन ।
चि आम्हां व्रत तपदान ।
ळोवेळीं शिरडी–प्रयाण ।
चि तीर्थाटण आमुचें ॥ १०६ ॥

'साई साई' ति नामस्मरण ।
याच मंत्राचें अनुष्ठान ।
हेंच ध्यान पुरश्चरण ।
अनन्य शरण या जावें ॥ १०७ ॥

निष्कपट प्रेमानुसंधान ।
हुकेंच खरें तयाचें पूजन ।
गा अंतरी घ्या अनुभवून ।
नतर्क्य विंदान तयाचें ॥ १०८ ॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ३७ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८वे ] नोव्हें.-डिसें. १९७९ [ अं. ८-९

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका – दिवाळी अंक १९७९

## दिवाळी अंकाचे साईभक्त मानकरी

१) डॉ. श्री. दि. परचुरे
२) श्री. आर. एस. चिटणीस
३) श्री. चकोर आजगावकर
४) सौ. प्रमिला नाईक
५) प्रा. र. श्री. पुजारी
६) सौ. श्री शहाणे
७) प्रा. गुंडेराव पटवारी
८) श्री. गणपतराव गो. सामंत
९) सौ. धनवंती राठोड
१०) श्री. संभाजी सावंत
११) सौ. विमल चव्हाण
१२) श्री. मंगलकुमार जोशी
१३) सौ. मालतीबाई कौलगेकर
१४) श्री. सुरेश सातपुते
१५) सौ. सुनंदा कोकाटे
१६) श्री. डी. आर. खडके
१७) डॉ. सुमती खानविलकर
१८) श्री. नागोराव जाधव
१९) श्रीमती सरस्वती पालके
२०) सरदारसिंग परिहार
२१) सौ. अहिल्या उपरकर
२२) विजय निरखे
२३) सौ. सुलोचना जोशी
२४) एक साईभक्त
२५) सौ. अपर्णादेवी साळोखे
२६) श्री. प्रकाश कर्पे
२७) सौ. सिंधू मुळीक
२८) श्री. दीपक सावंत
२९) सुभाष वैद्य
३०) श्री. सूर्यकांत गर्जे
३१) श्री. अनिल रसाळ
३२) सौ. अस्मिता दांडेकर
३३) श्री. सदाशिव स्वार
३४) श्री. डी. बी. जगतूपुरीया
३५) श्री. मारुती कळसे
३६) श्री. पांडुरंग रामा भाटीकर
३७) कु. लता अनंत चितांबर
३८) कु. रमा व्यंकटराव मुळे
३९) श्री. दिगंबर गंधे
४०) श्री. लीलाताई गोलतकर
४१) श्री. विजय हजारे
४२) श्री. सौ. निशा चिपकर
४३) श्री. बी. एस. जोशी

# ॐ श्रीसाई



सर्वेऽपि सुखिनः सन्तु
सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चित् दुःखमाप्नुयात्

**May All Be Happy**
**May All Be Healthy**
**May All See the Good**
**May No one Suffer**

# संपादकीय –

स. न. वि. वि.

संत चूडामणी भगवान श्रीसाईबाबांच्या साठाव्या व एकसष्टाव्या पुण्यतिथी निमित्य आम्ही एकंदर तेरा खास अंक काढण्याची योजना सुमारे दिड वर्षापूर्वी जाहिर केली व ती श्रीबाबांच्या साठाव्या पुण्यतिथीपासून अंमलातही आणली; व ही योजना या दिवाळी अंकानें आम्ही ती पूर्ण करीत आहोत. आम्ही योजलेल्या तेरा खास अंकांपैकी एकंदर, १२ खास अंक आम्ही साईभक्त वाचकांच्या हाती देऊ शकलो हे समाधान. प्रांतोप्रांतीचे साईबाबा, हा अंक आम्ही प्रकाशित करू शकलो नाही. कारण या विषयावरची लेखन सामुग्री जशी पाहिजे तशी आमचेकडे आली नाही. धडपड करून ती तशी सुयोग्य जमविणेही शक्य झाले नाही. पण पुढे याच विषयावरचा खास अंक साईभक्त वाचकांचे हाती देण्याचा आमचा विचार कायम आहे. श्रीसाईबाबांनी हे बारा अंक यशस्वीपणे प्रकाशित करण्याचे बाबतीत आम्हाला संपूर्णपणे सहाय्य केले त्याबद्दल बाबांचे आम्ही सदैव ऋणी आहोत.

श्रीसाईलीलेचा वाचकवर्ग दरदिवशी वाढत आहे. अंकांची मागणी तर वाढलीच आहे. नवनवीन वर्गणीदार रोजच्या रोज नोंदले जात आहेत. परंतु ठराविक विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे आम्ही अंकच छापू शकत नाही. देशात कागदाचा भयंकर तुटवडा निर्माण झाला आहे. आगामी निवडणूकांसाठीही कागदाची टंचाई भासत आहे. अशा परिस्थितीत आम्ही सापडलो असल्याने आमचेकडे मागील अंकही शिल्लक अजिबात नाहीत. आमचा अंक ठिकठिकाणच्या वाचकांना योग्य-वेळी रितसर पोस्टाने रवाना होतो, पण वाचकांना अंक न मिळाल्याच्या तक्रारी इतक्या येऊ लागल्या आहेत की याबाबतीत आता काय करावे हेच समजत नाही. पण याही परिस्थितीला टक्कर देऊन आम्ही अंक दरमहा प्रकाशित करीत आहोत व ते लौकरात लौकर जास्तीत जास्त वाचकांच्या हाती कसे पोचतील याबद्दल प्रयत्नशील आहोत.

श्रीसाईलीलेचा हा सुंदर दिवाळी अंक ऐन दिवाळीत वाचकांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. भक्तांना बाबांच्या आलेल्या ताज्या अनुभवांनी भरगच असा हा अंक आहे. यंदा भक्तांनी तर आमचेवर अनुभवांचा वर्षाव केला.

त्यातून निवडलेले ४३ अनुभव दिपावली भेटी दाखल या अंकातून आपल्यापुढे ठेवीत आहोत.

श्रीसाईलीलेचा हा जोड अंक नव्हेंबर डिसेंबरचा असल्याने वेगळा डिसेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही याची वाचकांनी नोंद घ्यावी. पुढील अंक १ जानेवारी १९८०


नागपूर-विदर्भातील साईभक्तांस सुवर्ण संधी

सार्वजनिक-धार्मिक संस्थांस खास सवलत

"श्री साईबाबा संस्थान शिरडी" च्या सौजन्याने



श्री साईबाबांचे

तेजस्वी जीवन रंगभूमीवर

कुमारसेन गुप्ते

साईभक्तांसह सादर करीत आहेत

"आरती थिएटर्स" (मुंबई) निर्मित

शिरडीचे श्री साईबाबा

लेखक/दिग्दर्शक : किरण दुधाळकर • नेपथ्य : दत्ता चौडणकर

• निर्माता/संगीत : कुमारसेन गुप्ते

• डिसेंबर १ ते ७ नागपूर-विदर्भ दौरा •

संपर्क :-कुमारसेन गुप्ते, १४, पितांबर लेन, माहीम मुंबई १६. फोन : ४५६५४१

# श्रीसाईबाबांच्या वचनाची प्रचीती

डॉ. श्री. दि. परचुरे एम्. ए. पीएच. डी.
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला (इंग्रजी आवृत्ति)

● श्रीसाईबाबांची अनेक वचने श्रीसाईसच्चरितात ठिकठिकाणी विखुरलेली आहेत आणि त्यांचा प्रत्यय वेळोवेळी श्रीसाईभक्तांना येत असतो, हे प्रस्तुत मासिकात वेळोवेळी प्रसिद्ध होत असलेल्या भक्तांच्या अनुभवावरून आपणाला विदीत आहेच. तशाच प्रकारचा श्रीसाईंच्या एका वचनाचा प्रत्यय मला आला.

श्रीसाईसच्चरिताच्या अठ्ठाविसाव्या अध्यायात पुढील दोन ओव्या आपणास सापडतात.

> "माझा माणूस देशावर। असो कां हजारों कोस दूर।
> आणीन जैसे चिडीचे पोर। बांधून दोर पायास" ॥ १५ ॥
> ऐसे बाबा कितीदां वदले। जना लोकाही बहुती ऐकिले।
> अनुभवाही तैसेच आले। कथितो त्या लीलेस बाबांच्या ॥ १६ ॥

वरील दोन ओव्यामध्ये प्रथम श्रीसाईबाबांचे वचन दिले आहे ते असे, "माझा माणूस कोठल्याही देशात, हजारो कोस दूर असो; परंतु ज्याप्रमाणे चिमणीच्या पिल्लाच्या पायाला दोर बांधून त्याला खेचून घ्यावे त्याप्रमाणे मी माझ्या भक्ताला माझ्याकडे खेचून आणीन" पंधराव्या ओवीत श्रीबाबांचे वरील वचन उधृत करून सोळाव्या ओवीत श्रीहेमाडपंत सांगतात की, वरीलप्रमाणे बाबा कितींदातरी बोलले. ते पुष्कळ लोकांनी ऐकलेले आहे आणि तसेच पुष्कळांच्या अनुभवालाही आलेले आहे.

माझाही अनुभव तसाच आहे. साईभक्तांच्या समवेत बसण्यास जोपर्यंत तुम्ही योग्य नसता तोपर्यंत साईबाबा तुम्हाला त्यात खेचीत नाहीत; पण ज्यावेळी त्यांच्या मनात येते त्यावेळी ते तुम्हाला सरळ खेचून आणतात. श्रीसाईलीला मासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक कै. प्रा. द. दि. परचुरे हे माझे ज्येष्ठ बंधु. मी इतर मासिकात लेख लिहितो हे त्यांना माहीत असल्यामुळे, साईलीला मासिकासाठी मी काहीतरी लिहावे असे त्यांनी मला सांगितले होते; पण अध्यात्मिक लेखन आपणाला जमेल की नाही ह्या न्यूनगंडामुळे मी साईलीला मासिकासाठी काहीच लेखन केले

नाही. पुढे एक जून १९७३ ला प्रा. द. दि. परचुरे ह्यांना हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांचा दुःखद अंत झाला आणि त्यावेळचे कोर्टरिसीव्हर रा. का. श्री. पाठक यांना श्रीसाईबाबांचा आदेश आला की मला खेचून आण. त्याप्रमाणे श्री. पाठक यांनी मला बोलावून घेऊन, सरळ कार्यकारी संपादक म्हणूनच माझी नियुक्ती करून टाकली! अशा प्रकारे श्रीबाबांची माहिती असूनही बरेच वर्षे दूर राहिलेल्या मला माझ्या वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी श्रीसाईबाबांनी पायात दोर बांधून स्वतःकडे चिमणीच्या पोराप्रमाणे खेचून आणले.

मे १९७८ मध्येही असाच एक प्रसंग घडला. गेलीकाही वर्षे साईलीला मासिकाच्या लेखक कवींचे संमेलन शिर्डीस प्रतिवर्षी भरत असते. त्याप्रमाणे मार्च १९७८ मध्ये जे संमेलन भरले होते, त्यासाठी बंगलोर येथील पूज्य राधाकृष्ण स्वामीजी उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून दक्षिण भारतात साईभक्तीचा धूमधडाक्याने प्रचार करण्याचे महनीय कार्य पूज्य नरसिंह स्वामींनी केले व अखिल भारतीय साई समाजाची स्थापना मद्रास येथे केली. पूज्य राधाकृष्णस्वामी हे नरसिंहस्वामींचे पट्ट शिष्य व अखिल भारतीय साईसमाजाचे सध्याचे अध्यक्ष. त्यांनी बंगलोर येथे साई स्पिरीच्युअल सेंटर स्थापन केला व त्याच्या स्थापनेला १९७८ मध्ये पंचवीस वर्षे पूर्ण होत होती. म्हणून दि. १०-५-७८ ला अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर साईबाबांच्या सहा फूट उंचीच्या संगमरवरी पुतळयाची स्थापना तेथे करण्याचे स्वामीजींनी ठरविले होते व त्याचे जाहीर निमंत्रण त्यांनी सर्व साईभक्तांना शिरडीच्या वर निर्देशिलेल्या संमेलनात दिले. तसेच साईलीला मासिकाचा कार्यकारी संपादक म्हणून मला वैयक्तिकरित्याहि आमंत्रण दिले होते.

पूज्य राधाकृष्ण स्वामींच्या आग्रहाच्या आमंत्रणास अनुसरून आपण बंगलोरला जावे असे माझ्या मनात होते; पण भर मे महिन्याच्या गर्दीत बंगलोरला जायचे म्हणजे मार्चमध्येच किंवा एप्रिलमध्ये जागेचे आरक्षण (रिझर्वेशन) करणे आवश्यक होते आणि काही घरगुती अडचणीमुळे ते राहून गेले. म्हणून शेवटी माझे जाणे मी श्रींबाबांच्या इच्छेवर सोपवून दिले; पण बाबांची इच्छा काय होती ह्याचा अंदाज मला मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत येऊ शकला नाही. तीन मे १९७८ ला पूज्य स्वामीजींचे एक भक्त, मुंबईचे श्री. जी. आर. इनामदार, माझ्याकडे आले आणि मला सांगू लागले की बंगलोरला जाण्याची तयारी करा. तुमच्यासाठी एक तिकीट मिळते आहे. हे ऐकून मी अवाक झालो. बाबांच्या योजना कशा असतात हे आपणास शेवटपर्यंत कळत नाही; परंतु ज्याला आपल्याकडे खेचून न्यावयाचे त्याला मात्र ते आपल्याकडे व्यवस्थितपणे योग्य वेळी खेचून नेतात.

श्री. ठाणावाला म्हणून एक चार्टर्ड अकाउंटंट मुंबईला रहातात. ते राधाकृष्ण स्वामींचे शिष्य आहेत. श्री. इनामदार बंगलोर येथे जाणार असे ठरल्यावर श्री ठाणा-वाला ह्यांनी ही बंगलोरला जाण्याचे ठरविले होते व इनामदार पतिपत्नीबरोबर आपले स्वतःचे व आपल्या पत्नीचे तिकीट काढण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांची तिकीटे काढलेली होती; पण आयत्यावेळी ठाणावाल्यांच्या पत्नीचा बेत रद्द झाला बंगलोरला जाण्याचा. श्री. इनामदार यांना माझी बंगलोरला जाण्याची इच्छा होती हे माहीत असल्यामुळे त्यांनी लगेच त्या तिकीटावर मला चलण्याची विनंती केली आणि दिनांक ६–५–७८ ला रात्रीच्या गाडीने निघून आम्ही दिनांक ७–५–७८ ला रात्री आठला बंगलोरला पोचलो देखील !

एकदा एका भक्ताची जबाबदारी बाबांनी स्वीकारली म्हणजे ती शेवटपर्यंत कशी पार पाडायची ते साईबाबा फारच चांगल्या रीतीने जाणतात. वस्तुतः ज्या गाडीने आम्ही बोरीबंदरहून निघणार होतो ती गाडी ८–३० ला सुटणार होती. म्हणून त्या अदमासाने मी निघालो होतो दादरहून. रस्त्यात काही औषधे घ्यावयाची होती तेथे थोडा वेळ मोडला. नंतर दादर स्टेशनवर तिकिटासाठी थोडा वेळ मोडला असे करता करता जेमतेम रात्री आठ ची लोकल गाडी दादरला मला मिळाली आणि ती वेळेवर गेल्यास बोरीबंदरला ८–२० ला पोचेल व पुढील दहा मिनिटात आपण बंगलोरच्या गाडीत जाऊ असे मी ठरविले होते; पण मध्य रेल्वेच्या गाड्या इतक्या वक्तशीरपणे गेल्या तर त्या मध्य रेल्वेच्या गाड्या कसल्या ! ती गाडी नित्याप्रमाणे ठिकठिकाणी थांबत ८–३५ ला बोरीबंदरला पोचली. माझी छाती धडधडत होती. बहुधा बंगलोरची गाडी निघून गेली असावी अशा समजुतीने मी लोकलच्या प्लॅटफॉर्म वरून शूच्या बाजूला गेलो, पण भक्ताची सर्व काळजी बाबांना ! स्टेशनवर चौकशी करता कळले की ती गाडी लेट आहे व साडेआठच्या ऐवजी नऊला सुटणार आहे ! माझे तिकीट श्री इनामदार यांचेकडे होते म्हणून प्लॅटफॉर्मवरच्या त्या गर्दीत त्यांना मी लवकरच शोधून काढले व त्यांच्या आरक्षित जागेमुळे सुखाने बंगलोरचा प्रवास केला व तेथे होणाऱ्या साईबाबांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभास वेळेवर उपस्थित राहिलो. बंगलोरला पोचल्यावर स्वामीजींनी आमची व्यवस्था एकाद्या अत्यंत महत्वाच्या पाहुण्याप्रमाणे (V. I. P.) ठेवली होती. आहे की नाही श्रीसाईबाबांच्या म्हणण्याची प्रचीती ?

# श्रीसाईंची अतर्क्य लीला!!

—श्री. आर. एस. चिटणीस
अध्यक्ष, श्रीसाईभक्त समाज, नवी दिल्ली–३

● तो काळ सन १९७३ चा होता. मी माझ्या कुटुंबियांसह मोटरकारने दिल्लीहून श्रीक्षेत्र शिरडी येथे मध्यान्हानंतर दुपारी सुमारे १२–३० च्या सुमारास येऊन पोहोचलो. बाबांच्या दर्शनासाठी व पूजेसाठी समाधी मंदिराकडे जावयाचे असल्याने मी तडक आंघोळीच्या खोल्यांकडे हात-पाय-तोंड धुण्यासाठी गेलो. मी आंघोळीच्या खोल्यांपासून काही पावले अंतरावर असताना मला श्रीबाबांचे काही [illegible]र्थी भेटले व त्यांनी मला स्वतः होऊन सांगितले की आंघोळीच्या खोलीतील नळ बंद झाले असून पाण्याचा थेंबही मिळणे दुरापास्त आहे. थोडावेळ माझी मनस्थिती गोंधळली व स्वाभाविक मी विमनस्क झालो. नंतर मला सहजगत्या स्मरले की आपण संस्थानाचे रिसिव्हर साहेब किंवा श्री. बागवे साहेब यांच्याकडे जावे कारण त्यांचा व माझा चांगलाच परिचय होता. त्याप्रमाणे जाण्यासाठी मी मागे वळणार तोच एक चांगला पोषाख परिधान केलेली व्यक्ती मला माझ्याकडे येताना दिसली. त्या अज्ञात व्यक्तीच्या डोक्याभोवती मला एक कापडाचा तुकडा अथवा फडके गुंडाळलेले दिसले ती व्यक्ती मला मोहक, तरुण व आकर्षक चेहरा असलेली वाटली. डोळे तेजस्वी व अर्थसूचक वाटले. ती व्यक्ती माझ्यापाशी येताच तिचा चेहरा आकर्षक स्मिताने आगळाच तेजस्वी वाटू लागला. त्या व्यक्तीने मला कारुण्यमय शब्दांनी विचारले की तुला काय हवे आहे. मी म्हणालो की मी पाण्याच्या शोधार्थ येथे आलो होतो; परंतु पाण्याचा एक थेंबही मिळणे अशक्यप्राय झाले आहे. त्यावर त्या अज्ञात व्यक्तीने मला तिच्या पाठीमागून येण्यास सूचना केली, व मला जवळच असलेल्या आंघोळीच्या खोलीत एका नळाजवळ आणून सोडले. त्या नळाच्या तोटीमधून अमोघ पाण्याचा ओघ येताना पाहून मला निरामय आनंद झाला व अतीव समाधान वाटले. मी स्वच्छ हातपाय तोंड धुऊन बाहेर आलो. तर काय! मघाची ती व्यक्ती मला मुळीच दिसली नाही; ती अगोदरच निघून गेली होती.

नंतर मी पूजासाहित्य व प्रसाद घेऊन समाधी मंदीराकडे त्वरेने गेलो. समाधी मंदिराकडे गेल्यावर मला असे आढळून आले की श्रीसाईंच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तगणांच्या अफाट जमावाच्या शेवटी मी उभा होतो. ही सर्व असंख्य भक्तमंडळी

दर्शनासाठी रांकेने उभी होती. ते दृश्य पाहाताच प्रदीर्घ प्रवासाच्या श्रमांनी थकलेल्या माझ्या मनाचे व देहाचे धैर्य हरपल्यासारखे झाले व दीर्घकाळ थांबणे मला अशक्यप्राय वाटू लागले. दुसरा काही पर्याय नसल्याने मी अखेरला दैवावर हवाला ठेवून आपली पाळी येईतोपर्यंत थांबावयाचे ठरविले.

मी उभा असताना अचानक माझ्या प्रत्ययाला असे आले की कोणीतरी माझ्या हाताला धरून मला खेचत नेत आहे. मी पाहिले तो ती व्यक्ती दुसरी कोणी नसून अवघ्या थोड्याच वेळापूर्वी मला आंघोळीच्या खोल्यांजवळ भेटलेली तीच अज्ञात व्यक्ती होती. त्या अज्ञात व्यक्तीने मला एकमेकाना धक्के देत पुढे सरकत जाणाऱ्या भक्तवृंदाच्या अफाट गर्दीतून सरळ बाबांच्या समाधीपाशी नेऊन सोडले. समाधीकडे जाताना मला सारखी भीति वाटत होती की रांकेने पुढे सरकणारे भक्तगण रांकेमधून पुढे घुसणाऱ्या माझ्या सारख्या व्यक्तीला हरकत करतील; परंतु तसे काहीच घडले नाही ! एकाही भक्ताने डोके वर करून निषेधादाखल माझ्याकडे पाहिलेही नाही ! ! मी पूजासाहित्य व प्रसाद तेथील बसलेल्या पुजाऱ्याच्या हातात दिला व मी स्वतः समाधीपुढे नतमस्तक होऊन विनम्र भावाने प्रार्थना केली. प्रार्थना संपल्यानंतर माझ्यावर इतके उपकार करणाऱ्या त्या व्यक्तीचे कृतज्ञतेदाखल आभार मानावेत म्हणून मी मागे वळून त्या व्यक्तीला पाहू लागलो; परंतु ती अज्ञात व्यक्ती जितक्या अद्भूतगम्यरीत्या सहज माझ्यासमोर आली तशाच तऱ्हेने ती नाहिशी झाली होती. मी समाधी मंदिरातून बाहेर येऊन ती अज्ञात व्यक्ती कोठे दिसते काय म्हणून पाहाण्याचा प्रयत्न केला; परंतु माझा प्रयत्न निष्फळ ठरला. नंतर माझी मोटर जेथे उभी करण्यात आली होती तेथे आलो. मी तेथे माझ्या इतर कुटुंबियाना जवळच असलेल्या वृक्षाच्या छायेत बसलेले पाहिले.

मी त्यांना उद्वेगाच्या स्वरात म्हणालो की बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याचे सोडून तुम्हीं आपला वेळ येथे विनाकारण का दवडत आहात. मला ते सर्व एका सूरात म्हणाले, "अहो, कोठल्याही आंघोळीच्या खोलीत पाण्याचा लवलेश नाही, तेव्हा आम्ही करणार तरी काय ! " हे त्यांचे उत्तर ऐकून मी स्तिमितच झालो. मी त्यांना म्हणालो की एका आंघोळीच्या खोलीत हवे तेवढे पाणी आहे, तेथेच सुमारे २० मिनिटापूर्वी हात पाय तोंड धुतले. मी त्यांना निर्धारपूर्वक यशःप्राप्तीच्या आनंदाने आंघोळीच्या खोल्यांकडे घेऊन गेलो. मी काही वेळ इतस्ततः फिरलो. परंतु ज्या आंघोळीच्या खोलीत नळ धो धो वाहत होता ती आंघोळीची खोली मात्र दृष्टीस पडली नाही ! हा प्रकार पाहून मी दिग्मूढ चकित झालो. मी मग तेथून जाणाऱ्या


काही मंडळींना विचारले की मला सुमारे २० मिनिटापूर्वी ज्या खोलीत भरपूर पाणी मिळाले ती आंघोळीची खोली कुठे आहे. त्यांनी माझ्याकडे कीव केल्याच्या भावनेने कटाक्ष टाकून माझ्या डोक्यात काहीतरी विकृती झाली असावी! अशा आविर्भावात ते माझ्या कुटुंबियाना म्हणाले, "अहो, आम्हीच आतुरतेने गेला दीड तास पाणी येण्याची प्रतीक्षा करत आहोत!" त्याबरोबर क्षणार्धात माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला! ही सर्व केवळ साईंची लीला होती हे मला निमिषार्धात प्रत्ययाला आले; व मनःचक्षुपुढे आले की मला ज्या वेळी पाण्याची आवश्यकता लागली तेव्हा बाबांनी पाणी निर्माण केले, व मला प्रदीर्घ प्रवासाच्या श्रमांनी झालेल्या श्रांत मनःस्थितींत भक्तगणांचा अफाट जन संमर्द लोटला असता समाधीच्या दर्शनाची माझी गैरसोय पण दूर केली.

मला माझीं कुटुंबीय मंडळी पुनः पुनः विचारणा करू लागली की, "अहो, तुमची ती विलक्षण आंघोळीची खोली आहे तरी कोठे?" परंतु त्यांना माझ्याकडून प्रतिसाद मिळाला नाही! मी त्यावेळी केवळ मूकस्तंभ झालो होतो!!

## साईभक्त नूलकर गेले

श्रीसाईबाबांच्या सहवासातील भक्त व ज्यांचा श्रीसाईसच्चरित्रात उल्लेख आहे ते श्री. विश्वनाथ लक्ष्मण नूलकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी सातारा-कृष्णानगर येथे त्यांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. अरविंद यांचे घरी दिनांक ७-७-१९७९ आषाढ शु. १२ शके १९०१ रोजी निधन झाले.

श्री बाबांच्या सहवासातील जुन्यात जुने असे ते एक भक्त होते. आपले वडील कै. लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब यांचे बरोबर प्रथम ते शिरडीत गेले. विसूभाऊंचे केस एकदा वाढलेले होते म्हणून त्यांना बाबांनी 'झिपऱ्या' असे नाव ठेवून दिले होते. ते बाबांच्या अनेक गोष्टी साभिनय सांगत असत, व त्या ऐकताना बाबांची मूर्ती उभी राहात असे. त्यांच्या निधनाने श्रीबाबांच्या काळातला व त्यांच्या सहवासातला एक भक्त दृष्टीआड झाला आहे. श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.



॥ ॐ ऱ्हीं नमः ॥

# श्री १५०० कोटी

# ॥ ॐ नमः शिवाय ॥

## नामजप – याग

" श्वासे श्वासे शिवनाम स्मरात्मन् "

श्रींचे प्रेरणेने आत्मशांतीसाठी व विश्वकल्याणार्थ श्री १५०० कोटींचा ॥ ॐ नमः शिवाय ॥ या महामंत्राचा नामजप याग चैत्र शु॥ १ श्री शके १८९६ पासून सुरु आहे. श्री शिव हे कोट्यावधि लोकांचे दैवत आहे. जगातील सर्व देशात शिवमंदीरे आहेत. भारतातच ११ लक्ष शिवमंदीरे आहेत. भारत शिवोपासक आहे. शिव म्हणजे कल्याण.

आज सर्व ऐहीक सुखे उपलब्ध असूनही मानवास समाधान लाभत नाही, करिता स्व–परहितास्तव सकल हिंदु बंधू-भगिनींनी (जैन, बौद्ध, शीख आदि) मद्य–मांस वर्ज्य करून आत्मीयतेने ॥ ॐ नमः शिवाय ॥ या मंत्राचा प्रत्येकी किमान ३ लक्ष मौखिक नामजप शुचिर्भूतपणे करून तो आम्हास कळवावा. आपला नामजप प्रारंभ कोणत्याही सोमवारी करून नियमित १५०० तरी जप व्हावा. तसेच शिव भक्तीचा प्रचार व प्रसार जगभर होण्याचे दृष्टीने ५ व्यक्तीस तरी समक्ष अगर पत्रद्वारे ॥ ॐ नमः शिवाय ॥ या मंत्र जपास प्रवृत्त करून आम्हास सहकार्य द्यावे अशी नम्र विनंति.

॥ ॐ नमः शिवाय ॥ नामजप मुखात येणे हे मोठ्या भाग्याचे लक्षण आहे. हजारो जन्मांचे पुण्य गांठीशी असेल तरच ॥ ॐ नमः शिवाय ॥ या मंत्राचा नामजप तरी करावा अशी शुभेच्छा होते. श्रीसाईबाबा हे शिवभक्त होते.

आतापर्यंत ॥ ॐ नमः शिवाय ॥ या महामंत्राचा ( ५१ ) कोटींचे वर नामजप झालेला आहे. हे ॥ ॐ नमः शिवाय ॥ महामंत्राचे नामजप कार्य महाराष्ट्र, सौराष्ट्र, गोवा, कर्नाटक, आंध्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, तामिळनाडू व केरळ या राज्यात व विदेशात चाललेले आहे. श्रींचा सर्वांना आशिर्वाद.

शिवनाम विश्वकल्याणी । त्रिभुवन तारक मंत्र हा ।
विशाले भारते राष्ट्रे ॥ ॐ नमः शिवाय ॥ जप करा ।

संचालक :— **विष्णुपंत बाबुराव तानवडे [ शिवदास ]**
मु. पो. श्रीसिद्धेश्वर–कुरोली, जि. सातारा [ महाराष्ट्र ]

# प्रचीति येते पदोपदी

**श्री. चकोर आजगांवकर, एम्. ए.**
वाय ११/१७० सरकारी वसाहत.
वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०००५१.

● श्रीबाबांची अनुभव आणि प्रचीति देण्याची पद्धत अगदी लोक विलक्षण! त्यांना न दिशेचे बंधन न काळाचे त्यामुळे स्वतःच्या इच्छेने ते तुमच्या दैनंदिन व्यवहारात आपल्या कृपेची पाउले उठवू शकतात. आपल्या अस्तित्वाची चाहूल देऊ शकतात. अगदी अलीकडच्या काळातील याचे अनुभव मोठे रोचक वाटतील म्हणून सांगतो आहे.

दोन वर्षापूर्वी शिरडीला जाण्याची प्रबळ प्रेरणा झाली. वाटले पाच दिवस रहावे आणि बाबांच्या प्रेमाच्या लीलाभूमीचे चैतन्य पोटभर पिऊन घ्यावे सोबत सौ. कौमुदी असल्यामुळे व बेत एकाएकी ठरल्याने एस. टीच्या रिझर्व्हेशनसाठी प्रयत्न केला. शिरडीचे दुसऱ्या दिवशीचे रिझर्व्हेशन मिळेना. तो डिसेंबरचा अखेरचा नाताळच्या सुटीतल्या गर्दीचा काळ असल्याने शेवटी निरुपाय म्हणून नाशिकच्या गाडीचे रिझर्व्हेशन घेतले नाशिकहून पुष्कळ गाड्या मिळतात असे ऐकले होते. ( अर्थात ते ऐकीवच व असत्य होते ) नाशिक दुपारी गाठले. वेळ असल्याने भोजन आटोपून सावकाश पंचवटी, मुक्तिधाम, गोदाकाठची इतर मंदिरे वगैरे अवलोकन केले. एवढे करीपर्यंत सायंकाळ झाली. नाशिकहून सोयिस्कर गाड्या नसल्याचे कळल्याने पुन्हा मुख्य स्टँडकडे घाईगर्दीने आलो. तेथेहि शिरडीस सोडणाऱ्या गाड्यांचा अभाव असल्याचे 'चौकशी' विभागाकडून कळले. इतक्यात तेथले एक एस. टी. उपनियंत्रक भेटले व त्यांनी मुंबई शिरडी गाडी उशीरा येत असल्याने तीं पकडण्याचा प्रयत्न करण्याचे सुचविले. त्या दिवशी शिरडी गाडी २ तास उशीरा येणार होती. तिचा ठरीव वेळ टळून दोन तास आधीच झाले होते. गाडी आली. कंडक्टरकडे चौकशी करता नाशिक येथे दोन उतारू उतरणारे आहेत, दोन जागा मिळतील असे कळले! सुदैवाने दोघे उतारू उतरून खिडकीकडच्या दोन जागा मला व सौ. कौमुदीस मिळाल्या व आम्ही बाबांच्या शेजारतीनंतरच्या निद्रापूर्व दर्शनाच्या वेळी शिरडीस पोहचलो तो गुरूवार होता व शिरडीत प्रचंड गर्दी झाली होती.

मंदिरातून परतल्यावर जागेची चौकशी करता सर्व जागा भरून गेल्याचे इतकेच नव्हे तर लॉकरहि शिल्लक नसल्याचे समजले. तेव्हा रात्र कशी काढायची

याची चिंता असताना निदान वेटिंग लिस्टवर नाव ठेवावे म्हणून कारकूनास भेटलो. माझे नाव लिहून घेताना लिपिकाने म्हटले, 'अहो, तुमचे नाव मी ओळखतो. थोडे थांबा! बेसुमार गर्दी असल्याने एका खोलीत जादा माणसे घेण्याची अट प्रत्येकास घातलेली आहे. तुमची सोय करता येईल का पहातो. खरोखरच एका कुटुंबास दिलेल्या जागेत आम्हा दोघांची जादा कुटुंब म्हणून सोय झाली ती रात्र त्रासाशिवाय निवाली. गाद्या-उशा भाड्याने घेऊन रात्र काढली दुसऱ्या दिवशी एक लहानशी खोली मिळाली.

तीन दिवस द्वारकामाईत बसून "**श्रीसाईगीतायन**" (त्यातील भाष्या-सहित) गीताचे वाचन व पठण करून मनाचे समाधान मिळविले. श्रीबाबांच्या समोर त्यांच्याच महिम्याचे गीतस्वरूपात समग्रवाचन करण्याचा हा अत्यंत आनंद-दाई प्रसंग होता! मनात वाटले या गीतांचे बाबांपुढे एकाद्या गायकाने गायन केले असते तर! त्यावेळी कुणीहि गायक मंडळीस घेऊन मी आलो नसल्याने ही इच्छा सफळ होणे अगदी अशक्यतेच्या कोटीतले होते. परंतु बाबांची इच्छा निराळी होती. त्यांनी माझी तरळती इच्छा उचलून धरली. तिसऱ्या दिवशी राधा धारेश्वर या रंगभूमीवरील गायिका बाबांच्या दर्शनास आल्या आणि त्यांनी बाबांपुढे '**साई-गीतायनातील**' निवडक गीते म्हटली माझी इच्छा अकल्पितपणे पुरी झाली!

त्याच दिवशी आणखी एक चमत्कार घडला. विदर्भातील काटोल येथील सत्पुरुष श्री संत गुलाबबाबा यांच्याशी भेट व्हावी अशी मुंबईत माझी तीव्र इच्छा होती. माझे मित्र श्री. बडकस (सचिवालयातील सहकारी) यांचेकडे बाबा आले असता गर्दीमुळे निवांत दर्शन घडले नव्हते. परंतु आम्ही दरवाजात उभे असता श्री. गुलाबबाबांनी सौ. कौमुदीच्या हाती एक हार व पेढा दिला होता. या त्यांच्या अंतर्यामित्वामुळे त्यांचे निवांत दर्शन व्हावे, असे फारच तीव्रतेने वाटत होते परंतु मुंबईत असताना हे शक्य झाले नव्हते. आता मी शिरडीत होतो. मी दुपारी पत्नीस म्हटले "चल आपण आज समाधी मंदिरात दुपारच्या नंतरची शांत वेळ असल्याने निवांत बसू." '**मी साईगीतायन**' हातात घेऊन त्याचे पठण कर-ण्याच्या उद्देशाने सौ. कौमुदीसह बाहेर पडलो. समाधी मंदिराच्या दारात पोहोचलो. तो एका खाजगी गाडीतून नुकतेच उतरलेले संत गुलाबबाबा मंदिराच्या दारातील संगमरवरी नंदीसमोर उभे राहून बाबांना प्रणिपात करताना दिसले. ते शिरडीमार्गे दुसरीकडे निघाले होते. वाटेत बाबांच्या दर्शनासाठी क्षणभर उतरले होते. मी व सौ. ने प्रणिपात केला. संत गुलाबबाबांना ओळख करून दिली. ते आमच्यासह बाबांच्या समाधीसमोर आले. पुजाऱ्यास गुलाबबाबा म्हणाले, "मुंबईस भेट होत

नाही; म्हणून आम्हाला शिरडीस यावे लागते." त्यानंतर त्यांनी '**साईगीतायन**' माझ्या हातातून घेतले व त्याबद्दल पृच्छा केली. शेजारच्या दुकानात शिरले. पेढे लाह्या व एक फूल पुस्तकावर ठेवून त्यांनी मला ते परत केले. लवकरच ते आल्या वाटेने छोट्या गाडीने मार्गस्थ झाले. बाबांच्या समाधीसमोर संत भेट होणे हा एक मोठा चमत्कृतीपूर्ण योगायोगच मला वाटतो !

शिरडीच्या त्या महान् चैतन्याला सर्व दिशांनी हातपाय, डोळे आहेत 'सर्वतः पाणी-पादोऽपम्' असे त्याचे सर्वदर्शी, सर्वस्पर्शी, सर्व शक्तिमान् स्वरूप आहे. तुमच्या मनी अंतरी घरीदारी सर्वत्र ते वावरत आहेत. फक्त पहावयास डोळस दृष्टी हवी.

● ● ●

# भक्त कामना पूर्ण करणारे बाबा.

—सौ. प्रमिला अ. नाईक
ए/२० सीताराम बिल्डिंग
डॉ. दादाभाई नौरोजी रोड, मुंबई—१

● १ मार्च १९७५, आम्ही उभयता, मुलगा व सून नातवाच्या पहिल्या वाढदिवसासाठी मुलीकडे नाशिकला होतो, आणि इकडे दिल्लीला गेलेल्या माझ्या वडिलांना तेथे बस अपघातात मृत्यूने गाठले ! फोनवरून बातमी कळताच शिरडीला जायचा बेत रद्द करून मला मुंबईहून विमानाने दिल्लीला जावे लागले. कधीही चाकोरीबाहेर न जाणारे माझे वडील अन् त्यांचे मरण हे असे अपघाती. बातमी समजताच स्मृतीचा पटल डोळया पुढून सरकू लागला. समुद्र मंथनाप्रमाणे मनः-स्मृतीही पार ढवळून उफाळल्या. दुःखाचा डोंगर, मनोव्यथा विसरून मनःशांतीसाठीं मीं त्यांचा पहिला महिना, श्रीसाईनाथाच्या पवित्रस्थानी शिरडीला अन्नदान करून घातला. पित्याचा आधार तुटल्यानंतर मी साईनाथांना मनातून म्हणाले की, "हे साईनाथा ! जन्म देते पिता तर गेलेच परंतु कर्माला गती देणारा तूच आता माझा पिता आहेस. माझ्यावरील संकटापासून मला वाचवण्यासाठी तुला धावावेच लागेल. अन्यथा, तुझ्या नावाचा जप करीत करीतच मला समुद्रात समाधी घ्यावी लागेल."

त्यानंतर मीं घरी मुंबईला परतले. २० एप्रील १९७५ ला रामनवमीचा उत्सव होता. साई चरित्राचे पारायण सुरू होते व नवमीला त्याची समाप्ती होती. माझ्या मुलाचे लग्नात बाबांचे एक भक्त कै. काकासाहेब अवस्थी यांनी बाबांची प्रतिमा दिली होती. पूजा नैवेद्य झाला. आरतीच्यावेळी माझी धाकटी मुलगी चि. वीणा हीस श्रीसाईबाबांचा संचार आला. प्रथम, काहीच समजेनासे झाले. आम्ही थोडे घाबरलोही. पण त्याचवेळी बाबा माझ्या वरील हाकेला 'ओ' देवून आल्याचा आनंदही वाटला. संचारातून बाबांनी दिलेल्या सूचनाप्रमाणें ओळीने ९ महिने बाबा बोलवितील त्या त्या वेळी मी तसेच चि. वीणा शिरडीला जाऊन आलो. बाबांच्या कृपेने आजवर १५५ वेळा शिर्डी घडली ! आज ४ वर्षे पूर्ण होऊन बाबांच्या आमच्या येथील गादीला ५ वे वर्ष लागलेय. दरम्यान, अनेक भक्तांच्या प्रापंचिक समस्या व अडचणी याना बाबांच्या आज्ञेने सोडवून, व्यथामधून त्यांना सोडवून, योग्य ते मार्गदर्शन करीत आहोत. बाबांच्याच कृपेने, माझ्या दोन्हीही मुलींची लग्ने बाबांच्या शिरडीत त्यांच्या आज्ञेने पार पडली माझ्या वडिलांची उणीव मला भासू दिली नाही. धाकट्या मुलीबद्दल तर, "चार वर्षे पूर्ण होऊ दे, मग काय चमत्कार होईल" पहा असा दिलासा. बाबांनी संचारात दिला व अगदी बरोबर ४ वर्षे उलटली अन् वीणाचा विवाह पार पडला !

श्रद्धा आणि सबूरीचे फळ बाबा देतातच. माझ्या हाकेला 'ओ' देऊन बाबा आले माझे मन निर्धास्त झाले. रोजच्या दैनंदीन जीवनात संसारिकाना येणाऱ्या, प्रथमदर्शनी अगदी अवघड वाटणाऱ्या अडचणी समस्या बाबांवर श्रद्धा ठेवणाऱ्या भक्तांबाबत बाबा अगदी अतर्क्य अशाप्रकारे सोडवतात की आश्चर्यच वाटावे. श्रद्धा असल्यावर का ? व कसे ? हे प्रश्न उरत नाहीत. माझा हा अनुभव आहे.

☆ ☆ ☆

## दिपावली शुभ चिंतन

ही दिवाळी व नूतन वर्ष आमच्या सर्व वाचकांना, लेखक कवींना, जाहिरातदारांना व हितचिंतकांना सुखाची व भरभराटीची जावो ही शुभेच्छा.

# पोथी लेखनाची स्फूर्ती आणि पूर्ती

—प्रा. र. श्री. पुजारी, एम. ए. एम. एड.
रमा निवास, ९९२ सदाशिव, पुणे–३०.

● "शिरडीनिवासी सच्चिदानंद–सद्गुरु श्रीसाईनाथ" हे मी लिहिलेले ३७५ पृष्ठांचे प्रदीर्घ ललितचरित्र १९७६ च्या जुलैमध्ये प्रसिद्ध झाले. ते वाचून अनेक भक्तांनी मला गौरवपर पत्रे लिहिली. त्यात रत्नागिरीच्या परम साईभक्त भगिनी सौ. उषाताई प्र. अधिकारी यांनी सुचविले की "एका दिवसाच्या पारायणास उपयुक्त" अशी एक पोथी मी आता लिहावी.

आजवर कोणत्याही एका पोथीचे सलग पारायण किंवा सप्ताह मी केला नाही. यामुळे पोथी लेखन ही गोष्ट मला अशक्य कोटीतील वाटली. अर्थातच तो विचार मी मनावर घेतला नाही. परंतु पुढे दोनच महिन्यात हातातील श्रीगुरुचरित्रविषयक लेखन बाजूस पडून पोथी मला स्फुरू लागली. १० डिसेंबर १९७६ ते १७ मार्च १९७७ या सव्वा तीन महिन्यांच्या कालावधीत पोथी मी हातावेगळीही केली.

श्रीदासगणुरचित श्रीगजानन–विजय या पोथीच्या निम्मी हीं पोथी व्हावी असा माझा स्थूल संकल्प होता. त्याप्रमाणे पोथी लेखन पुरे होताच मी ओवीसंख्या मोजलीं. तीं १८६८ इतकी भरलीं. गजानन–विजय पोथींचीं संख्या ३६६८ आहे.

पुढे उरलेल्या ३२ ओव्यांमध्ये अवतरणिका करून १९०० ओव्यांची पोथीं करावीं म्हणून लिहावयास बसलो. कितीही प्रयत्न करून शेवटीं ३१ ओव्याच झाल्या! यामुळे पोथीं १८६८ + ३१ = १८९९ ओव्यांचीं झालीं. यावेळीं १८९९ हे शक चालू होते.

याच वर्षी अक्षय्य–तृतीयेस शिरडीस जाऊन पोथीं श्रीचरणी अर्पण केलीं. पुन्हा १५ ऑक्टोबर १९७८ रोजीं जाऊन पोथीं संस्थानास सर्व हक्कांसह देऊ केलीं. परंतु पोथीं संस्थानने छापावीं असा योग नव्हता.

तथापि आनंदाचीं गोष्ट अशीं कीं एका दिवसाच्या किंबहुना तीन तासांच्या पारायणास हीं पोथीं अत्यंत उपयुक्त ठरलीं. अनेक भक्तानीं तिची पारायणे केलीं. एका भक्ताने तर ६६ दिवस खपून सुंदर हस्तक्षरात तिचीं प्रत केली तीं करीत असताना आणि केल्यानंतरहीं त्याना अनेक विलक्षण अनुभव आले.

हीं पोथी मी तावडतोब छापावी म्हणून अनेक भक्तांनी मला आर्थिक साहाय्य देऊ केले. पण मी ते स्वीकारले नाही. श्रीबाबांची इच्छा होईल तेव्हाच पोथी छापली जाईल असे म्हणून स्वस्थ बसलो.

एक दिवस अकल्पितपणे " योगसिद्धी " मासिकाचे संपादक घरी आले पोथी घेऊन गेले. पोथी मासिकात छापण्याचे त्यानीं ठरविले. मी त्यांच्याकडे मासिकासाठी वापरलेला कंपोज मागितला. तो त्यांनी मला उपलब्ध केला. कागद मिळेना म्हणून तोही त्यांनीच उधार दिला. पण याहून आश्चर्य म्हणजे हे काम सर्वत्र फिरून मुद्रण-व्यवसायातील माझे परम साईभक्त स्नेही श्री. मधुकरराव देशपांडे यांच्याकडे अखेरीस आले ! ते त्यांनी केवळ माझ्या पोथीकरिता स्वीकारले.

पोथी मासिकातून क्रमशः आल्यामुळे अनेक भक्तांनी ती आधीच वाचली. ती त्यांना आवडली. काहीनी पोथीच्या प्रतींची मागणी केली. पोथीं पुण्यतिथीच्या सुमारास प्रसिद्ध होईल असे आश्वासन मीं त्यांना दिले. ते पुरे होईल अशीं मला खात्री आहे.

☆ ☆ ☆

# श्रीबाबा धावले—बाबा पावले

— सौ. श्री शहाणे
लक्ष्मीनिवास, गडकरीपथ,
मु. पो. डोंबिवली.

● गेल्या वर्षी १५–१६ ऑगस्टचीं गोष्ट माझ्या यजमानांना कावीळ झाल्याचे आम्हा सर्वांना घरात कळले. पण हे स्वतः पिवळे धमक होईपर्यंत ही गोष्ट आम्हाला न समजण्याचे कारण ह्यांना काविळीची कोणतीच लक्षणे होत नव्हती. ओकारी, ताप मळमळ, भूक न लागणे वगैरे लक्षात येताच आम्ही प्रथम त्यांना डॉक्टरकडे नेले. डॉक्टरांनी आणखी एका स्पेशालिस्टकडे पाठवलं. तिथे असं ठरलं की ही कावीळ नेहमीची साथीची नसून 'ऑब्स्ट्रक्टीव्ह जॉंडिस' आहे. करिता त्याची तपासणी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये व्हावी, व तेथेच उपचार करावेत. हे ऐकताच सारेच अघटित वाटले. व बाबांना साकडे घातले. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये सर्व तपासण्या होऊन शेवटी ७ सप्टेंबरला ऑपरेशन ठरलं. टाटा हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध कुशल सर्जन डॉ. प्रफुल्ल देसाई

हेच स्वतः ऑपरेशन करणार होते. माझ्या डोळ्यात एकदम वीज चमकली. प्रफुल्ल म्हणजे आनंद–आनंद–देणारा–साई–देसाई–माझा त्या नावाच्या फोडीने-अर्थाने एकदम इतका कायापालट झाला की मी त्यांना डॉ. साईच म्हणू लागले. ठरल्या-प्रमाणे ऑपरेशन झाले. हे एक महिन्यानीं घरी आले. नंतर ते डॉक्टर टाटाचे असल्यामुळे टाटा हॉस्पिटललाच एक महिन्यानी चेकअपला यायला सांगितले. म्हणून तोपर्यंत मी ह्यांना हवापालट म्हणून पुण्याला ह्यांच्या बहिणीकडे पाठवले. आता इथूनच सत्त्वपरीक्षेला खरी सुरुवात झाली. बहिणीचे मिस्टर डॉक्टर असल्याने ड्रेसिंग वगैरेहि स्वतःच करत असत. ह्यांचे पहिले आठ दिवस फारच सुंदर गेले. पण ड्रेसिंग करताना रोज हे डॉक्टर मेहुण्याना म्हणत. "डॉक्टर मला इथे डाव्या बाजूस कसला तरी गोळा लागतोय. गाठ वाटते असे म्हणे म्हणे पर्यंत ८–१० दिवसात तो गोळा खूपच मोठा झाला. मग मात्र ते घाबरले. व त्यानी मला बोलावून घेतले. तिथे जाऊन पुण्याच्या सुप्रसिद्ध भावे सर्जनना दाखवून पुढे काय करावे ? तिथे राहाणे योग्य का ? वगैरे विचारून ८–१० दिवसात आम्ही पुन्हा ह्यांना डोंबिवलीला आणले.

मग टाटामध्ये अपॉइंटमेंट घेतली. पण डॉ. देसाई परदेशात आहेत असे कळले. मग डॉ- व्यासांची भेट घेऊन त्यांचा सल्ला विचारला. पुन्हा ऑपरेशनच करायला लागणार असे नक्की झाले.

पण मग आता डॉ देसाई येणार केव्हा ? तोपर्यंत थांबावे का ? काय होईल ते जाईल. पण डॉ. देसाई आल्याशिवाय ऑपरेशन नको. ते येणार होते १५ नोव्हेंबर नंतर. मग काय बाबांचा धावा केला. ५–६ नोव्हेंबरलाच डॉ. देसाई डॉ. साई हजर. लगेच त्यांच्याशीं संपर्क साधून ८ तारखेला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. टाटा हॉस्पिटल म्हटल्यावर तर मी अर्धी खचले. १७ नोव्हेंबरला अतिशय मोठे असे परत ऑपरेशन झाले. आणि त्या गोळयातून काहीच निघाले नाही. पण हाय रे ऽऽऽ साई–आजू बाजूला कॅन्सर थोडा पसरला असल्याचे कळले. डॉ. देसाईनी मला बाजूला बोलावून सांगितले–"असे आहे; पण त्यावर मी उपाय सांगेन." बुडत्याला कांडीचा आधार. तरी ही गोष्ट पेशंटला १५ दिवस सांगितली नाहीं. ज्यावेळीं कळली त्यावेळीं आम्ही दोघे गळयात गळे घालून ओक्साबोक्सी रडलो. बाबा ऽऽऽऽ मी तर बेभान होऊन ओरडले" काय केलेत तुम्ही ? बेभान अवस्थेत मी हें बोलले. मला असे बोलायला नको होते. पण त्यावेळचे दुखच एवढे मोठे होते की मला तिथे एकटयाला खरंच काही–काही सुचेना. नाहीतर

मी दोन्ही हॉस्पिटलमध्ये नेहमी सकाळीं लौकर उठून बाबांच्या सच्चरिताचा १ अध्याय वाचत असे. जसा घरी वाची तसा. पण पुढे २ दिवस कशा कशात मन लागेना. तरी पण मी ह्यांच्या कपाळी नेमाने उदी लावीत असे. अगदी प्रत्येक ऑपरेशनला जाताना देखील. दुसऱ्या ऑपरेशनच्या वेळेला २ महिन्यात लगेच दुसरे मोठे ऑपरेशन–मलाच वाटायच की ८ दिवस तरी काढतील की नाहीं ? पण ४ महिन्यानी ते ऑफिसला देखील जायला लागले. तोंच पुन्हा कपाळावर सुपारीएवढी गाठ. मग मात्र मीच कपाळाला हात लावला, आणि डॉक्टरांच्या निदर्शनला ती गाठ आणून दिली. डॉक्टरांनीं त्यांना बरीच महागडी व एकंदर ३ हजार रुपयांची इंजक्शन्स लिहून दिलीं. मी इकडे रोज त्या गाठीवर नेमाने उदी पाण्यात कालवून त्याचा लेप देई व पोटातहि उदी पाण्यातून देऊ लागले. आपल्याला श्रद्धा ठेवता येते. पण सबुरी ! मी एके दिवशी घरातल्या बाबांच्या पुतळयासमोर अक्षरशः रडून बाबांना म्हटले, "बाबा, श्रद्धा भरपूर आहे. पण सबुरी–सबुरी रे साईनारायणा आता धाव. मीं कोणापुढे तुझ्याशिवाय पदर पसरू ? आणि चार पाच दिवसात गाठीच्या जागी पूर्ण सुरकुत्या, अगदी सारखी कातडी. मदत आणि कृपादृष्टि श्रीसाईची होतीच पण आम्हाला कुठे धीर होता ! सध्या अधूनमधून बारीक सारीक तक्रारी चालू आहेत. आपण डॉक्टरला सांगतोच. हे तो साई जाणतोच–पण अजून ह्यांची प्रकृति म्हणजे पाहिल्यावर कोणीहि घाबरेल असा फक्त सांगाडा आहे. पण ज्याने इथपर्यंत आणले त्याच्याच शिरावर सारा भार टाकलाय. हे लिहिताना देखील डोळे भरून येतात. ते खरंच पूर्ण बरे झाले की मी बाबांच्या समाधिवर मखमली भरजरी शाल आम्ही करून ठेवली आहे ती घालणार आहोत. तेव्हा लवकर लवकर साईप्रभु नव्हे ‘ साईसमर्थ ’ हा अमुचा महान मंत्र. ते समर्थ असल्यावर मी काळजी सोडली आहे. बाबांच्या लीला वर्णन करायला मर्यादाच नको–इतक्या त्यांच्या अमर्याद लीला आहेत. त्यांच्या चरणी आम्हा दोघांचे कोटी कोटी प्रणाम. साई देवा, तू धावलास तू पावलास. मी तुला विसरणार नाही. पण तुझी रहम नजर, कृपादृष्टी, कृपाछत्र माझ्या पतिवर असू दे. माझं काही मागणं नाही–फक्त सौभाग्याचं मरण देई बाबा. तुमची मी लेक आहे. तुम्ही म्हणता मरणानर्थ मागू नका ! पण बाबा, केव्हातरी ते येणारच. स्त्री असल्याने मी फक्त सौभाग्याचे मरण जेव्हा येईल तेव्हाच मागते, ह्यांना निरोगी ठेवा, सुदृढ ठेवा.

★

# साई, तुला कसे विसरू शकतो

—प्रा. गुंडेराव पटवारी, "साहित्यरत्न"
३-२-५१, ब्राम्हणवाडी
मु. पो. बिदर.

● गेल्या पाच वर्षात मला अनेक अनुभव आले. माझे दोन तीन अनुभव श्रीसाईलीला मासिकात प्रसिद्धही झाले. हा एक वेगळाच आणि माझ्या जीवनातील आश्चर्य कारक असा अनुभव आहे. १९७८ च्या लेखक कवि सम्मेलनात, भाग घेण्याकरीता श्रीक्षेत्र शिरडीला गेलो, सम्मेलन संपल्यानंतर, खास श्रीबाबांची प्रार्थना करण्याकरिता थांबलो, प्रातः पुजा अर्चा संपल्यानंतर साईबाबांना प्रार्थना केली. "बाबा माझ्या मोठ्या मुलीचे लग्न करा, तुमचे अनेक उपकार आहेत, हे एक मोठे कार्य करून माझ्यावर उपकार करा." ह्यापूर्वी अनेक समस्या माझ्या जीवनात आल्या. श्रींच्या कृपेने समाधानही झाले. नवस करून मी बिदरला परत आलो.

आठवड्याच्या आतच माझ्या शहरात राहाणारा, व्यापार करून पोट योग्य रीतीने भरणारा, एका व्यापारी मुलास, मुलगी दाखविली, दाखविण्यापूर्वी मुलीने कुंकु बरोबर बाबांची उदी लावली, मुलगा आणि त्यांचे नातेवाईक मुलीला पाहिले. बाबांच्या कृपेने त्यांना माझी मुलगी पसंत पडली, आनंद झाला, बाबांना साष्टांग नमस्कार घातला, लग्नाची तयारी आरंभ झाली.

लग्नाचा खर्च २० हजार येणार होता. घाबरलो, दचकलो, माझ्या जवळ फक्त दोन हजार रुपये होते. बाकी रुपयांची व्यवस्था काय करावी, हेच समजेना, चिंता वाटू लागली, पुन्हा तेच, बाबांपुढे रडलो, प्रार्थना केली, नवस केले, साईना सोडून आमचे कोण !

माझ्याकडे वडिलांची थोडी जमीन गावात आहे, शेत विकावे पैसे आणावेत, लग्न करावे, अशी आशा घेऊन बाबांना नमस्कार करून गावाला गेलो, एक शेतकरी (माझ्या गावात माझी शेती करणारा नोकर म्हणा) माझी शेती पाहतो, त्याला सर्व हकीकत सांगितली, बाबांची कृपा, त्याने मला वचन दिले. "घाबरू नका मास्तर साहेब, मी तुम्हाला १५ हजार रुपये देईन. शेत विकू नका तीन वर्ष शेतावरच माझे रुपये फिटतील. नंतर तुमचे शेत तुम्हाला."

काय बाबा तुमची लीला. कोर्ट कचेरीत न जाता, कागद पत्र लिहून न देता, साईंचा भक्त आहे म्हणून त्याने मला रुपये १५ हजार दिले, हे बाबांचे चमत्कार आहेत. बाबांचे उपकार जन्मो जन्मी विसरत नाही.

मे १९७९ च्या तृतीय सप्ताहामध्ये थाटाने लग्न झाले. मुलगी आज आपल्या घरी सुखात नांदत आहे.

माझी आई, पाच मुले मुलगी सर्व बाबांच्या कृपेने सुखी आहेत मला सर्व प्रकारचे सुख बाबांनी दिले आहे, अनेक उपकार आहेत त्यांचे, बाबांना मी कसे विसरू शकतो मला मोक्ष नको, जन्मोजन्मी मला बाबांची भक्ती भेटावी. श्रीसाईंच्या चरणी मी रहावे, हीच माझी प्रार्थना आहे.

* * *

# किटी दुध प्याली

—श्री. गणपत गोविंद सामंत एम्. ए.
गुरुकुल, दहिसर मुंबई–६८

● माझ्याकडे एक परदेशी मांजर आहे. त्याला आम्ही किटी नाव ठेवलय. हे मांजर अत्यंत देखणे असून वागणेहि फारच समजुतीचे आहे. आम्हाला ते मुला-प्रमाणे प्रिय आहे. कोणीहि पाहुणा आमच्याकडे आला की या मांजराचे पिलू आम्हास हवे असे सांगितल्याशिवाय जात नाही. गेल्याच महिन्यात किटीने चार पिले घातली पण ती सर्व मृतावस्थेतच, किटीची सुटका झाली म्हणून आम्ही निर्धास्त झालो. पण नंतर पाच दिवसानी आणखी एक मृत पिलू किटीने घातले व तेव्हापा-सून किटीने खाणे-पिणे संपूर्ण बंद केले. एका डोळयातून रक्त येत असे. काहीच इलाज चालेनात. पाण्याच्या थेंबाशिवाय पाच दिवस गेले. किटीला चालता येईना.

काय करावे हेच आम्हाला कळेना. आम्ही आशा सोडली. तो दिवस आषाढी-एकादशीचा होता. बाबांची पूजा आटपली व मी बाबांस म्हटले की किटीचे हाल आम्हाला पहावत नाही. तिला बरी करा. असे म्हणून उदी घेऊन किटीच्या नाकास व डोक्यास फासली. त्याचक्षणी माझी सौ. दूध घेऊन आली व आश्चर्याची घटना किटीने दूध थोडे कष्टाने चाटले व लौकरच खाण्या-पिण्यास सुरुवात केली. म्हणजे आषाढी एकादशीचा मी उपवास सोडला. हा अनुभव लिहीताना समोर किटी बसून पाहात आहे. याला म्हणतात बाबांचा प्रताप. माझे शतशः त्यांना प्रणाम.

# साईकृपेने आजार दूर झाला.

—सौ. धनवंती शांतीलाल राठोड
सरकारी वसाहत ब्लॉक नं. इ / ६
मु. पो. पालनपूर, जि. बनासकाठा
(उत्तर गुजरात) पीन ३८५००२

● आमचे सारे कुटुंब साईभक्त आहे. लहान किंवा मोठ्या संकटात पूज्य बाबांनी साहाय्य केलेच आहे.

एकेकाळी मला स्त्री आजारापैकी एका भयंकर आजाराने ग्रासले. स्त्री डॉक्ट, रांना दाखविता त्यांनी ऑप्रेशनचा सल्ला दिला. परंतु त्यांनी असेही सांगितले की- ऑप्रेशन करूनही निश्चितपणे बरे होऊ शकाल हे मी काही सांगू शकत नाही. अशावेळी ही समस्या कुटुंबासाठी गंभीर बाब होती. आम्ही दवाखान्यातून घरी आलो होतो. रात्रीची वेळ होती. वातावरणात एकप्रकारची उदासीनता पसरली.

इतक्यात माझ्या पतीना बाबांनीच प्रेरणा दिली असेल. शांत वातावरणाला चिरत ते म्हणाले, "उद्या गुरुवार आहे. सकाळी लवकर उठून स्नानसंध्या करून बाबांच्या फोटोची स्थापना करून विधीवत सात दिवस पुष्पमाळा नेमाने केल्यास निश्चितपणे तू चांगली होशील." एवढं बोलून ते शांत बसले.

माझे हृदयसुद्धा या गोष्टीने प्रफुल्लीत झाले कारण कीं, यात ऑपरेशनची भीति नव्हतीं शिवाय बाबांची कृपा प्राप्त करण्याची संधी अनायासे मिळत होती.

दुसऱ्या दिवशी सकाळीं लवकर उठून नक्की केलेल्या कार्यक्रमानुसार माळ चढविताना मी लीन झालीं. याप्रकारे तीन दिवस झाल्यानंतर चौथ्या दिवशी जवळ-जवळ ७५% आजार बरा झाल्याचे वाटत होते. यामुळे उत्साह वाढला आणि चमत्कार रुपाने सात दिवसात म्हणजे पुढच्या गुरुवार पर्यंत तर १००% आजार पूर्णपणे बरा झाला. आजपर्यंत मला त्याबाबतीत कोणताही त्रास नाही.

म्हणूनच 'हे सच्चिदानंद श्रीसद्‌गुरु साईबाबा' आपणाशिवाय आम्हाला कुणाचाच सहारा नाही" असे शब्द अनायासे हृदयातून भावरुपाने वाणीतून निघतात.

☆ ☆ ☆

# आणि नकळतच श्रद्धेने सर्वांचे कर जुळले गेले

— श्री. संभाजी व्ही. सावंत
स्पेशल एक्झीक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट १।३ वराडकर
बिल्डिंग, हॉस्पीटल ॲव्हेन्यू, परळ, मुं. १२

● बुधवार दि. १५ नोव्हेंबर ७८ ची शिर्डी संस्थानातील एक रात्र! साधारण ८, ८-१५ चा सुमार होता. रात्रीची नीरव शांतता पसरली होती. मधून मधून श्री साईबाबांची स्तुती स्तोत्रे ऐकू येत होती. मी देखील डोळे मिटून बसलो होतो. थोड्याच वेळात एकच गडबड गोंधळ सुरु झाला. आग-आग असा ओरडा सुरू झाला. मीं झटकन बाहेर आलो. पहातो तो साईबाबांच्या मूर्ती समोरील गॅस पेटविण्याच्या खोली मधून आगीच्या ज्वाला भडकत होत्या. चौकशी केली असता असे समजले की सदर खोलीमध्ये बत्त्या टेस्ट करताना बरेसचे रॉकेल जमिनीवर सांडले जाऊन निपल मधून आगीची ज्योत खाली पडून जमिनीवरील रॉकेलने पेट घेतल्याने आग लागली होती.

● तेथील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आग विझविण्याचा फार प्रयत्न केला. परंतु त्याचवेळी बाजूला असलेल्या लाकडी कपाटाने पेट घेतला असल्याने एव्हांना आगीने उग्र स्वरूप धारण केले होते. शिवाय त्याचवेळी जवळपास असलेल्या रॉकेलने भरलेल्या गॅसच्या बत्त्या व रॉकेलने भरलेले ४।५ डबे यानी सुद्धा पेट घेतल्याने एकच हाहाःकार उडाला. हीच आग जर गजबजलल्या ठिकाणी किंवा एखाद्या बिल्डिंगला लागली असती तर १५।२० मिनीटातच बिल्डींग भस्मसात झाली असती. मी होमगार्डच्या फायर फायटींग मध्ये असल्याने ही गोष्ट माझ्या निरिक्षणातून सुटली नाही. अखेर सुमारे ९ वाजताच्या सुमारास श्रीसाईकृपेने आग आटोक्यात आली.

आग लवकरच आटोक्यात आल्याने श्रीसाईबाबांची मनोमन प्रार्थना केली. याचवेळी ९ वाजताच्या दरम्यान श्रीसाईबाबांच्या मूर्तीच्या मुखवट्यावर घामाच्या धारा वहात होत्या हा चमत्कार तेथील स्थानिक मंडळी व आमच्या बरोबर आलेली मुंबईकर मित्र मंडळी यांनी प्रत्यक्ष पाहिला आणि नकळतच श्रद्धेने सर्वांचे कर जुळले गेले.

* * *

# बाबांचे दर्शन घेतले नि मुलीचे लग्न जमले

—सौ. विमल बी. चव्हाण
पवार वाडा, पाटी गल्ली
मिरज, नदीवेस

● माझ्या मोठ्या मुलीचे वय २५ वर्षे आहे. तिच्या लग्नासाठी ५ वर्षे सतत प्रयत्न करुनही कुठेच जमत नव्हते, अन् तशात ती मुलगी पण थोडी नास्तीकच होती. पण अचानक ती व मी एकदा पुण्यास गेलो असताना साईलीला मासिकाचे वर्गणीदार श्री. खेले यांच्या घरी एक साईलीला अंक त्यातील अनुभव वाचले, व तिच्या मनात एकाएकी आले की आपणही शिरडीस साईबाबांच्या दर्शनास जावे. अन् 'शुभस्य शिघ्रम' म्हणून आम्ही दोघी शिरडीस गेलो. तिथे आंघोळ वगैरे करून आम्ही बाबांचे दर्शन घेतले. दुपारी १२॥ ची आरती केली व भोजन करून जाण्यापूर्वी परत एकदा बाबांचे दर्शन घेऊन आम्ही पुण्यास गेलो. अन् नेहमी-प्रमाणेच 'स्थळे' शोधण्यासाठी मी एका पत्त्यावर गेले. अन् काय आश्चर्य कधीही होकार न येणारा त्यावेळी त्यांच्याकडून होकार आला व स्थळही चांगले मिळाले अगदी माझ्या मुलीला हवे तसे. अन् लग्नही २१ मे ७९ ला झाले. आज ते जोडपे सुखात जीवनाची वाटचाल करीत आहे. ही सर्व बाबांचीच कृपा. तेव्हापासून माझी मुलगी आस्तिक झाली. अशा या थोर परमात्म्यास कोटी कोटी प्रणाम.

☆ ☆ ☆

# शिरडी भेटीची इच्छा पूर्ण झाली

— श्री. मंगलकुमार जोशी एम्. एस. सी.
विक्रम उपग्रह भूमी केंद्र
आर्वी ता. जुन्नर, जि. पुणे

● शिर्डीचे श्रीसाईनाथ महाराज भक्तास संकटातून मुक्त करतात, त्यांच्या नवसास पावतात बाबांचे चरित्र वाचताना एक गोष्ट लक्षात आली कि बाबा, भक्तांची आंतरीक तळमळ पाहून शिरडीस ओढून आणतात, व त्याची मनोकामना पूर्ण करतात. मला याची प्रचिती आली.

दि. २० जून १९७९ रोजी मी रजा संपल्याकारणाने परभणीहून आर्वीस नोकरीच्या गावी चाललो होतो. रजेवर जाण्यापूर्वी मी माझी पत्नी व सहामहिन्याचा

मुलगा चि. अमोल ह्यास आर्वीला ठेवले होते. एकटे रहाण्याची त्यांची ही पहिलीच वेळ त्यामुळे माझे लक्ष त्यांच्याकडे लागले होते. त्यात बऱ्याच दिवसात पत्र न आल्याने मला आर्वीस कधी जातो असे झाले होते. प्रवासात माझ्या मनात विचार आला की अगोदर शिर्डीला जावे बाबांचे दर्शन घ्यावे व पुढे जावे. पण रजा संपत आली होती व घरची काळजी होती त्यामुळे व्यवहारी दृष्टिकोनातून शिर्डीला जाणे शक्य होईना. शेवटी, बाबा त्यांची इच्छा असेल तर कसेही करून माझा शिरडी दर्शनाचा योग आणतील असा मी विचार केला व ही गोष्ट मी पूर्ण विसरून गेलो.

परभणीहून आर्वीला जाताना मला औरंगाबादला उतरून एक निरोप भावाकडे द्यायचा होता व तेथून पुढे निरोप देऊन रात्री आर्वीस जायचे मी ठरविले. पण औरंगाबादला गेल्यावर महत्वाच्या कारणाने मला तेथे मुक्काम करावा लागला व सकाळी पण एस. टी. स्थानकावर निघावयास साडे अकरा वाजले. आर्वीकडे जाणारी शेवटची एस. टी. अहमदनगरहून दुपारी १-३० ला निघते व ती मिळवण्यासाठी मला नगरला १-३० पर्यंत पोहोचणे आवश्यक होते पण तशी सोईची एस. टी. नव्हती.

काय करावे ह्या विचारात असतानाच मला शिर्डीला जाणारी एस. टी. दिसली. चौकशी अंती कळाले की तेथून मला पुढील एस. टी. मिळेल. त्याप्रमाणे मी बसमध्ये बसलो. गाडीत आरामशीर जागा मिळाली. मला खरेच वाटेना की, आपण नगरला जात नसून शिर्डीला बाबांच्या दर्शनास जात आहोत. त्या दिवशी गुरुवार (२१ जून ७९) होता. व गुरुवारीच बाबांच्या दर्शनाचा योग ठरवून न जाता आला. रात्री बाबांची पालखी पाहिली व दर्शन आटोपून एस. टी. स्थानकावर (शिर्डी) आलो तर आर्वी–पुण्याकडे जाणारा कंडक्टर जणू काही बसमध्ये माझीच वाट पहात होता. मी बसमध्ये पाय ठेवताच बस सुरू झाली. प्रवासी पण अगदी मोजकेच होते. त्यामुळे प्रवास छान झाला.

एकंदरीत माझ्या मनातील इच्छा बाबांनी पूर्ण केली व अनपेक्षीत, विनासायास व माझ्या पुढील प्रवासास उशीर न होता बाबांनी मला शिर्डी समाधीचे दर्शन घडविले. भक्तास त्यांच्या इच्छेप्रमाणे ते शिर्डीस ओढून आणतात याचा अशा रितीने मला अनुभव आला.

★ ★ ★

# बाबांनी दर्शन दिले

— सौ. मालतीबाई विष्णू कौलगेकर
घोरावाडी तळेगाव दाभाडे
तळ्याशेजारी शुक्ल यांचे घर

● ल्हानपणापासून मला देवाचे वेड होते. लग्न झाल्यावरहि ते कायम होते व आपल्यावर परमेश्वराची कृपा व्हावी अशी मनोमन इच्छा. आम्ही सोलापूरला राहात असू. सासरी गडगंज संपत्ती. मुलगा आईबापांचा लाडका म्हणून मॅट्रिक होऊन हे घरीच होते. नोकरीधंदा काही नाही सासरे वकील होते परंतु सासू-सासरे गेल्यावर घरातील संपत्ती हळूहळू कमी होऊन शेवटी फारच कठीण परिस्थिती प्राप्त झाली. त्यातच ९ मुले झाली. ७ व्या मुलाच्या वेळेस आता पुरे असे वाटून इंजेक्शने औषधे घेतली पण उपयोग शून्य. एकदा स्वप्नात साईबाबांनीच आता औषध वगैरे घेऊ नको सर्व सुरळीत होईल असे सांगितले आणि आश्चर्याची गोष्ट ही कि पोट अजिबात न दुखताच नर्सहि जवळ नसताना मी आपोआप दवाखान्यातच बाळंतीण झाले व पडल्या पडल्या सभोवार पणत्या तेवत आहेत आणि त्यात साईबाबांचे दर्शन झाले.

पुढे आम्ही कऱ्हाडला राहावयास आलो. तेथील फोटोग्राफर किरपेकर यांच्याकडून साईबाबांचे माहात्म्य ऐकले व त्यांनी साईचरित्राचा सप्ताह करायला सांगितला माझ्या यजमानांना नोकरी नाही. ऐकायला येत नाही पदरात ९ मुले मुलांपैकी पण कोणी नोकरीला नाही. आज आहे तर उद्या काय करायचे ? मुलांना खायला काय घालायचे अशी परिस्थिती होती. म्हणून त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी चरित्रवाचनास सुरवात केली. सप्ताहाच्या ५ व्या दिवशीं आपल्याला शिरडीची उदी, अंगारा, तीर्थप्रसाद मिळेल का ? मिळावी असे मनात सारखे वाटत होते. त्याप्रमाणे दुपारी ज्ञानेश्वरी ऐकायला येणाऱ्या बायकांजवळ मी मनातील गोष्ट बोलून दाखविली त्याप्रमाणे सौ. कुलकर्णी ह्या आमच्या शेजारणीने, त्यांच्या यजमानांच्या कचेरीतील एक गृहस्थ ७ वाजता आले आणि त्यांनी शिरडीची उदी, अंगारा, तीर्थप्रसाद आणला आहे तो तुमच्या शेजाऱ्याना द्या असे सांगितल्यावरून त्या ते घेऊन धावतच माझ्याकडे आल्या त्यामुळे पोथी वाचायला दुसऱ्या दिवशी जास्तच उत्साह वाटू लागला व त्या उत्साहात मी सप्ताह पूर्ण केला व ॥ ओम साई ॥ हा जप करू लागले.

दसऱ्याच्या सुमारास एका गुजराथी बाईने १७००० रु. चें चांदीचे सिंहासन बाबांना अर्पण केले आपणहि काही द्यावे असे वाटले पण मी काय देणार ? मी

फक्त १॥ रु. देण्याचे ठरवले. त्याची मनीऑर्डर केली पण मी गरीब माझ्या १॥ रु. ला कोण विचारतो ? असे वाटले. मनिआर्डर केल्यापासून साधारण प्रसाद उदी येण्यास १५ दिवस लागतात. परंतु मला मात्र ३ रे दिवशीच शिरडीच्या उत्सवाच्या दिवशी म्हणजे दसऱ्यालाच उदी, अंगारा, प्रसाद मिळाला, आणि बाबा खरोखरीच गरीबांचे पण वाली आहेत असे मनात आले आणि मला वारंवार दर्शन घडू लागले. पुढे मी बाबांना नवस केला की माझ्या मुलीचे (उषाचे) चांगल्या ठिकाणी लग्न व्हावे व तसे झाल्यास मी भात सोडीन असा संकल्प केला आणि त्याच साली तिचे उत्तम ठिकाणी लग्न जमले व व्यवस्थित पार पडले आणि मी त्याप्रमाणे भात सोडला व शिरडीला दर्शनासाठी निघाले. माझे यजमान, मी, बरोबर धाकटा मुलगा, माझी बहीण तिच्या सासूबाई व जाऊ अशी आम्ही मंडळी पुण्याहून शिरडीला निघालो कोपरगाव स्टेशनवर उतरलो आणि माझी एक साड़ी स्टेशनवर हरवली परंतु मी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले १ तासाने बस आली आम्ही शिरड़ीला पोहोचलो परंतु माझी साडी मला परत मिळायची होती. कोपरगावहून आम्ही १ ल्या बसने गेलो आणि ९ व्या खेपेच्या बसने एक बाई आली आणि तिने ही घ्या तुमची साड़ी असे म्हणून तिने ती साडी माझ्या हातात दिली. पुढे आणखीनच आश्चर्य घडले आम्हाला धर्मशाळेत खोली मिळाली नाही. आम्हीं सार्वजनिक हॉलमध्ये जाण्यासाठीं आम्हीं जिना चढत असता माझ्यामागून कोणीतरी एक खूप म्हातारे गृहस्थ अंगावर फक्त लंगोटी असे येत होते व ते मला म्हणाले मला काही तरी दे मी सोलापूरहून खूप लांबून आलो आहे दे लवकर पण मी काय देणार ? आपण ह्यानी बरोबर आणलेले फराळाचेच द्यावे असा विचार करून हॉलमध्ये आल्यावर मुलाला खाली ठेवून फराळाचे काढून घेऊन द्यावयास गेले तो तेथे कोणींच नाहीं. धर्मशाळेच्या सर्व खोल्या, आजुबाजूचा परिसर शोधला पण पत्ता लागला नाहीं. पण मग मनाला फारच रूखरूख लागलीं, दर्शनाची तळमळ पण लागलीं मीं अगदीं अस्वस्थ बेचैन झाले. फराळाच्या डब्यातील सर्व अन्न इतके नासले कीं त्याला कुत्रींसुद्धा तोंड लावीनात. असो पुढे ६ महिने मीं खूपच अस्वस्थ झाले कारण त्यावेळीं मी शिरडींला काहीच पाहू शकले नव्हते. आपण निदान त्यावेळीं नमस्कार तरी करायला पाहिजे होता असे वारंवार वाटे परंतु ६ महिने झाल्यानंतर एक दिवस धड झोप नाही धड जागृतावस्था नाही. अशावेळी त्याचवेळचे ते बाबा स्वप्नात दिसले भव्य उंचनीच आजानुबाहू व्यक्ती, हातात काठी, कमरेला फक्त लंगोटी, गोंदरीशुभ्र दाढी त्यानी मला हे बघ त्या वेळी तुला पाहता आले नाही ना ? हे चांदीचे घंघाळ तांब्या ताम्हन समया छत्र वगैरे दाखवून मोठ्याथोरल्या पातेल्यातून मला शिऱ्यांचा प्रसाद दिला त्या प्रसादातून तूप खाली गळत होते तो प्रसाद मी

घेतला आणि त्यांनी माझ्या डोक्यावर ॐकार काढला आणि मी जागी झाले व माझे मन अगदी शांत झाले तेव्हापासून शिरडीला सुद्धा जायची आता आपल्याला गरज नाही असे वाटले इतके समाधान प्राप्त झाले " बाबांची कृपा " दुसरे काय पर्यायाने परमेश्वरी कृपाच नाही का ?

# बाबा आणि दूरध्वनी

— श्री. सुरेश सातपुते
सातपुते स्टोअर्स, लालबाग-१२

● कित्येकदा साध्या सुध्या गोष्टी देखील मनाप्रमाणे घडवून बाबा चकीत करतात. त्यापैकीच ही गोष्ट ! माझे टेलीफोनचे बिल भरण्याचे राहिलेले असते. कंपनीतून फोन येतो. हॅलो ! डबल फोर सिक्स फाईव्ह फोर झीरो ? मी 'होय' म्हणताच पलीकडून आवाज येतो " मी टेलीफोन कंपनी मधून बोलतोय ! आपले बील बाकी आहे ! ते उद्यापर्यंत भरून टाका नाहीतर फोन कट करू ! " आणि पलीकडे रिसीव्हर आदळला जातो.

परंतु दोन दिवस वेळच मिळत नाही. बील भरणे होत नाही. सोमवारी बिल आणि पैसे घेऊन निघतो. तत्पूर्वी बाबांना गंमत म्हणून म्हणतो. " बघा टेलीफोन कट होता कामा नये...नाहीतर पंचवीस रुपये फुकट जाणार ! मी पावकिलो पेढे ठेवीन " मनात विचार येतो पावकिलो पेढ्यासाठी पाच रुपये गेले तरी विस रुपये नेट प्रॉफीटच ! पाहू बाबा तरी काय करतात ? (वस्तुतः ते पेढे देखील नंतर आम्हीच खाणार हे बाबा व मी देखील जाणून असतो. नाहीतर त्या जगन्नाथास पाव किलो पेढयाची एवढी काय पडली आहे ?) केम्पस कॉर्नर जवळील टेलीफोन कंपनीच्या तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयात दाखल होतो. चौकशी करतो. अधिकारी ओरडतो-अहो ! हा कट झालाय !

वॉर्निंग देऊन सुद्धा तुम्ही लोक बील भरत नाही ! मग करायच काय ? विचारात पडलो ! तो बाबा दिसतात ! पुन्हा म्हणतो प्लीज ! बघा जरा ! अधिकारी थोड्याश्या वैतागाने तरा तरा उच्चाधिकाऱ्याच्या टेबलापाशी जातो...दोन तीन फाईल्स उलटया सुलटया करतो. त्यातील एक न्याहाळून माझ्या जवळ येतो—" अहो तुमचा फोन अद्याप कट झाला नाही ! जा ! पहिल्या माळ्यावर पैसे भरून येऊन रसीट दाखवा

म्हणजे ऑर्डर रद्द करतो !" अर्थातच हुकमाची अंमल बजावणी होते...पंचवीस रुपये वाचतात...पाच खर्च होतात...बाबा पुढे पेढे ठेवले जातात. थोड्या वेळाने ते आम्हीच खात असतो. बाबा मात्र आमचा पोरकटपणा पाहून मिशीतल्या मिशीत हसत असतात! कारण टेलीफोन बील वेळेवर न भरणे ही चुक माझीच! बाबांना मात्र महत्वाची कामे टाकून टेलीफोन ऑफीसात जाऊन ऑर्डर थांबवून ठेवावी लागते आणि त्या बद्दल बाबा पेढे न खाता–चुक करणाराच पेढा खात असतो. मग बाबा हसणार नाही तर काय?

असो, आपल्या जीवनात बाबांच्या स्वानुभवाची अशी अनेक फुल विखुरली आहेत. त्यातीलच आज एक गोळा केलेले...आणखी पुढे पाहु–वेळ येईल आणि बाबांची आज्ञा होईल तेव्हा!

# कर्ता करविता साईनाथ!

—सौ. सुनंदा मधुकर कोकाटे
११/दत्तधाम प्लॉट गोखले रोड,
उहाणूकरवाडी ७०,
कांदीवली पश्चिम, मुं. नं. ६७.

गुरुवार दिनांक २६ जुलै १९७९! सर्वांच्याच स्मरणात हा दिवस असेल. ह्या वर्षीच्या पावसाळ्यातील हा गोंधळाचा दिवस माझ्या तरी विशेष स्मरणात राहील. आणि त्याचे कारण साईबाबा!

माहीम ते माटुंग्याच्या दरम्यान अंधेरी लोकलचे काही डबे रूळावरून घसरल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. मी लोअर परळच्या शाळेत बारा ऐवजी सव्वा दोन वाजता पोहोचले व साडेचारला आम्ही शाळेतून परत निघालो सुद्धा. कारण प्राप्त परिस्थितीच्या गोंधळात घरी त्यातल्या त्यात लवकर पोहोचावे हा उद्देश!

माझे यजमान त्या दिवशी सात ऐवजी नऊ वाजता घरी आले. दर गुरुवारी येताना ते बाबांसाठी सुंदर हार व इतर छोटे चार हार आणतात. रात्री उशीर झाल्यामुळे फुलवाल्याचे दुकान बंद झाले व हार मिळाले नाहीत. घरी आल्यावर ते मुलांना रागावून म्हणाले, "अरे तुम्ही तरी हार आणून ठेवायचे. आजचा गोंधळ लक्षात घेता तुमची अक्कल चालवायला हवी होती." हे ऐकताच मी मनात

म्हटले हार मिळाला नाहीं तर साईबाबा थोडेच रागावताहेत. मी प्रकटपणे म्हटले, "बाबाना जर तुमच्या हाराची आवड असेल तर ते स्वतःची व्यवस्था स्वतःच करतील. प्रत्येक गुरुवारी बाबाच स्वतःचे हार तयार करवून आणवून घेतात हे आपण लक्षात ठेवले पाहिजे."

आणि काय आश्चर्य दहा मिनिटे सुद्धा गेली नाहींत. माझी गोरेगावची बहीण व मेहुणे जुईचा पांढरा शुभ्र अबोलीच्या फुलांनी सुशोभित केलेला जाडजुड हार घेऊन आमच्या घरी साडे नऊ वाजता हजर !

बाबांनी इतक्या झटपट सर्वांना चकीत करून सोडले आणि भक्ताचे शब्द खरे करून दाखविले यावर बाबांच्या ठिकाणी अनन्य श्रद्धा असलेल्या भक्ताखेरीज कोणाचा बरे विश्वास बसेल ?

● ● ●

# धन्य बाबा धन्य त्यांची प्रचिती

—डॉ. सौ. सुमती खानविलकर
सीताकुंज, लोनावळा

● चिंता करू नकोस मी आहे असे बाबा सांगत याची प्रचिती आज आली, माझी मुलगी सौ. मैथ्या हिच्या दोन दिवस सारखे राहून राहून पोटात दुखत होते परंतु प्रोग्रेस काही होईना, बाळंत पणाच्या कळा बरोबर येईनात, घरात मी एकटीच होते काय करावे काही सुचेना. इतक्यात दुपारचे दोन वाजले. मी तर बाबांना सारखी हाका मारत होते. सांगत होते, "बाबा किती हो अंत पहाता कर्तव्य करता करता मी थकले." पण खरंच बाबा धावून आले माझी मुलगी सांगत होती आई मी थकले ग काय करू मी माझ्या मदतीला दुसऱ्या डॉक्टरना बोलावले होते. ते पण घरी नसल्यामुळे येऊ शकले नव्हते इतक्यात मैथ्या मला सांगू लागली की आई बघ बघ बाबा सफेत कपडे घालून सफेत रथ घोडे असलेला त्यावर बसून इकडे येत आहेत. मी पण समाधीला नमस्कार करत-बाबा कसे हसतात बघ सांगा असे बडबडू लागली पण मायेनी गोंधळून गेलेली मी घाबरले बाबांची कीमया कळली नाही. ती नियमीत बाबांची सेवा, पूजा, वाचन करते मी आणखीनच घाबरले काय झाले हिला समजेना. मला रडूच यायला लागले. इतक्यात मदतीला येणारे डॉ. गाडी घेऊन आले पण खरे सांगू का पाच मिनीटात इतका प्रोग्रेस दिसला जादूची कांडी फिर-

दिल्याप्रमाणे अगदी ३-०० ला ती सुखरुप बाळंत होऊन मुलगा साडेसहा पौंडाचा झाला आता सांगा काय व किती वर्णन करू!! आपल्या प्रेमळ माय माऊली बाबांचे धन्य बाबा आणि धन्य त्यांची भक्तांसाठी धावण्याची रित. असाच लोभ आम्हा सर्वांवर बाबा असू द्या. त्या डॉक्टरांच्या रूपानेच बाबा रथातून धावत बसून आले असे मनाला वाटू लागले. धन्य बाबा धन्य प्रचिती.

★ ★ ★

# बाबांनी जागा अडवली होती !

—श्री. नागोराव विश्वनाथ जाधव
पोस्ट ऑफिस अहमदपूर
जि. उस्मानाबाद.

● जनता जनार्दन मधून श्रीसाईबाबा विषयी खूप ऐकलं. साईलीला मासिकातून पण बरचसं वाचलं व बाबांच्या विषयी ध्यास लागला.

मी सहकुटुंब रामेश्वरला जात असता मद्रासला मुक्काम पडला. रामेश्वर गाडीने पुढे जावयाचे होते. बरोबर वृद्ध बहिण पत्नी, मुले मिळून आम्ही अकरा माणसं होतो. जागा मिळणे दुरापास्त. मग आम्ही हमालाला दहा रु. देवून जागा मिळवून देण्याची विनंती केली. तरी पण तो अकरा जागा देऊ शकला नाही. त्याने दाखविलेल्या जागेवरच एक वृद्ध गोसावी येऊन बसला. त्यांना तो हमाल उठवू लागला. तर ते गोसावी बाबा स्वच्छ मराठीत त्यास म्हणाले "अरे माझं माणूस येणार आहे, तत्क्षणी माझे लक्ष त्यांचेकडे गेले व माझी वृद्ध बहीण तेथे आली. व तेथून गोसावी बाबा " अरे हा कोठे गेला असं पुटपुटत पार नाहीसे झाले. मनात विचार करण्यास पुरता वेळ मिळण्याच्या आत श्रीबाबांची मूर्ती निघून गेली. नंतर मी खूप शोधलं पण बाबाजी दिसले नाहीत. असे अनुभव मला नेहमीच येत आहेत हं-बाबाजी असे न कळत कां होईना नेहमी सहकार्य देतात. त्यांनी धरलेल्या जागेवर भगिनी विराजमान झाल्या. असं काही घडल्यावर माझे कर आपोआप जोडले जातात.

● ● ●

# श्रीसाईबाबांबद्दलचा एक गोड अनुभव

— श्रीमती सरस्वती दामोदर पालके
वडगाव शेरी पुणे १४ ( जिल्हा-पुणे )

● मी आर्य क्षत्रिय जातीची असून माझा जन्म इ. स. १९३६ साली मद्रासमध्ये झाला. मी महाराष्ट्र राज्याच्या पुणे जिल्ह्यातील वडगाव शेरी या गावात रहाते. सन १९५५ पावेतो साईबाबांची माहिती मला मुळीच नव्हती. सतत दोन तीन वेळा बाबांच्या प्रतिमा सापडत गेल्यामुळे मी त्यांची मनापासून भक्ती करू लागले. आज २५ वर्षे बाबांच्या सेवेत मी मग्न आहे.

समर्थ साईबाबांवरील उत्कट भक्तीचे प्रतीक म्हणून एक छोटसं मंदिर मी बांधलय. मंदिरात बाबांची स्थापना वैशाख शुद्ध तृतिया. ( अक्षयतृतिया, २१ एप्रिल १९७७ ) रोजी झाली. दरवर्षी याच तिथीला मी बाबांचा उत्सव यथाशक्तीप्रमाणे साजरा करते.

यंदा २९ एप्रिल १९७९ ( अक्षयतृतिया ) या दिवशी पुजेसह इतर सर्व कार्यक्रम पार पाडण्यात आले. यावेळी आम्ही लहानलहान मुलांना गोड जेवण दयावे असे ठरविले. जेवणाचा हा कार्यक्रम १२ ते १२॥ च्या दरम्यान सुरू झाला.

तत्पूर्वी ज्या खोलीत मुलांना बसवावयाचे होते त्या खोलीतील ९ फूट उंचावरील बल्ब उसळी घेऊन फरशीवर पडला. बल्ब काचेचा, आणि तोही इतक्या उंचावरुन व तो पण फरशीवर ! वास्तविक पहाता बल्बचे लहान लहान तुकडे व्हावेत, पण साईबाबांच्या अगाध शक्तीमुळे त्या बल्बला एक सुद्धा चीर पडली नाही. "माझी सेवा तू इतक्या आत्मीयतेने करतेस यात मी संतुष्ट आहे." असेच बाबांनी या चमत्कारातून सूचित केले आहे. आम्हाला या घटनेमुळे अपार आनंद झाला. अगाध आहे साईबाबांची लीला !

* * *

● परम साईभक्त आणि मुंबापुरीच्या सेंटॉर हॉटेलचे एक व्यवस्थापक श्री. कमलभाई अदीब यांची मुलाखत, गाठीभेटी या सदरात जानेवारी अंकात वाचा.

# शिरडीस आलो नि गाठी पडल्या

—सरदारसिंह परिहार
आयुध निर्माणी परिसर,
अंबाझरी, नागपूर.

● जेव्हा डॉक्टराकडून आजार बरा व्हायचे लक्ष दिसेना तेव्हा शेवटी साईबाबांवर विश्वास ठेवून सर्व औषध बंद केले, व फक्त सकाळ संध्याकाळ 'ऊदी' घेत गेलो व थोडी ऊदी गळयाच्या गाठींना सुद्धा लावत गेलो. त्या पासून थोडा फायदा झाला मात्र पूर्णतः गाठी विरल्या नाहीत. आजाराला टॉनीक म्हणून साई-चरित्राचे पारायण चालू केले.

पारायणाला ४–५ दिवस होत नाहीत तोच शिर्डीला दर्शना करीता जाण्याचा योग आला. जेव्हा नागपूर स्थानका वरून शिर्डीला जाण्याकरीता गाडीत बसलो तेव्हा पुन्हा एकदा साईनाथांची आठवण करून त्यांना प्रार्थना केली की बाबा मी आपल्या दर्शनास येत आहे. परंतु मला प्रवासात कुठल्याच प्रकारचा त्रास होऊ देऊ नकात, आणि खरोखरच मला साईनाथांच्या आशिर्वादाने कुठलाच त्रास झाला नाहीं.

मी आनंदाने शिर्डीत येऊन पोहोचलो. पहाटेच्या आरतीमध्ये जेव्हा मी आरती करीता उभा होतो तेव्हा माझा एकदम जीव मळमळायला लागला व मंदिरा-तून बाहेर येऊन मी ओकारी केली. एकदम पोटामधून हिरवे पिवळे पदार्थ पडावयास लागले, आणि तेव्हा पासून माझा आजार बरा झाला असून आज पावेतो मला कुठलाच त्रास झाला नाहीं. हा साईनाथांचाच चमत्कार म्हणावयास हरकत नाही.

* * *

## श्रीसाईलीला–लेखक–कवी संमेलन

● श्रीसाईलीला आगामी लेखक–कवी संमेलनाची संपूर्ण योजना अद्याप तयार झाली नसल्याने त्या संबंधीचा तपशील जानेवारी १९८० चे अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

— का. संपादक

# श्रीबाबांच्या जपनामाने मुलगा बरा

—सौ. अहिल्याबाई कृ. उपरकर
वेलजी ल. चाळ खो. नं. ३/२३६
७५ बेलव्हिडर रोड, माजगाव मुं. १०

● माझा ३ नंबरचा मुलगा महादेव कावीळीने फार आजारी होता त्यावेळी बाबांचे नाव घेऊन मी माझे औषध सुरू केले. त्याला अन्न खपत नव्हते. फक्त शहाळयाचे पाणी पीत होता. आजारी पणास आठ दिवस झाले. मी माझे यजमान श्री. कृ. म. उपरकर यास सांगितले की तुम्ही डॉक्टर अण्णासाहेब गव्हाणकर यांजकडे जावून सांगावे, त्यांनी जावून वरीलप्रमाणे सांगितले परंतु ते घरातून गेल्यानंतर मुलाचे आजारी पण जास्त झाले. त्यानंतर मी त्याचे पायाजवळ बसून १॥ तासात बाबांच्या नावाचा जप केल्यानंतर त्याला बरे वाटले. ( १०००० जप ) मुलांचे शिकपणा जास्त झाल्याचे यजमान यास वाटेत कळले. तेव्हा त्यांनी येऊन डॉक्टरना आणले. त्यानंतर मुलास बरे वाटले. नंतर तो बाबांच्या कृपेने बरा आहे. मी बाबांना म्हणाले, बाबा हे अनुभव साईलीलेत देईन असा नवस केला होता. अशी ही दयाळू साईमाऊली माझ्या नवसाला पावली अशा प्रकारे अनेक वेळा मला अनुभव आले आहेत, या मुलाचे नाव डॉ. अण्णासाहेब यानी ठेविले आहे महादेव.

* * *

# माझ्या पाकिटातील साईबाबा

—श्री. विजय निरखे
एम्. पी. ईले, बोर्ड,
रामपूर (जबलपूर) (म. प्र.)

●माझ्या खिशातील पाकिटात श्री बाबांचा ताईत आणि उदी असते, आणि त्याचे मला अनेक चमत्कार आले पण आज मला बाबांच्या मायेचा जो अनुभव आला तो अवर्णनीय.

जबलपूर दिनांक १० जून ७९ वटपौर्णिमेचे दिवशी दरसाल प्रमाणे मामांकडे रामपूर भागात पुजेला गेलो होतो. सायंकाळी सुमारे ५–५॥ वाजता घरी येण्यास मी सौभाग्यवती आणि एकवर्षाचा सारंग बाळास घेऊन सायकल रिक्षात शिरलो.

आकाश मेघाच्छादित होते, घर एक दीड फर्लांगावर असल्याने पोहचून जाऊ, म्हणून रिक्षावाला निघाला तो काय, बापरे बाप! एकदम पाऊस व गारपीट सुरू झाली. आम्ही रिक्षात आणि चालक निवाऱ्याला उभा राहिला आणि कसचे काय तुफान जोरदार! चक्री वारे समोरून येताना दिसले नव्हे आम्ही त्यात सापडलो रिक्षेला हेलकावा बसला मी उडी मारून रिक्षा सांभाळली. चिमुकला बाळ आईचे पदराखाली लपविला. रिक्षा मागे रेटू लागताच कचरा धूळीने आम्ही बेजार झालो. सौभाग्यवती बाळावर ओणवी झाली आणि जोराची हाक दिली, "साईबाबा वाचवाहो आम्हाला या संकटातून" आणि रडू लागली आणि मला आठवण झाली माझ्या पाकीटातील बाबांची व उदी पुडीची. क्षणात पायाने रिक्षाला थोपवीत उदी आकाशाकडे उडविली, ताईत कपाळी लावला आणि साईबाबा पाच मिनिटे तरी ही आंधी थांबवा आणि आमचे रक्षण करा! विश्वास कराल का भाविक हो आलेली आंधी तुफान कसे कुणीकडे गेले व पाऊस थांबू लागला, आणि त्यामुळे आमचे जीवात जीव आला. तिचे रडणे बंद झाले. बाळाने पदरा आड डोकावून पाहिले, आणि आम्हाला एक फार मोठा धडा व अनुभव मिळाला, आज बाबांनी रक्षण केले नसते तर आमची काय अवस्था झाली असती, नकोच तो विचार आणि साईबाबांच्या आरतीमधील ती ओळ आठवते—जयामनि जैसा भाव तया तैसा अनुभव. धन्य श्रीसाईबाबा!

# मोक्षकरूनी आशिस द्याया साई प्रभू आले

—सौ. सुलोचना मधुकर जोशी
धरम पेठ, नागपूर

● १९७९ च्या होळी पौर्णिमेचा दुसरा दिवस म्हणजेच धूळवडीचा! पौर्णिमेच्या रात्री असलेले ग्रहण सुटल्यामुळे सकाळीच सगळ्यांच्या आंघोळी उरकल्या व मी नुकतीच कामाला लागले होते. घरात आम्ही चौघेच-मी, माझे पती, व दोन मुले. आंघोळी नंतर मुले रंग खेळण्यात दंग झाली होती व पतीची देवपूजा चालू होती. सकाळची जुजबी कामे आटोपून मी स्वयंपाकाकडे वळण्यासाठी स्वयंपाक घरात गेले. ह्यांची पूजा आटोपली होती. ते म्हणाले मला काही तरी थोडेसे खायला देवून तू सावकाश स्वयंपाक कर. दूधपोहे द्यावे म्हणून जवळच्याच भिंतीतील मोठ्या कपाटातील पोह्यांचा डबा कोपऱ्यातून काढला. पोहे भांड्यात घेतले व डबा बंद करून परत ठेवायला गेले तो त्या कोपऱ्यात एक नाग वेटोळे करून बसलेला! एकदम मी एक

पाऊल मागे सरकले व यजमानांना म्हणाले, "इथे तर महाराज बसलेले आहेत." क्षणभर ते सुद्धा घाबरले. काय करावे सुचेना. पण लगेच उभयतांच्या मनात विचार आला "बाबाच तर आहेत. घाबरायचे कशाला ? आपल्याला काही होणार नाही" योगायोग बघा कसा तो. माझे पती रोज साईचरित्र वाचतात. त्या दिवशी त्यांच्या वाचनात "चिथळीच्या सर्पावरील अध्यायच" आला होता. मी पटकन वाटीत दूध घेवून कपाटात ठेवले. हळद कुंकू फूले वाहून त्यांची पूजा केली. बाबांची आरती म्हटली आणि हात जोडून प्रार्थना केली की, बाबा दर्शनाने तर आम्ही धन्य झालो पण ह्या स्वरूपात दर्शनाची भिती वाटते तेव्हा आता आपण जाल तर बरे. तेवढ्यात मोठा मुलगा मनोज घरात आला. त्याने पण दर्शन घेतले. महाराज जागेवरून हलायला तयार नव्हते. शेवटी बाबांची उदी त्यांच्यावर शिंपडली तेव्हा थोडी हालचाल केली. कपाटाच्या खाली उतरले व पुन्हा कपाटात जावून बसले. जवळ जवळ पावणे दोन तास ते आमच्या घरात होते. सगळी कामे बंद होती. घरी नागपंचमीचा कुळाचार व त्यांना प्रत्यक्ष बाबाच मानल्याने मारण्याचा प्रश्नच नव्हता. तोंडाने सारखा बाबांचा धावा सुरू होता. वारंवार करूणा भाकणं सुरू होतं. कोणाला इजा होईल असं मात्र वाटत नव्हतं. दरम्यान धाकटा श्रद्धेन्दू पण दर्शन घेवून गेला. मी आणि माझे पती हात जोडून पाहत बसलो की महाराज कुणीकडे जातात कारण लागूनच दुसऱ्या खोल्या होत्या तिकडे गेले असते तर कठीणच होतं. शेवटी दीड-पावणेदोन तास झाले व माझ्या मनात विचार आला व मी हात जोडून म्हणाले, "बाबा, तुमच्या उदीने सगळ्यांचे रक्षण केले आहे. आजच ती अशी निष्प्रभ होवू देवू नका. आपली माया पुष्कळ झाली. आम्हाला भीति वाटते. आता आपण जा मी हा अनुभव साईलीलेला पाठवीन. पण आता कृपा करा आणि संकट निवारण करा" महाराज लगेच कपाटातून निघून जमिनीवर आले व बाजूच्या भिंतीतील बंद दाराच्या फटीतून घरमालकांच्या घरात गेले. जाताना फणा उगारला होता. अंगावर कवड्या असलेल्या सगळ्यांनी पाहील्या. जाताना त्यांना नमस्कार केला. ते गेल्यावर लगेच मनात विचार आला की आता ते बाबांचे रूप नाही. बाबांच्या फोटोला नमस्कार केला व मनात आल्याप्रमाणे घरमालकांना घरात साप शिरल्याची सूचना दिली. त्यांनी लगेच हुडकून त्याला सद्‌गती दिली. आमच्या घरात होते तोवरच त्यांच्यात बाबांचा अंश होता असे आम्ही मानतो. मुख्य म्हणजे जानेवारी ७९ पासून मी आजारी होते पण त्या दिवसापासून प्रकृतीला आराम पडला. माझ्यावरील संकट हरण करण्यासाठीच ह्या दिवशी बाबा शेष रूपाने माझ्या घरी आले होते. म्हणूनच काही इजा झाली नाही. अन्यथा डबा काढताना दंश व्हायला काय वेळ होता ! पण "बाबा तारणार त्याला कोण मारणार" बाबा आणि त्यांची उदी नेहमीच भक्ताना संकटापासून

वाचवते. आपलाच दृढ विश्वास नसतो व सबूरी नसते. मला तर बाबांची नेहमीच प्रचीति येते व उदीने संकट हरण होते. अशीच बाबांची कृपा सदैव आमच्यावर रहावी हीच त्यांच्याचरणी विनंती !

* * *

# आहेरामुळे अडचणीचे निवारण

एक साईभक्त, जि. कोल्हापूर

● अत्यंत सामान्य परिस्थितीतील मी एक मनुष्य. समोर नित्य नव्या अडचणी उभ्या. त्या श्रीबाबांच्या कृपेने पार व्हाव्यात. यामुळे जीवास सर्वस्वी आधार काय तो एक श्रीबाबा अशा परिस्थितीत पुन्हा एक नवीन अडचण म्हणजे मुलीचे लग्न !

माझ्या नोकरीत फिरती ही पुन्हा एक अडचणीची बाब. फिरतीमुळे मुलीसाठी स्थळे पाहाण्यास मला सवड होईना. तरीही निरनिराळ्या स्थळांविषयी पत्रव्यवहार सुरू होता. रोज रात्री श्रीबाबांना साकडे घालणे सुरू होते. अखेर स्थळ माझ्या राहात्या शहरातीलच जमले. मुलाचे शिक्षण, नोकरी, व्यवसाय, मंडळी हेही मना जोगते आढळून आले.

आता प्रश्न उरला तो पैशांच्या जुळवाजुळवीचा काही रक्कम मुलीच्या लग्नासाठी मी बाजूस काढून ठेवली होती. तथापि दोन हजार रुपयांची तरतूद करणे पुन्हा आले ! त्यामुळेही मी गांगरून गेलो. तथापि रोज रात्री बाबांकडे मनोगत बोलणे, त्यांची प्रार्थना करणे, त्यांना कार्यसिद्धीबद्दल साकडे घालणे चालूच होते.

अशा परिस्थितीत मी पुन्हा फिरतीवर गेलो. त्यामुळे घरी पत्नीची चिंता अधिकच वाढली. स्वाभीमानी स्वभावामुळे कोणाकडे हात पसरावा असे तिलाही वाटेना त्यामुळे सर्व व्यवहार्य मार्गही आम्हीहूनच बंद केले.

एक दिवस माझ्या फिरतीच्या शहरी दोन मुसलमान व्यापाऱ्यांनी माझा चिंतातुर चेहरा निरखला. चिंतेचे कारण मला विचारले. तेव्हा मी माझी आर्थिक अडचण त्यांना सांगितली. ती ऐकून ते घरी निघून गेले.

दुसरे दिवशी ते पुन्हा मजकडे आले. "तुमच्या मुलीच्या लग्नात आम्हास आहेर करावयाचा आहे, तो तुम्ही स्वीकारावा" असे म्हणू लागले. त्यांचे माझे संबंध ध्यानी घेता मी या गोष्टीस होकार दिला.

मी जाण्याच्या दिवशी ते दोघे पुन्हा मजकडे आले. प्रत्येकाने वर 'आहेर' असे शब्द लिहून दोन पाकिटे माझ्या हाती दिली. गाडी सुटल्यानंतर पाकिटे उघडून मी पाहातो तर प्रत्येक पाकिटात अकराशे रुपये!

ही लाच नव्हती. कारण आमचे व्यापारीसंबंध त्या तऱ्हेचे नव्हते. एका सज्जना बद्दल कणव वाटून दुसऱ्या दोघा सज्जनांनी प्रकट केलेले हे प्रेम होते.

• • •

# जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

—सौ. अपर्णादेवी अशोकराव साळोखे
घर नं. ९२०, बी वॉर्ड, रविवार पेठ,
कोल्हापूर ४१६००२.

* लग्न झाल्यापासून शिर्डीला जायचे असे मनात होते. पण ते जमतच नव्हते. पण अखेर गेल्या वर्षी मी बाबांना साकडे घातले, "बाबा, जर मला या चार दिवसात तुम्ही मला शिर्डीला नेले नाहीत तर मी तुमच्यापासून कायमची दुरावेन!" पण बाबा भक्तांच्या प्रेमाचे भुकेलेले. त्यांनी चारच दिवसात आम्हाला शिर्डीला नेले.

५ जून १९७८ चा तो दिवस. आम्ही कोल्हापूर सोडल आणि रात्री ९ वाजता पुण्यात आलो. तिथे मुक्काम करून आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी साडे नऊ वाजता पुण्याच्या स्टँडवर आलो ते सकाळी सव्वा दहाच्या गाडीने शिर्डीस जाण्यासाठी! अकरा वाजले तरी गाडी लागलीच नाही. गाडीची तर आम्ही आतुरतेने वाट पहात होतो. तोपर्यंत एक ड्रायव्हर माझ्या मिस्टरांजवळ आला आणि त्याने होऊनच विचारले, "तुम्ही शिर्डीला जाणार आहात का? ते बघा, ती जादा गाडी सोडायची आहे. ती तिथे बाजूला लागली आहे."

आम्ही त्या गाडीत जाऊन बसलो. मनात शिर्डीची ओढ लागली होती. प्रवास चांगला चालू होता. मधल्या गावापर्यंत आलो, आणि गाडीचा फॅनबेल्टच तुटला. इंजिन खूपच तापले. गाडीचं जाणं अनिश्चित बनलं. ती तिथच थांबली. फॅनबेल्ट बदल्याशिवाय गाडी जाणार नाही. अशी स्थिति झालेली! ट्रक्स आले गेले. बसेस आल्या गेल्या पण कुणाकडेच फॅनबेल्ट मिळाला नाही. जवळ-जवळ तास गेला. आम्हाला तर कधी एकदा शिर्डीला जातो आणि बाबांना डोळा भरून पाहतो असे झाले होते. आमच्यासह तीन लहान मुले पण होती ती तर कंटाळून

गेली होती. मनात बाबांचा धावा चालूच होता. अचानक ड्रायव्हरच्या मनात काय आले कुणास ठाऊक ? तो म्हणाला, "दोरीचा बेल्ट करून गाडी सोडू या. जियपर्यंत जाईल तिथपर्यंत जाऊ दे." त्याने बाबांचं नाव घेतले आणि दोरीचा बेल्ट करून गाडी चालू केली. ते १५ मैल अंतर काटून स्टॅन्डवर गाडी थांबली ते स्टॅन्ड होते शिर्डी ! गाडी थांबली तेव्हा इंजिनमधले पाणी अक्षरशः उकळत होते. ते पाहून ड्रायव्हर म्हणाला, "बाबांची कृपा ! इथून पुढे कोपरगावला ही गाडी जाऊच शकणार नाही." खरंच ! त्या बाबांनाच सगळ्यांची काळजी. कुठही जा ते सावलीसारखे पाठीमागे असतात यात तिळमात्र शंका नाही.

शिर्डीला गेलो त्यादिवशी आम्हाला कुठच खोली मिळत नाही. रात्री उशीरापर्यंत बाबांच्या समाधीमंदिरात बसलो. अकरा वाजले परत चौकशीला गेलो तरी जागा खाली नव्हती. लहान लहान मुलांना घेऊन कुठे झोपायचे या विचारात होतो. तेवढ्यात एक मनुष्य तिथे आला. तो म्हणाला, "माझ्या घरात एक खोली रिकामी आहे तिथे आज रात्रीपुरते झोपा." रात्र त्याच्या घरी काढली. सकाळी सहा वाजता आम्हाला खोली मिळाली. बाबांनीच ती मिळवून दिली असावी, त्यांनाच तर आम्हा सर्वांची काळजी. तीच तर सर्वांची माऊली, साईमाऊली !

चार-पाच दिवसाच्या सुखसमाधानी मुक्कामानंतर परत निघालो. बाबांचा निरोप घेताना डोळे वाहु लागले. स्टँडवर आलो. बरोबर खूपच सामान होते. कोपरगावाहून गाडी आली. गडबडीन आम्ही सामान गाड़ीत चढवले, आणि गाडीत बसलो. गाव सोडून तीन चार मैल झाल्यानंतर आमच्या लक्षात आले की बाबांचा प्रसाद घेतलेली पिशवी धावपळीत स्टॅण्डवरच राहीली ! कुणाकुणाला द्यायला म्हणून घेतलेले प्रसादाचे पुडे, उदी, पूजेच्या प्रसादासकट त्या पिशवीत. नेमकी तीच पिशवी विसरलेली पाहून खूप खूप वाईट वाटले. सामानातली दुसरी पिशवी नाहीशी झाली असते तरी चालले असते. पण प्रसासादाचीच पिशवी राहीलेली. मनाला चैनच पडेना. माझे मिस्टर रहात्याला उतरले व परत शिर्डीला जाणाऱ्या बसची वाट पहात थांबले. मी लहान मुलाना घेऊन पुढे पुण्याला निघून आले. ते जवळजवळ दोन तासानी शिर्डीला पोहचले. पहातात तो काय ! ज्या ठिकाणी आम्ही बसलो होतो त्याच ठिकाणी प्रसादाची पिशवी जशीच्या तशी होती. इतकेच नव्हे तर कंडक्टरने रहाते ते पुणे इथपर्यंतचे मिस्टरांच्या तिकीटाचे पैसे मला न मागता परत दिले. काय त्या माउलीचा महिमा वर्णावा तेवढा थोडाच ! मनापासून भक्ती केली की ती माऊली सदैव तुमच्या पाठीशी राहीलीच पाहिजे. त्याशिवाय का आमचा प्रसाद आम्हाला जसाच्या तसा परत मिळतो.

# .... आणि साईकृपा झाली ....

—श्री. प्रकाश प्र. कर्पे
५/२, काछी मोहल्ला शिवकुटी, इंदोर (म. प्र)

• मी स्टेट बैंक ऑफ इन्दौरच्या देवास शाखेत नोकरीला होतो. नोकरीसाठी रोज इन्दौरहुन देवासला येतजात असे. यामुळे रोज पाच रुपये भाडयाचा खर्च, तीन तासाचा दुरुपयोग शिवाय शारीरिक दगदग होत असे. शिरडीला लेखक-कवींच्या सम्मेलनास जाण्याच्या पूर्वी माझी इंदौरला बदली झाल्याचे कळले होते, पण जोपर्यंत जागेवर दुसरा माणूस येत नाही तो पर्यंत तेथून सुटका होण्याचा प्रश्नच नव्हता. जानेवारीत शिरडीला संमेलनानिमित्त जाण्याचा योग आला. सर्वजण सुट्टीवर होते तरी पण मला साईकृपेने सुट्टी मिळाली. जाताना मात्र मॅनेजर साहेबांनी साईप्रसाद म्हणून एक चांदीची अंगठी आणायला सांगितली. संमेलनातून परतल्यावर मी जेव्हा साहेबाना अंगठी दिली तेव्हा त्यांनी मला पहिला प्रश्न हाच विचारला-तुला केव्हा रीलीव व्हायचे आहे? क्षणभर तर मला स्वप्न बघत असल्याचा भास झाला, पण पुन्हा तोच प्रश्न विचारला तेव्हा मी भानावर आलो. कारण इतक्या लवकर म्हणजे जागेवर माणूस आल्याशिवाय मला रीलीव करण्याचा विचार साहेबांच्या मनात येईल असे वाटले नव्हते. शिवाय ज्या मॅनेजर विषयी सर्वांचे हे मत होते की त्याला दुसऱ्याचे चांगले पाहवले जात नाही. त्याच्या तोंडून हा प्रश्न ऐकला तर मला हेच वाटले की त्यांच्या तोंडून श्रीसाईबाबांनीच हा प्रश्न विचारला आहे. मी त्यांना उत्तर दिले की रोज येण्याजाण्याचा त्रास तर तुम्ही बघतच आहात. तेव्हा लवकरात लवकर मला येथून रीलीव करावे, आणि खरोखरच ३ फेब्रुवारीला त्यांनी मला तेथून रीलीव केले व ५ फेब्रुवारीला मी इंदौर मध्ये हेडऑफिसात नोकरीवर गेलो. श्रीसाईकृपेने नव्या जागेवर पण पहिल्याच दिवशी चांगला जम बसला व मनाप्रमाणे विभाग मिळाला आता सर्व कार्य सुरळीत चालू आहे. मात्र देवासला माझ्या जागेवर अजून-पावेतो माणूस आलेला नाही.

# "घार फिरे आकाशी" "चित्त तिचे पिलापाशी"

—सौ. सिंधु देविदास मुळीक
उंटखाना, अशोक चौक,
शिंगणे यांचे घरी, नागपूर.

* दरवर्षी प्रमाणे मागील वर्षीं आम्ही दिवाळीस शिरडीस गेलो. तिथे पाच दिवस मुक्काम करावा असे ठरविले. आम्हाला दोन दिवसासाठी निंबवृक्षाजवळील खोली मिळाली. घाईगर्दीच्या काळातही साईनाथांनी आमची काळजी घेतली. ह्यांनी प्रमुखास भेटून विनंती करून आणखी तिन दिवस अधिक वाढवून घेतले. पाच दिवस राहावयाचे ठरवूनही आम्ही पाचवे दिवशी दुपारलाच शिर्डीहून जाण्याचे ठरविले व बसस्थानकावर पोहचलो. आम्हीं मुलाबाळासहीत नऊ जण होतो. तिकीट काढीत असतानाच सर्व मंडळीं बसकडे गेली. सर्व बसमध्ये बसले का ? असे विचारले असता ह्यांनी होकार दिला. सरते शेवटी मी बसमध्ये गर्दीत दारातच उभे राहिले. कोपरगावला बस आल्यावर थोडी रिकामी झाली तेव्हा मी शोध घेतला तर माझी मुलगी व मोठी बहीण शिर्डीतच राहिल्या असे कळले. माझ्या बहिणीचा हा प्रथमच प्रवास होता, शिवाय सर्व पैसे व तिकीटा मजजवळ होत्या. त्यामुळे ती घाबरली असेल, व आता काय करावे या विचाराने आम्ही घाबरून गेलो. नंतर बहिणीच्या मुलास परत दुसऱ्या बसने शिर्डीस पाठविले व आम्ही मनमाड स्टेशनवर आलो बहिणीच्या मुलाचाही हा प्रवास प्रथमच होता. तो रात्रीं त्या दोघींना घेऊन मनमाडला आला. तोपर्यंत आमच्या जीवात जीव नव्हता. आम्ही साईनाथाचा सारखा जप करीत होतो. त्या अवधीत आमची शेगावला जाणारी गाडी देखील सुटून गेलीं. अशाप्रकारे आम्हाला साईबाबांतर्फे सौम्य अशी शिक्षा मिळाली.

साईबाबा हयात असताना त्यांचे आज्ञेशिवाय कोणी शिर्डीहून परत जाऊ शकत नव्हते अथवा जास्त राहू शकत नव्हते. त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन जर मुद्दाम करण्यात आले तर त्याचा दृष्टांतही तावडतोब मिळतो.



# श्रीबाबांची अद्भूत लीला

—श्री. दिपक हरि सावंत,
७ कृष्णकुंज, सहकार मार्ग, विलेपारले (पूर्व)

● मी हॉटेल होरायझन्क्षनमध्ये आरक्षण विभागाचा एक अधिकारी म्हणून काम करतो. सुमारे दोनवर्षांपूर्वी रात्रपाळीला कामावर गेलो होतो. देशी व परदेशी प्रवाशांनी आमची बैठकीची खोली अगदी खच्च भरून गेली होती. सहाजिकच मीही प्रवाशांच्या अडीअडचणी सोडविण्यात गढून गेलो होतो. इतक्यात माझी नजर हॉटेलमध्ये प्रवेश करणाऱ्या एका व्यक्तिकडे गेली. त्या व्यक्तिस आपण श्रीयुत् 'क्ष' या नावाने संबोधू या. श्री. क्ष यांनी रिसेप्शनीस्टकडे रहावयाच्या खोलीची मागणी केली परंतु त्यांचे बुकिंग नसल्याने रिसेप्शनीस्टने त्यांच्याजवळ डिपॉझीटची मागणी केली. श्री. क्ष यांचा अपमान झाला व ते तडक माझ्याकडे आले. त्यांनी मला स्वत:चे व्हिजीटींग कार्ड दिले. एकूण पेहराव बोलण्याची पद्धत व व्हिजीटींगकार्ड यावरून ती व्यक्ति फार श्रीमंत असावी असं मला वाटलं. मी रिसेप्शनीस्टला श्री. क्ष यांना डिपॉझिट न घेता रुम देण्यास सांगितले. अगदी माझ्या जबाबदारीवर. श्री. क्ष तब्बल आठ दिवस हॉटेलमध्ये राहिले व नवव्या दिवशी बिल न भरता पोबारा केला. व्हायच तेच झालं! मॅनेजमेंटकडून मला बिलाची विचारणा करण्यात आली. बिलाची रक्कम होती रुपये दोन हजार पाचशे मी तर पुरता हादरुनच गेलो. मी तीन महिन्यात बिलाची रक्कम वसूल करुन देतो असे भितभितच मॅनेजमेंटला लिहून दिले. घरी जाऊन श्री. क्ष यांचे व्हिजीटिंग कार्ड शोधून काढले व दुसऱ्यादिवशी कार्डावर दिलेल्या पत्यावर भेटण्यास गेलो; परंतु तेथे त्या नावाच्या कुणाही इसमाचं ऑफिस नव्हतं. मला श्री. क्ष यांनी बेमालूमपणे फसविलं होतं मी फार निराश झालो. मी फार निराश झालो. मी विमनस्क अवस्थेत सांताक्रूझ स्टेशनवर गाडीची वाट पहात उभा होतो. एक फकिर माझ्यासमोर येऊन उभा राहीला. मी त्याच्या हातावर दहा नविन पैशाचं नाणं ठेवलं. पैसे हातावर ठेवले मात्र—फकिरही नाही व पैसेही नाहीत. ते साईबाबा होते तर! तो दयार्द्र चेहरा आठवला व अंगावर काटा उभा राहीला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी वडाळा येथील माझे गुरु श्री. विश्वनाथबाबा पिंगुळकर यांना भेटावयास गेलो. ते एक महान साईभक्त आहेत. गेली कित्येक वर्षे मी त्यांच्या आशिर्वादाचा लाभ घेत आहे. मी झाला प्रकार त्यांना सांगितला त्यांनी मला धीर दिला व श्री. क्ष स्वतःच्या पावलांनी परत येतील असे सांगितले.

श्री. क्ष पळून गेल्याला आज एक महीना पूर्ण झाला होता. आईच्या इच्छेवरून मी बाँबे सेंट्रलला जाऊन शिरडीची तीन तिकीटे विकत घेतली. आम्ही तीन दिवसानी शिरडीस निघणार होतो. मी तिकीटे घरी आणून ठेविली व कामावर गेलो. साईबाबांची लीला काय अगाध आहे पहा. श्री. क्ष यांचा फोन आला. त्यांना रहावयाला खोली पाहिजे होती. मी त्यांना ओळखत नाही असे दाखवून म्हणालो, "साहेब, मी फक्त अर्धा तासच आपली वाट पाहू शकतो." श्री. क्ष यांनी ते कबूल केले. सांगितल्याप्रमाणे श्री. क्ष अर्ध्या तासात हजर झाले. ते येताक्षणीच आमच्या हॉटेलच्या सिक्युरिटी गार्डसनी पूर्वसूचनेनुसार अटक केली. श्री. क्ष यांनी बिलाची पूर्ण रक्कम भरली. मी मनोमन साईबाबांचे आभार मानले व नव्या जोमाने कामास सुरुवात केली.

# संकट मोचन श्रीसाई

— श्री. सुभाष अनन्त वैद्य, एम. कॉम.
स्टेट बँक ऑफ इंडिया, धार. (म. प्र.)

● आम्ही माझ्या साडूंच्या भावाच्या लग्नासाठी उज्जैनला जाणार होतो. सर्व तयारी झाली. पहाटे उठल्याबरोबर श्रीबाबांच्या फोटोस नमस्कार केला. परंतु त्यावेळी न कळे का बाबांचे डोळे निस्तेज वाटले व मन जरा खट्टु झाले. अजाणताच मी सौ. स व मुलास बरोबर येण्यास नकार दिला व मी एकटाच लग्नास निघालो. माझे बरोबर सौ. सासुबाई व धाकटी मेव्हणी तसेच तिचे यजमान पण आले. लग्न सुखरूप पार पडले. परत येण्यास निघालो तर बस स्टॅण्डवर बस जणु आमचीच वाट पहात होती त्यामुळे आनंद झाला. बस तत्काळ इंदूरास निघाली. ड्रायव्हरने बस सुरू केली तीच अत्यंत वेगात व तो वेग कोणत्याही परिस्थितीत चालक कमी करण्यात तयार नव्हता. समोर पुल आले. उतार-चढाव आले, अनेक अडचणी आल्या, परंतु सर्व प्रवाशानी सांगून सुद्धा त्याने वेग कमी केला नाही. जणु काय आपले सर्व कौशल्य पणास लाऊन तो एखाद्या शर्यतीतच भाग घेत होता सर्वच प्रवासी चिंता व भययुक्त वातावरणात जीव मुठीत धरून बसले होते. व आपापल्या इष्ट देवतेचे स्मरण करीत होते. शेवटी झाले तेच. समोरून वेगात येणाऱ्या एका ट्रक वर आमची बस जाऊन आदळली. जोरदार आवाज झाला व त्यात अनेक किंकाळ्या मिसळल्या. एक क्षण तर संपूर्ण जग अंधकारमय झाले व

मग घडलेल्या अपघाताची कल्पना आली. स्वतःची शुद्ध आल्यावर इतरांकडे लक्ष गेले. दोन मुले तर बसच्या बाहेर फेकली गेली होती. कोणाच्या डोळयात काचा गेल्या होत्या तर कोणी अगदी अत्यवस्थ होते जवळ जवळ सर्वच प्रवाशांना थोड्या अधिक प्रमाणात दुखापत झाली होती. माझ्याबरोबर आलेल्या मंडळींना सुखरूप स्थितीत पाहिले तेव्हा जीवात जीव आला. कोणासच विशेष असे लागले नव्हते. मेहुणीची अवस्था 'नाजुक' असूनसुद्धा तिला काही त्रास झाला नाही ही सर्व माझ्या श्रीसाईबाबांचीच लीला नव्हे तर काय ? सकाळी बायको मुलास न नेण्याबद्दल इशारा केला होता व येवढ्या भीषण अपघातात आमचे रक्षण बाबांनी केले.

पदोपदी बाबा अशीच कृपा करीत असतात. आमच्या चुकांना क्षमा करीत असतात व पथप्रदर्शन करतात. ही बाबांची कृपा आमच्यासाठी अमूल्य ठेवा आहे.

☆ ☆ ☆

# —:० एक अनुभव ०:—

— श्री. डी. आर. खडके,
१४, "सहवास" आर. सी. मार्ग,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

दहा जानेवारी एकोणीसशे एकोणऐंशीची गोष्ट. श्री. कमलाकांत मसूरकर माझ्याकडे प्रथमच आले होते. आम्हां दोघांची ब्लॉकला रंग देण्याबद्दल चर्चा चालू होती. कोणत्या खोलीत कोणता रंग द्यावा. याविषयी बोलता बोलता मी त्यांना माझ्या बेडरूममध्ये घेऊन गेलो. तेथे भिंतीवर श्रीसाईबाबांची तसबीर दिसताच त्यांनी बाबांना नमस्कार केला आणि रंगाचा विषय मध्येच सोडून "शिरडीला केव्हा गेला होता ?" असा प्रश्न केला.

माझ्या ब्लॉकला रंग देण्याचे कॉंट्रॅक्ट "मॉडर्न डेकोरा" या गावदेवीच्या कंपनीला दिले. या कंपनीचे मालक श्री. मोहन मसूरकर यांचे कमलाकांत हे बंधू. त्यांनी मुंबईच्या कला विद्यालयाचा अभ्यासक्रम पुरा करून पदवी मिळविली आहे. माझ्या बेडरूममधील श्रीसाईबाबांची तसबीर पाहिल्याबरोबर श्री. कमलाकांत ह्यांनी बाबांच्या बाबतीतला आपला अनुभव स्वतःहून सांगितला. ते म्हणाले, "मी मूळचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघातला. साईबाबा हे मुसलमान होते अशी माझी समजूत असल्याने माझ्या मनात बाबांच्याबद्दल अनास्था होती.

अशा परिस्थितीत १९६९ साली माझ्या हातात सत्य साईबाबांच्या विषयीचे पुस्तक सहज आले आणि त्यावरून मला कळले की सत्य साईबाबा हे स्वतःला शिरडीच्या साईबाबांचे अवतार समजतात. ते वाचल्यानंतर माझ्या मनात साईबाबांच्या विषयी आदर उत्पन्न झाला, व त्यांचे चरित्र वाचावे अशी मनात इच्छा उत्पन्न झाली.

योगायोग असा की त्याच सुमाराला माझ्या बंधूचे लग्न झाले. त्याच्या सासऱ्यानीं श्री. दाभोलकरलिखित श्रीसाई चरित्र आमच्या घरी आणले. ते संपूर्ण ५३ अध्यायांचे चरित्र मी वाचून काढण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणे नियमितपणे रोज १ अध्याय वाचू लागलो. पुन्हा योगायोग असा की शेवटचा ५३ वा अध्याय ज्या दिवशी मी वाचला त्या दिवशी "दत्त जयन्ती" होती. साई चरित्र वाचल्यानंतर माझ्या मनात शिरडीला जाण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली. पण ते जमणार कसे! माझ्या खिशात फक्त १२ आणे होते. त्या आधी काहीं दिवस मी नोकरी सोडल्यामुळे पैशाची टंचाई होती. घरातून पैसे मागावयाचे नाहीत असा निश्चय होता. साईबाबांची उदी घेऊन ती जिभेच्या टोकांशी ठेवावी असा विचार केला पण कोण जाणे हात जड होऊन तोंडाकडे जाईनात. असे का होते हे माझे मलाच समजेना.

इतक्यात माझ्या नावाने कुणीतरी हाक मारली. उठून पहातो तो दारात एक अल्प परिचित श्री. अनंत आडिवरेकर उभा होता. त्याची माझी अगदी बेताची ओळख होती. त्याने मला सांगितले कीं मी उद्या शिरडीस जात आहे. माझ्याबरोबर तुझेहि तिकीट काढले आहे व तुझा शिरडीचा जाण्यायेण्याचा आणि जेवणाचा वगैरे सर्व खर्च मी करणार आहे. हे ऐकून मी थक्कच झालो. कारण अनंत माझ्याकडे खास येण्याइतका माझा परिचय नव्हता. शिवाय नुकतीच माझ्या मनात बाबांच्या-विषयी पूज्य भावना उत्पन्न झाली आहे याचा त्याला मागमूसहि नव्हता.

अनंताबरोबर मी शिरडीला गेलो. अगोदर देवालयाच्या कळसाचे दर्शन घेतले आणि नंतर श्रीसाईबाबांच्या समाधीचे व मूर्तीचें दर्शन घेऊन धन्य झालो. ही गोष्ट १९६९ च्या डिसेंबर मध्ये घडली.

तेव्हापासून मी साईबाबांचा निस्सिम भक्त झालो आहे व मी कुठेहि कसल्याहि कामात गुंतलो असलो तरी माझ्या मनात "श्रीसाई" नामाचा घोष चालू असतो.

★ ★ ★

# श्रीसाईबाबा सेवा मंडळ, नागपूर

कोंड्रा भवन, धनतोली, नागपूर, ४४ ०० १२.

## श्रीसाई मंदिराचे उद्‌घाटन व श्रीसाईबाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा समारंभ

शनि. १ डिसें. ७९— होमहवन विधी.

रवि. २ डिसें. ७९— अखिल भारतीय साईभक्त संमेलन.

सोम. ३ डिसें. ७९— श्रीदत्तजयंती–श्रीसाईनाथ मूर्ती प्राणप्रतिष्ठा समारंभ.

मंगळ. ४ डिसें. ७९— गोपाळकाला व भंडारा.

स्वागताध्यक्ष — श्रीराम दुर्गाप्रसादजी सराफ

संमेलन उद्‌घाटक — श्रीशाम कुमारजी श्रीवास्तव

समारंभाचे अध्यक्ष — डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर

मुख्य पाहुणे — श्रीराधाकृष्ण स्वामी उर्फ श्रीसाईपादानंद
अध्यक्ष ऑल इंडिया श्रीसाई समाज, मद्रास

उत्सवात—पं. भीमसेन जोशी, श्री. सी. रामचंद्र, पं. हरीप्रसाद चौरासिया, श्री. जयवंत कुलकर्णी यांच्या भक्तीगीतांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच भारतातील विविध साईमंदिरातील मूर्तींच्या छायाचित्रांचे एक प्रदर्शनही भरविण्यात येत आहे.

प्रतिनिधींची रहाण्याची व भोजनाची व्यवस्था संस्थेतर्फे करण्यात आली असून येणाऱ्या प्रतिनिधींनी आपली नावे त्वरीत वरील पत्त्यावर नोंदवावीत अशी विनंती श्री. बाबासाहेब उत्तरवार, कार्यवाह श्रीसाईबाबा सेवा मंडळ, नागपूर हे करतात.

०००

# ००० साईभक्त भाऊसाहेब लोंबर, पुणे ०००

## प्रथम पुण्यतिथी २०-१०-७९ सकाळी १० वा.

## चित्र अनावरण समारंभ, स्वारगेट येथे



साईभक्त भाऊसाहेबांचा जन्म निपाणीस १९०७ साली झाला. त्यांचे बालपण कोल्हापूरला गेले. त्यांच्या घराण्यात पूर्वापार श्रीदेवीची उपासना चालू होती. श्रीदेवीनी वयाच्या ८ वे वर्षी दृष्टांत दिल्याने त्याच रात्री त्यांनी कोल्हापूर सोडले व निपाणीस जंगलात देवीची सेवा करण्याच्या उद्देशाने राहिले. पुन्हा देवीने दृष्टांत दिल्यावरून ते कोल्हापूरला परतले. १९१७ साली ते पुण्यास आले. तिथे श्री. माधवनाथ महाराजांची व त्यांची गाठभेट झाली व त्यांचे आज्ञेवरून ते १९२० साली प्रथम शिरडीस गेले व श्री बाबांची सेवा करीत तिथे महिनाभर राहिले. द्वारकामाईत तर बाबांनी त्यांना एकदा साक्षात् दर्शन दिले व तेव्हापासून ते जे साईभक्त झाले ते कायमचेच. १९२० पासून ऑगष्ट १९७८ पर्यंत दरवर्षी दोनदा ते शिरडीस जात होते.

१९५२ साली त्यांनी पुण्यात स्वारगेट जवळ बाबांचा मठ बांधण्याकरिता जागा खरेदी केली व १९५५ साली आजचा श्रीसद्गुरु साईनाथ कृपामठ बांधला. एका पारसी भक्ताने १९५६ साली त्यांना बाबांची एक सुंदर मूर्ती भेटीदाखल दिली. तीच मूर्ती या मठात स्थापन करण्यात आली आहे. या मठात भाऊसाहेब श्रीबाबांच्या आशिर्वादाने भक्तांच्या अडीअडचणी निवारण करीत असत.

- अशा या साईभक्त श्री. भाऊसाहेब लोंबर यांनी आपली देहयात्रा ३१-१०-७८ रोजी संपविली. देह ठेवण्याच्यापूर्वी त्यांना मृत्यूची चाहूल लागलेली होती. त्यांच्या एका चित्राचे अनावरण २०-१०-७९ रोजी सकाळी १० वा. श्रीसाईनाथ मठात, श्रीसाईलीला मासिकाचे का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांचे हस्ते होत आहे. हे चित्र श्री. विजयानंद भालचंद्र भुर्के यांच्या व्ही. बी. ॲण्ड कंपनीने तयार करून दिलेले आहे. या प्रसंगी पुण्याचे महापौर श्री. पांडुरंगराव तरवडे हे अध्यक्षस्थान मंडित करीत आहेत.

★★★

### उदीतून साक्षात् अग्नि

'भक्तिसंगम'चा साईबाबांचा विशेषांक आदल्या दिवशी प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर मी अंकाच्या वितरणाच्या व्यवस्थापन कार्यात गढलो असताना अचानक रुपाने साईभक्त भाऊ डिचोलकर हे आले. सुरुवातीस मी काही त्यांना ओळखलेच नाही. पण नंतर त्यांनीच आपली ओळख सांगितली आणि बोलण्याच्या ओघात साईबाबांच्या कार्याविषयी माहिती देत असतानाच सांगितले की साईबाबांनी पहिल्यांदा चिमटा मारून जो अग्नी प्रज्वलित केला तो आजपर्यंत आहे, त्या स्थितीत प्रज्वलित आहे. त्या अग्निपासून होणाऱ्या उदीच्याद्वारे अनेक भवतापे नष्ट झालेली आहेत. अनेकांची संकटे निवारण झाली आहेत. याशिवाय तिचा अनेक गुणकारी प्रत्यय येत आहे. असे म्हणता म्हणता त्यांनी आपल्याजवळ असलेल्या उदीतील एक चिमुटभर उदी घेतली. सुमारे सात-आठ मिनिटे जपतप-ध्यानधारणा चालू केली. त्याच अवधित त्या चिमूटभर उदीतून ज्योत प्रज्वलित झाली आणि तिचे दर्शन अनेकानी घेतले.

बाबांच्या भक्तीची ताकद किती, कशी, कोणती आहे आचे आम्हास दर्शन घडल्याने बाबांच्या भक्ताच्या भक्तीकार्यातसुद्धा बाबांची किती ओढ असते याची जाणीव झाली.

— सुधाकर सामंत
संपादक भक्ति संगम

# स्काय-लॅब आणि श्री बाबा

— श्री. सूर्यकांत मा. गर्जे
८० शिवाजीनगर. पुणे–५

● १० जुलै १९७९ चा दिवस सर्व जगात चर्चेचा एकच विषय–"स्कायलॅब"! घराघरातून, चौका चौकातून नभोवाणी दूर दर्शन व वर्तमान पत्रातून स्कायलॅबचं पीक अमाप आलं होतं. लोक भयमीत झाले होते. स्कायलॅब कुठे आणि केव्हा, कशी कोसळेल याचा नेम नव्हता. जणू स्कायलॅबच्या रूपाने मृत्यूचा जबडा वासून बसला होता!

संध्याकाळची वेळ होती. आम्ही घरात गप्पा मारत बसलो होतो. अर्थात् आमचा विषय स्कायलॅबच होता. या जगाचा अखेरचा निरोप घ्यायची वेळ जवळ

येऊन ठेपली आहे. असं प्रत्येकाला मनातून वाटत होतं. गप्पांच्या ओघात श्रीबाबांचा विषय निघाला अन् मनावरील ताण थोडा कमी झाला. श्रीबाबा आपल्या पाठीशी असताना आपण का घाबरावे ? जेथे बाबा असतात तेथे भय नसते या श्री बाबांच्या वचनाची आठवण झाली आणि मनाला दिलासा आला.

श्रीबाबांच्या फोटोकडे मी एक टक पाहिले. दयेची याचना केली आणि विनम्र होऊन प्रार्थना केली—"बाबा, संकटकाली धावून येता व पोटाशी धरता, तशी वेळ आता येऊन ठेपली आहे बाबा, या संकटातून सर्वांची सुटका करा, हो सर्वं प्राणीमात्रांची ! या स्कायलॅब कोसळल्यामुळे सबंध जगात एकही माणूस दगावता कामा नये. बाबा, हे तुमच्या हाती आहे. सर्वस्वी तुमच्याच हाती आहे. बाबा, तुम्ही देवाधीदेव आहांत. अनंत कोटी–ब्रम्हांडनायक आहात. जगाची आई आहांत. आम्ही लेकरे तुझीच आहोत. आमचा सांभाळ कर. बाबा, एक मनातला विचार सांगतो. स्कायलॅब पडल्यामुळे जगात एकहीं माणूस दगवला नाही तर बाबा, शिवाजीनगर येथील साई–मंदिरात एक किलो उत्कृष्ट पेढ्यांचा तुमचा प्रसाद म्हणून वाटीन." अशी मनोमन प्रार्थना करून गाढ श्रद्धेने श्रीबाबांना त्रिवार नमस्कार केला.

दुसरे दिवशीं दि. ११ जुलैला रात्री ९–५५ वाजता स्काय–लॅब कोसळल्याचे वृत्त सर्वत्र प्रसृत झाले. १२ जुलै गुरुवारच्या वृत्तपत्रात सविस्तर बातमी छापून आली. कुठेही मनुष्य–हानी झाली नाहीं. लोकानी सुटकेचा श्वास सोडला परंतु मला झालेला आनंद शब्दातीत होता.

एक किलो उत्कृष्ट पेढ्यांचा पुडा घेऊन संध्याकाळी शिवाजीनगर येथील श्रीसाईनाथ महाराजांच्या मंदिरात गेलो. श्रीबाबांचे दर्शन घेतले. भिंतीवर टांगलेल्या घड्याळाकडे सहज नजर गेली. आदल्या दिवशी रात्री ठीक ९-५५ वा. घड्याळ बंद पडल्याचे समजले ! स्कायलॅब कोसळल्याची वेळ हीच होती.

मी श्रीबाबांच्या मूर्तीकडे साश्रु नयनांनी पहात होतो. श्रीबाबांच्या डोळ्यात धीर–गंभीर भाव होते परंतु ओठांवर हसू रेंगाळत होते. न कळत डोळे मिटून नतमस्तक होऊन मी हात जोडले.

★

# गुरु माझी माता । गुरु माझा पिता
# कवण सुख दाता । गुरुविण ॥

—सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर
६९ बी. खाडिलकर रोड गिरगाव. मुं. ४

● खरोखर ३० ऑक्टोबर १९७८ हा दिवस आजन्म स्मरणात राहील यात तीळमात्र संदेह नाही. मालेगावहून आमच्या डॉ. मेहतांची पहाटे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी तार आली की माझे वडील श्री. द. ना. हजारे चक्कर येवून पडल्याने मांडीच्या हाडाचे फ्रॅक्चर झाले आहे. प्रकृती वयोमानामुळे फारच क्षीण तेव्हा मुंबईतच राहणाऱ्या ३ बहिणी व जावई यांना कळवून त्वरीत मालेगावी यावे. त्याप्रमाणे सर्वांना कळवून पाडव्याच्या दिवशी अगदी पहाटे सर्व तयारीनिशी घरातील देवाची पूजा अर्चा प्रार्थना इ. करून घरातून निघाले. एकाला दुसरा असावा म्हणून उत्तम शिक्षित कुशल असा दुसरा ड्रायव्हर पण माझ्या यजमानांना स्वतःला चांगले ड्रायव्हिंग येत असूनही बरोबर घेतला. आम्ही तीन बहिणी व आमची मुले असा प्रवास सुरू झाला. वाटेत पाडव्याचा दिवस पण देवदर्शन घ्यावे म्हणून गणपतीच्या देवळात गेलो. येणाऱ्या दुःचिन्हाची प्रचिती की काय देवदर्शन घेऊन बाहेर पडणार तेव्हढ्यात संपूर्ण देवालयातील लाईटच गेले व पूर्णपणे अंधारात ५–१० मिनिटे उभे राहावे लागले. नंतर अकस्मात् दिवे आले व आमचा प्रवास सुरू झाला. वाटेतील एकंदर वातावरण, मुलांची बडबड हे काय ? ते काय ? याची उत्तरे देत, मनातील वडिलांच्या तब्बेती विषयीची अस्वस्थता, स्वस्थता लाभूच देत नव्हती पण साईबाबांचे नामस्मरण करत प्रवास चालूच होता. चांदवड पर्यंत अगदी छानच आलो. रस्ता सरळ खाच खळगे काही नसताना काय झाले हे कळण्या अगोदरच ड्रायव्हरच्या दुसऱ्या बाजुचा दरवाजा खाडकन उघडला गेला व कडेला बसलेली माझी १७–१८ वर्षाची भाची बाहेर फेकली गेली. 'बाबा हे काय झालं! असं ओरडतच मी माझ्या बाजुचा दरवाजा उघडून बाहेर धावले, तिच्या जवळ पोहोचले तो पाय रक्तबंबाळ झालेला. मात्र ती पूर्ण सावध होती. जवळ औषध काय असणार ! मालेगाव फक्त तासाच्या अंतरावर राहिलेले काय करावे ते सुचेना मात्र लगेच निर्णय घेऊन ड्रायव्हरला मागे बसवून ह्यांनी स्वतः चाक हातात घेतले व मी साईनाथ स्तवन मंजीरी मोठ्याने म्हणायला सुरवात करुन, जखमी भाचीला मागच्या सीटवर झोपवून शक्य तितक्या त्वरेने मालेगाव गाठले व डॉ. मेहतांच्या बंगल्याकडेच गाडी प्रथम घेतली. ते स्वतः व त्यांची दोन मुले डॉ. असल्याने त्वरीत उपाय योजना झाली व प्लॅस्टर घालुनच

एकाच्या जोडीला दुसरा पेशंट घरी आला. वडिल खूपच अत्यवस्थ त्यामुळे त्यांना हा प्रकार काहीच कळू दिला नाही. पण नंतर लगेच गाडीत काय बिघाड इ. आहे का हे पाहण्यासाठी हे तिच गाडी घेऊन गावातील वर्कशॉपमध्ये गेले. संपूर्ण गाडीची तपासणी केली व त्या मेकॅनिकने ह्यांना जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवून सांगितले, अरे बाबा तू खरोखर सुदैवी ही गाडी चांदवडहुन येथ पर्यंत कशी आणलीस ऑईलचेंबर तुटलं आहे, पाणी नाही. ड्रायव्हरचा ताबा सुटला व गाडीने एका खांबाला धडक दिली तेव्हा हे सर्व झालं असणार, खरोखर देव तुझ्या पाठीशी आहे ! घरी येवून ह्यांनी ही हकीगत सांगताच डोळ्यापुढे चित्र उभे राहीले. जखमी भाचीला गाडीत ठेवून ह्यांनी गाडी सुरू केली तेव्हा एक छोटं 'फुलपाखरु' गाडीत आलं व सर्वत्र फिरून स्थिरपणे वेगाच्या आकडे दाखवणाऱ्या चकतीवर बसलं ते डॉ. च्या घरी जाई पर्यंत होतच. माझी ३ वर्षाची छोटी भाची बडबडत होती ते पण स्मरलं "ते बघ साईबाबा आपल्याला आता नीट घेऊन जातील घरी" फुलपाखराच्या रुपाने माझे बाबाच आम्हाला तारून न्यायाला आले होते. अशीच खात्री पटली. आता माझे वडिल व ती भाची दोघही पूर्ण बरे झाले आहेत व दोन पायावर उभे राहून चालू लागले आहेत.

◆◆◆

# दुचाकीच्या साखळीत मुलाचे बोट अडकले

— श्री. सदाशिव स्वार
४०२३/१४९ नेहरुनगर,
कुर्ला, (पूर्व) मुं. २४.

* दरवर्षी प्रमाणे, गेल्यावर्षीही माझी सौभाग्यवती, चि. विरेंद्र (२॥ वर्षे) व चि. लतीका ह्या दोन मुलास घेऊन मे महीन्याच्या सुट्टीत कोल्हापूरला त्यांच्या घरी गेली होती. मुलगा चि. विरेंद्र फारच दंगा मस्ती करणारा आहे व त्यामुळे घरातील सर्वच मंडळी त्याच्यावर लक्ष ठेवून असत. एके दिवशी खेळता खेळता मुलगा बाहेर व्हरांड्यात सायकल उभी होती तेथे गेला व सायकलच्या साखळीमध्ये बोट घातले व ते चांगलच अडकल्याबरोबर रडायला सुरूवात केली. त्याबरोबर त्याचे आजोबा, आजी, आई सगळ्यांचीच धावपळ सुरु झाली व आजुबाजुची दोन चार मंडळी पण धावून आली. बोट साखळीतून काढण्याचा प्रयत्न केला की मुलगा कळवळायचा १५-२० मिनिटे झाली तरी बोट काही निघत नव्हते परंतु तशाही

परिस्थित मुलगा एकसारखा 'साईबाबा' 'साईबाबा' म्हणत होता. हे सर्व बघुन त्याच्या आजीला चक्कर आली. त्याच वेळेस सौ. ने त्याच वेळेस साईबाबांना आर्तस्वरात हाक मारून विचारले. आमची सर्वांची काळजी वहाणारा साईबाबा तू कुठे आहेस ? आणि एकच मिनिट होतं न होतं तर बंगल्यापुढे एक रिक्शा थांबली व संपूर्ण सफेत कपडे घातलेला गोरापान असा रिक्शावाला एक हातोडी व एक छिन्नी घेऊन उतरून आत आला व त्याने प्रेमळ नजरेने मुलाकडे बघीतले व अर्ध्या मिनिटात त्याने सायकलची साखळी तोडून मुलाचे बोट सोडवले व त्याच्याच रिक्शामधून जवळच्याच हॉस्पीटलमध्ये नेले व मलमपट्टी करून मुलाला त्याच्या आईबरोबर घरी आणून सोडले. मुलाचं बोटच तुटणार होते परंतु फक्त नखच गेले.

रिक्शावाला जसा अचानक आला तसाच तो कधी निघून गेला हे कोणाच्याच लक्षात आले नाही. रिक्शावाल्याच्या रुपात प्रत्यक्ष साईबाबाच आले होते ह्याबद्दल कोणालाच शंका वाटत नाही.

# श्रीसाई कृपावंत ! शरण तुला भगवंता ! !

—श्री. डी. बी. जगत्पुरीया "अमन"
बी. एस्सी. बी. एड. साहित्यालंकार
मु. पो. शिरुड (मध्यरेल्वे) ता. जि. धुळे.

यही है खुदा का नूर, यही है नक्शा-ए चेहरा
शिर्डी के दर्पण में "अमन," जन्नत का नजारा सारा !

● माझे वडील दीर्घ मुदतीच्या आजाराने त्रस्त आहेत. ६ मे १९७९ ला सकाळपासून त्यांची प्रकृती अचानक बिघडली. काही वेळेनंतर त्यांची शुद्ध हरवल्यासारखे वाटू लागले. चेतना नाहीशी झाल्यामुळे त्यांना नेमका कुठल्या प्रकारचा त्रास होतोय हेही समजू शकले नाही. डॉक्टरांकडून चिकित्सा करवून घेतली तरी म्हणावे तसे समाधान झाले नाही. त्याच दिवशी मी संध्याकाळी बाहेर गावाहून घरी परतलो. आई व भाऊंनी मला वरील सर्व वृत्तांत सांगितला.

अशा अवस्थेत काय करावे व कोणता मार्ग काढावा हे सुचेनासे झाले. शेवटी मी बाबांचे पुण्य स्मरण करण्याचा तात्काळ निर्धार केला. रात्री अव्याहतपणे मी बाबांचे

स्मरण सुरू ठेवले. बाबांचे स्मरण करताना मला अंतर्मनातून एक विलक्षण, अवर्णनीय असे मानसिक समाधान लाभत होते. तशा अवस्थेत सुद्धा मनात साहसाचा संचय होत होता. अकल्पितपणे एखाद्या चमत्काराने धक्का बसावा तसे घडले. सकाळी-सकाळी वडील थोडे बोलू लागले. बाबांनी जणू मला स्वतःच्या थोरवीची पावतीच दिली.

गुरू साईंच्या साई कृपेचे, नित्य असे ते छत्र शिरी
दुःख सागरा प्राशुनि घेण्या, ऊभा होऊनि पात्र करी !

या प्रकारचे भाव माझ्या मनात आले नसतील तरच नवल ! दुसऱ्या दिवशी मात्र वडीलांना पूर्णतः बरे वाटू लागले. वस्तुतः या घटनेस मी तरी पूज्य बाबांची मंगल कृपाच मानतो. जेव्हा जेव्हा मला तो प्रसंग आठवतो त्यावेळी मन म्हणायला लागतं—

मौत अगर पास भी आती है तो क्या होता है अरे, किरपा साई की अगर हो तो; जनाजा मौतका निकल जाता है ।

❁

# माझ्या मोठ्या मुलग्यास सन्मार्ग दाखवून काळाच्या कृतांत दाढेतून ओढून काढले

—श्री. मारुती कृष्ण कळसे (देसाई)
मु. पो. उसण—इस्लामपूर,
ता. वाळवे, जि. सांगली.

* माझा मोठा मुलगा दिनकर उर्फ दिनानाथ देसाई हा कराडला पॉलीटेकनीकल, कॉलिजमध्ये सध्या शिक्षण घेत आहे ! सुरवातीस १ वर्ष त्याचे लक्षच लागेना, त्यामुळे, त्याने लक्षपूर्वक अभ्यास केला नाही. व मध्येच ड्रॉप घेऊन घरी निघून आला. मला फार मोठी, काळजी लागून राहीली व नेहमीप्रमाणे मी श्रीबाबांचा धावा करून, बाबांना विनंती केली कीः–मी गरीब परिस्थितीत दिवस कण्ठत आहे. अंगावर अंगभर कपडे न घालता माझे मुलाचे कल्याण व्हावे म्हणून, तुझ्या आशीर्वादाने त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे. तरी मजवर व माझे मुलावर कृपा करून त्याचे अभ्यासात लक्ष लागु दे व पहिले वर्ष उत्तमप्रकारे पास होऊन, पार पडु दे, त्याला तुझे समाधीचे दर्शना करीता शिरडीस पाठवून देईन

झाले. माझी गरीबाची हाक माझे माऊलीने ऐकली, आणि चमत्कार घडून आला. माझे दिनानाथाचे लक्ष लागून, तो अपेक्षे-पेक्षाही, ज्यास्त मार्कांने म्हणजे ७०० पैकी ४१८ म्हणजे जवळ, जवळ, फर्स्ट क्लासमध्ये पास झाला, ठरल्याप्रमाणे मी त्याला कालच्या गुरुपौर्णिमेला बाबांचे दर्शना करीता शिरडीस पाठविला होता. तो व्यवस्थीत श्रीबाबांचे दर्शन घेऊन उदी घेऊन, परत आला. या आधी ता. १३-५-१९७९ रोजी त्याचे बाबतीत एक चित्त थरारक घटना घडली. ती अशी, तो कराड येथे आपले खोलीवर सुमारे सायंकाळी ६ वा. उगीच पडावे म्हणून घड्याळ काढून उशाला ठेवून झोपला होता. झोप लागली. तो रात्री १२।१ वा. जाग आली. किती वाजले पहावे म्हणून उशाचे घड्याळ चाचपू लागला. तो साप! घड्याळा ऐवजी हाती साप लागला. भितीने उठून लाईट लावला. साप फणा काढून उभा होता. माझा मुलगा तसाच घाबरून बाहेर आला व घरमालकाना हाका मारू लागला. ते व शेजारची मुले आली तरी तो तसाच होता. मग त्याला सर्वांनी मारले, श्रीसाई कृपेने माझे मुलाचे जिवास काहीही धक्का पोचला नाही. ही गोष्ट ज्यावेळी मला समजली त्यावेळी माझी छाती भितीने धडधडू लागली. व श्रीबाबांचे तसबिरीपुढे उभा राहून, बाबा हे तुमचे उपकार मी कसे फेडू असे म्हणून ढळढळा; रडू लागलो, नाही तरी आपल्या मानवाच्या हातात दुसरे काय आहे, आपले सर्वाचे रक्षण कर्ते, माझे बाबा असे आहेत.

# स्वप्नातील साधू–साईनाथच !

— श्री. पांडुरंग रामा भाटीकर
गोमंत वाणी समोर, गोवा.

● सुमारे २५ वर्षे झाली असतील माझ्या सौ. श्रीपती सुंदराबाई भाटीकर (६४) यांना एका रात्री एक स्वप्न पडले. त्यात डोक्याला फडके बांधलेले एक म्हातारे गृहस्थ भरभर चालत दोन्ही बाजूने दोन सद्‌गृहस्थांचे मदतीने आमच्या घरी आले. ते (बाबा) तिच्याजवळ जाऊन कानात काही पुटपुटले पण त्यातले तिला काहीच कळले नाही. ते कोणी तरी साधु असले पाहिजेत असे म्हणून त्यांना बसा-वयास एक तांबडे लाल जाजम घातले आणि यथायोग्य स्वागत केले.

दुसऱ्या दिवशी दुपारी २.३० च्या सुमारास 'सांखळी-गोवा' येथील आमच्या एका नातलगाने 'श्रीसाईबाबांचे चित्र' असलेले एक कॅलेंडर एका इसमाकडून

आम्हाला पाठवून दिले ! ते चित्र पाहून माझ्या पत्नीला आश्चर्याचा सुखद धक्का बसला ! तिने आदल्या रात्री स्वप्नात पाहिलेले ते हेच असे मला सांगितले. मी तिला म्हटले, " शिर्डीचे प्रख्यात भगवान साईबाबा म्हणतात ते हेच. " लगेच ते चित्र मी फ्रेम करून घेतले आणि आजतागायत ते आमच्या देवमंदिरात आमच्याकडून यथाशक्ति पूजा घेत आहे. हे कॅलेंडर मी काही दिवसापूर्वी सांखळीला गेलो होतो, त्यावेळी त्या नातलगाच्या घरी भिंतीवर टांगलेले होते. मी समोरच बसलो होतो, आणि वाऱ्याने ते हलत होते. जणू माझ्याकडे येण्याच्या इच्छेने ! मी त्या नातलगाकडे आणखी एक तसले कॅलेंडर असले तर मला द्या अशी विनंती केली. त्यांनी मला देतो असे वचन दिले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्वप्न पडलेल्या दुसऱ्याच दिवशी कोणाकडून तरी ते कॅलेंडर त्याने पाठवून दिले !

०००

# साईलीला

— कु. लता अनंत चितांबर बी. ए.

● दुपारी १२ ची वेळ असेल, आम्ही जेवायला बसणार तितक्यात मला काय वाटले कोण जाणे, मी स्वयंपाक घराकडून पॅसेजकडे वळले. तर समोर धूर. काही कळेना हा धूर कशाचा ? कोठून आला ? गॅस तर बंद आहे. क्षणभर काही सुचेचना. तेवढ्यात दादाही तिथे येऊन पोहोचले. एवढ्या वेळात संबंध घर धुराच्या लोटांनी भरून निघाले होते. पॅसेजमध्येच कट्ट्यापलिकडे जिथे अडगळीचे सामान ठेवले होते तिथे पाहिले तर चक्क ज्वाला ! मी व दादांनी भराभर पाण्याच्या बादल्या भरून ओतल्या, व आग आटोक्यात आणली. क्षणाचाच विलंब झाला असता तर शेजारीच असलेली सर्व रद्दी, कपडे, ५ लिटर रॉकेल, ॲसिडच्या बाटल्या हे सर्व पेटले असते, आणि आग आटोक्यात आणणे शक्यच झाले नसते. संबंध कपडे भरून ठेवलेली एअर बॅग जळाली, कपड्यांसहित. परंतु त्याची ज्वाला शेजारीच असलेल्या रॉकेलला लागण्यापूर्वीच बाबांनी जागे केले व संकट टाळले. त्याच्या एका बाजूला असलेली पुस्तके ही अर्धी जळाली ती उलगडून पाहिली तर त्यात साईलीलेचे सर्व अंक सुरक्षित होते आणि त्यात साईबाबांचा फोटोही ! घरातील सर्वजण साईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. बाबांवर गाढ श्रद्धा आहे.

संकट कालात बाबा धावून येतात, आपल्या भक्ताला वाचवतात. ' जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव. '

०००

# गुरुपदी श्रद्धा अढळ करणारे बाबा

—श्री. अनिल केशवराव रसाळ
२१।३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वॉर्टर्स
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व) मुंबई ३७.

● आमच्या घरी अंगारकी चतुर्थीच्या दिवशी आणलेल्या "श्रीसाईसच्च-रित्र" या पोथीत अक्षता, कुंकु, शेवंती व झेंडूच्या पाकळया आपोआप आल्या व बाबांनी अशा रितीने पोथी पावन केली.

का कोण जाणे, परंतु मी जेव्हा ८ जुलै ७९ रोजी शिर्डीला गुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठी निघालो असता नकळत ती पोथी सोबत घेतली. कारण माझ्या उपासनेला नियमीतपणा यावा म्हणून ती शिर्डी येथे प्रत्येक स्थानी ती पोथी ठेवावी व प्रार्थना करावी असाच सद्‌गुरुंचा हेतू असावा.

आमची गाडी शिर्डीला पोहोचली व थोडा आराम केल्यावर माझ्या मनात एक विचार अचानक आला की, आपण ही पोथी गुरुपादुकास्थान, द्वारकामाई, चावडी व समाधिमंदिर येथे ठेवावी व प्रार्थना करावी की बाबा मला उपासना नियमित करण्याची सवय लावा. विचाराप्रमाणे चटकन कृतिहि झाली, व मग माझ्या खोलीत आलो व एक अध्याय वाचण्यास घेतला. तो वाचताना मी इतका तन्मय झालो की मी तो कधी संपवला हे कळलेच नाही, आणि मग समाधिमंदीरातील लिलाव अधिकाऱ्याकडून नुकत्याच विकत घेतलेल्या वस्त्रात पोथी ठेवली, व गाठ मारण्यासाठी म्हणून जो पदर वस्त्राचा हातात घेतला त्याकडे माझे सहज लक्ष गेले. आणि मी चकित झालो. दिग्मूढ झालो कारण वस्त्रावर सोनेरी अक्षरात लिहिलेले होते, "श्रद्धा" आपली पोथी हेच सद्‌गुरु ही श्रद्धा दृढ करण्यासाठी जणू बाबांनी ही लीला केली होती असा विचार मनात आला. तोच माझ्या शेजारी उतरलेले साईभक्त श्री. दवे हे बाहेरुन म्हणाले, असाच दृढ विश्वास ठेवशील तर तू तुझे ध्येय निश्चीत "गाठशील" गुरुपौर्णिमेच्या आदल्या रात्री बाबांनी मला जणू काय असा गोड प्रसाद दिला व दुसऱ्या दिवशी गुरुपूजनाच्या दिवशी त्यांच्या अंगठ्याला हळद व कुंकु लावून पूजा करताना मी सहज म्हणालो.

"हेचि दान देगा देवा।"
तुझा विसर न व्हावा।।

# समर्थ गुरु साईनाथा पुरवी मनोवासना

—कु. रमा व्यंकटराव मुळे
" व्यंकटेश प्रसाद " पहिला मजला
एन्. सी. केळकर रोड. दादर मुं. २८.

● मी अगदी लहानपणापासून साईबाबांची भक्ती करते. त्यामुळे माझे साईबाबा सर्वस्व आहेत. माझ्या जीवनात उदीचे लहान मोठे अनुभव अनेक येतात. त्यातील माझा असाच एक अनुभव आहे.

एके दिवशी दुपारी चार वाजता माझे पित्ताने डोके खूप दुखू लागले. त्यासाठी मी घरगुती चांगली औषधे घेतली. तरीही माझा पित्ताचा डोके दुखीचा त्रास कमी न होता जास्त होऊ लागला, आणि एकदम चक्कर येऊ लागली. त्यामुळे काही सुचेनासे झाले शेवटी मी डोक्याला घट्ट रुमाल बांधून झोपले. अतिशय बेचैनी वाढल्यावर मला एकदम साईबाबांची आठवण झाली. पडल्या जागेवरुनच मी मनातल्या मनात साईबाबांचा जोरात धावा करू लागले, " बाबा माझी पित्ताची डोके दुखी थांबवा, मला या त्रासातून मुक्त करा. असा सारखा धावा करु लागले. त्यावेळी मला मनातल्या मनात सारखे वाटत होते की, साईबाबांनी येऊन माझ्या कपाळाला उदी लावली तर डोकेदुखी थांबेल.

रात्री ११ वाजता नवलाची गोष्ट अशी की, माझे वडिल त्यावेळेस माझ्या जवळ आले. मी अंथरुणावर तळमळत असलेली पाहून त्यांनी आपल्या हातानी माझ्या कपाळी उदी लावली, आणि एक दोन मिनीटातच मला एक जोराची उलटी होऊन सर्व पित्त बाहेर उलटी द्वारा पडले. त्यामुळे मला हलके वाटू लागले, आणि मी माझ्या हाताने डोक्यास बांधलेला रुमाल काढून टाकला. आणि मला शांत झोप लागली. माझ्या मनातील प्रार्थना ऐकून साईबाबांनी स्वतःच वडिलांच्या हातून माझ्या कपाळी उदी लावली, आणि मला त्रासातून मुक्त केले. असा माझा विश्वास आहे.

साईबाबांचे उपकार आमच्यावर अनंत आहेत. त्यांच्याविषयी हृदयात प्रेम उचंबळून येऊन डोळयातून प्रेमाच्या घळघळ धारा वाहातात. साईबाबांची उदी म्हणजे आम्हा भक्तांची ती संजीवनी, मला तर ती कामधेनूच वाटते. मात्र त्या उदीचा वापर आम्ही तितक्याच श्रद्धेने केल्यास आपल्याला त्याचे फळ जरुर मिळते आणि त्याच बरोबर सबुरीही हवीच. साईबाबांच्या चरणी आपली श्रद्धा आणि सबुरी असल्यावर आपली ही जीवन नौका पैलतीरावर पोहचायला कितीसा उशिर होईल. ●

# संस्थान - वृत्त - माहे ऑगस्ट सन १९७९

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. गुरुवार-रविवार बरीच गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :**—१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे महत्त्वाचे दिवशी झाली.

२) ह. भ. प. भगवानबुवा पालकर, औरंगाबाद यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन :**—१) ह. भ. प. विठ्ठलस्वामीजी महाराज, हैद्राबाद.

२) ह. भ. प. नारायण का. कुलकर्णी, पंढरपूर.

३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी.

४) ह. भ. प. हरी नारायणदास, भुवनेश्वर.

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे** :— १) श्री. जी. पी. दुबे, नरसिंगपूर. २) श्री. वसंत ना. भोसले, सोलापूर. ३) नूतन ब्रास बॅन्ड पथक, मुंबई ११.

४) श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई. ५) श्री. शिवाजी तु. घुमाळ, शिर्डी. ६) डॉ. एम्. के. किर्लीकर, मुंबई. ७) श्री. सिताराम बा. पवार, शिर्डी. ८) श्री. आप्पासाहेब कागे, गौतमनगर. ९) श्री. कैलासचंद्र सोनी, हुशंगाबाद. १०) कु. कोयल महुआकर, मुंबई. ११) कु. मनिषा महुआकर, मुंबई. १२) श्री. रवींद्र अमिबुहीर पुरी, जगन्नाथ. १३) श्री. कांतिलाल महुआकर, मुंबई. १४) सौ. प्रमिलाबाई महुआकर, मुंबई. १५) कु. चारुशीला बेलसरे, ठाणे, १६) सौ. सुरेखा बेलसरे, ठाणे. १७) श्री. सुरेश बेलसरे, ठाणे. १८) श्री. कमलाकर पाटील, वरळी. १९) श्री. वामन कोळी, मुंबई. २०) श्री. जयंत, मुंबई. २१) एस. कुमार ॲण्ड हिज ऑर्केस्ट्रा, लालबाग, मुंबई.

**कलाकार :**— श्री. सुधिर पा. साळुंके, श्री. अंबाजी बोदुलकर, श्री. नरेंद्र भंसाळी, श्री. ज्यो. श्री. कांता, श्री. प्रदीप, श्री. शंकर, श्री. गव्हाणकर, श्री. चंद्रकांत श्री. अजय, श्री. विवेक. श्री. पापाराव, श्री. फ्रॉकी, श्री. तानाजी, श्री. हिराजी, श्री. सिशेल, सुनंदा, शुभांगी, सुभाष, पैसुदास, अशोक, मिस जरानी, छोटू, शिंदे, रमेश, अमिन.

**स्वराज्य प्राप्तीदिन :—**बुधवार १५ ऑगस्ट १९७९ रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तर्फे कोर्ट रिसीव्हर माननीय श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे शुभ हस्ते प्रति वर्षाप्रमाणे ध्वज वंदनाचा कार्यक्रम, श्रींचे मंदिरावरील कळसाजवळ झाला. कार्यक्रमास संस्थान कर्मचारी, श्रीसाईनाथ हायस्कूल बॅण्ड पथक, शिक्षक वर्ग, होम-गार्डस, विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्रतिष्ठीत–ग्रामस्थ मंडळी, साई भक्त, पाहुणे मंडळी उपस्थित होती. त्यांना चहापान देण्यात आले व मुलांना खाऊ वाटण्यात आला. रात्रौ समाधि मंदिर व कळसावर रोषणाई करण्यात आली होती.

**श्रीकृष्ण जयंती :—**मंगळवार दि. १४–८–७९ रोजी नित्याचे कार्यक्रम झाल्यावर रात्री ९ ते १०–३० पर्यंत स्थानिक कलाकार व संस्थान कलाकारांचे कार्यक्रम झाले. १०–३० ते १२ वाजेपर्यंत संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांनीं श्रीकृष्ण जन्म कीर्तन केले. त्यानंतर शेजारती होऊन सर्वांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. दुसरे दिवशी गोपाल काला, कीर्तन, दही हंडी कार्यक्रम झाल्यावर रात्री श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आली. त्यानंतर शेजारती झाली.

**हवापाणी :—**शिरडी येथील हवापाणी आता उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस चांगला पडल्यामुळे पाणी टंचाई सध्या दूर झाली.

**शिरडीला पर्वणीचे स्वरुप :—**नासिक येथे दि. २९–८–७९ पासून पर्वणी सुरु झाली. पर्वणीला भारतातून शिरडी मार्गे असंख्य लोकांचे जाणे येणे सुरु आहे, त्यामुळे शिरडीलाच पर्वणी आहे कीं काय ? असे वाटू लागते. शिर्डी गाव यात्रामय झाला आहे. शिरडीहून नासिकला जाणाऱ्या यात्रेकरूना लस टोचण्याची व्यवस्था केली आहे. यात्रेकरूंची गैरसोय होऊ नये म्हणून संस्थान अधिकारी व कर्मचारी जातीने लक्ष देत आहेत.

**माननीयांच्याभेटी —**

१) मा. श्री. एन. एस. मानुधने, जिल्हा तपासनीस न्यायाधीश, ठाणे.
२) मा. श्री. शंकररावजी चव्हाण, (माजी) अर्थ, उर्जा, नियोजन मंत्री, महाराष्ट्र.
३) मा. श्री. उमरावसिंग, शिक्षणमंत्री, म. प्र. भोपाळ.
४) मा. श्री. शशिकांत दैठणकर, जिल्हाधिकारी, वर्धा.
५) मा. श्री. के. एल. सुरी, वरिष्ठ सैनिकाधिकारी, मुंबई मंडल.
६) मा. श्री. आर. एस. देवधर, कार्यकारी प्रबंधक, DPAP, सोलापूर,
७) मा. श्री. आर. बी. पाटील, उपप्रबंधक, DPAP, सोलापूर, पशुसंवर्धन.

८) मा. श्री. ए. एस. काळे, IAS, सचिव, गृहखाते, मध्य प्रदेश.
९) मा. श्री. दाहाद, IAS, महाराष्ट्र राज्य कृषि महामंडळ, मुंबई.
१०) मा. श्री. डोंगरे, उपसचिव, महसूल खाते, महाराष्ट्र.
११) मा. श्री. मानिक मिरपुरी, श्री. सुंदर छुगाणी, मिसेस छुगाणी, श्रीमती जानकी दोडाणी, हाँगकाँग.
१२) डॉ. गौरंग, दार-इ-सलाम, टांगानिका.
१३) मा. श्री. कुळकर्णी, अधिक्षक अभियंता, MSEB, महाराष्ट्र.
१४) मा. श्री. भणगे, प्रांताधिकारी, संगमनेर.
१५) मा. श्री. एस. टी. गुप्ते, सचिव, ISII, न्यू दिल्ली.
१६) मा. श्री. डोणाल, उप सचिव, UDPHD, महाराष्ट्र.
१७) मा. श्री. पिच्चय्या, लेखासंचालक, आंध्रप्रदेश.
१८) मा. श्री. जी. एन. सिन्हा, महासंचालक, पुनर्वसाहती, संरक्षण मंत्रालय.
१९) संत हनुमानदास महाराज, कोटमगाव.
२०) संत सिद्धागिरी महाराज, सोलापूर, महाराष्ट्र.

या महिन्यातील एक विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे श्रींचे कृपेने संस्थानने नवीन जमीन संपादन केली आहे.

संस्थान हद्दीचे नजीक व संस्थानचे नियोजित भोजनगृहाचे जमिनीस लागून शिर्डी येथील सर्व्हे नं. ३ पैकी हे. आर. १-२८ क्षेत्राची जमीन संस्थानने दिनांक २४-८-७९ रोजी खरेदी केली आहे.

या जमिनीत भक्तांना राहाण्याचे उपयोगाकरिता इमारती बांधल्या जाणार आहेत, व त्यामुळे दर्शनास येणारे भक्तांचे वास्तव्यासाठी हल्ली असलेली जागेची उणीव भरून निघणार आहे.

ज्यांनी सुमारे ४० वर्षापूर्वी श्रीसाईबाबांचे कार्याकरिता ७ गुंठे जमीन विनामूल्य बक्षीस दिली आहे असे श्रीसाईबाबांचे वेळचे स्थानिक भक्त श्री. नामदेव बमाजी कोते यांनीच ही जमीन संस्थानला आता खरेदी दिली आहे.

ही जमीन श्रीसाईबाबांनाच मी देईन असा त्यांचा संकल्प सुमारे १५-२० वर्षापासूनचा होता. त्याची पूर्णता श्रीसाईकृपेने आता झाली आहे.

# श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

## चित्रकला-निबंध व वक्तृत्व स्पर्धा निकाल

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीने आंतरराष्ट्रीय बालक वर्षाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या चित्रकला-निबंध व वक्तृत्व स्पर्धांचा निकाल दि. १-१०-१९७९ रोजी श्रीबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी दिनी शिरडी येथे जाहिर केला.

| | |
|---|---|
| चित्रकला स्पर्धेत भाग घेतलेल्या मुलांची संख्या— | ७४ |
| निबंध ,, ,, ,, ,, ,, | १० |

चित्रकला स्पर्धेसाठी संस्थानने श्रीसाईलीला मासिकाद्वारे प्रथम क्रमांकास ५१ रु., दुसऱ्या क्रमांकास ३१ रु. व उत्तेजनार्थ ११ रु. अशी बक्षिसे जाहिर केली होती. परंतु श्री. व्ही. बी. शर्मा, ३-६-६२९ हिमायतनगर, हैद्राबाद यांनी केलेल्या विनंतीवरून व दिलेल्या रकमेवरून पुढीलप्रमाणे पारितोषिके देण्याचे ठरविण्यात आले. स्पर्धेसाठी आलेल्या सर्व प्रकारच्या चित्रांचे खुले प्रदर्शन श्रीसाईलीला सहाव्या लेखक-कवी संमेलनप्रसंगी येत्या जानेवारी १९८० मध्ये शिरडी येथे भरविण्यात येईल. सर्व रोख बक्षिसे कार्यालयातून रवाना होत आहेत.

## खुल्या पातळीवर घेण्यात आलेले चित्रकला स्पर्धेचे निकालपत्र

**गट क्रमांक १.** वय ६ ते ९ वर्षे.

(१) पहिला – कुमार मनिष उत्तम नलावडे.
९९२,९३, राजेन्द्र नगर, पुणे. ३०. रु. ५१-००

(२) दुसरा – कुमार ईश्वरा-नंद.
द्वारा रामअवतार पंडित, मु. मिरगुलाबी बाग,
पाटणा सिटी पिन ८००००८ (बिहार) रु. ४१-००

(३) तीसरा – श्यामलचंद्र मिश्रा.
द्वारा श्री. योगेश्वर मिश्रा, ॲंग्लो इंडियन
बॅचलर क्वार्टर, नं. ७, गुलझारबाग, पाटणा. ७. रु. ३१-००

(४) चतुर्थ – कु. मोनिका एस महाडीक.
द्वारा श्री. एस. ए. महाडीक, मॅनेजर,
अलाहाबाद बँक, राजनांदगाव. ४९१४४१. (म.प्र.) रु. २१–००

(५) पाचवा – के. व्ही. एस. गौतम.
इयता ३, केन्द्रीय विद्यालय, आय आय टि.
पवई, मुंबई ४०० ०७६. रु. ११–००

**गट क्रमांक २.** वय १० ते १६ वर्षे.

(१) पहिला – श्रीपाद शंकरराव कस्तुरे.
३–३–७२८ इसमिया बाजार,
मणियार पट्टी, हैद्राबाद. ५०० ०२७. रु. ५१–००

(२) दुसरा – हृषिकेश सुरेश गिजरे.
१४९ शनिवार पेठ, पुणे. ३०. रु. ४१–००

(३) तीसरा – प्रकाश सिंह.
हक्कम बाडा रोड, राम मंदिर की गली,
डॉ. रावलका मकान, रतलाम म. प्र. रु. ३१–००

(४) चतुर्थ – दत्तप्रसाद अनंत भिडे.
११९५ सदाशिव पेठ, लिमयेवाडी, चंद्रकिरण,
पावन मारूती जवळ, पुणे ३०. रु. २१–००

(५) पाचवा – जितेन्द्र अनिल गुते.
१७ स्टील हाऊस, ९२ मरिन ड्राईव्ह,
जी रोड, मुंबई २. रु. ११–००

(६) सहावा – कु. संगिता मार्तंड पाठारे,
नंदादीप डी–७, वरची आळी, गावठाण,
चेंबुर, मुंबई ७१. साईलीला अंक
विनामूल्य एक वर्ष.

**परीक्षक :—**

(१) प्रा. नरेन्द्र विचारे.
जे जे इन्स्टीटयूट ऑफ अप्लाईड आर्टस, मुंबई.

(२) श्री. दत्ताराम काशिनाथ मोरे, जी. डी. ए, मुंबई.

(३) श्री. प्रल्हाद शिवराम बिरीद ( ब्रिरीद ), मुंबई.

# श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

## खुल्या पातळीवरील अभिनव निबंध स्पर्धा....

गट क्रमांक १. वय ८ ते १५ वर्षे.

(१) प्रथम–कुमार राजेश राधाकृष्ण गुप्ता. रु. ६१–००
पाटकरवाडा, भगतसिंग पथ, डोंबिवली (पूर्व)
जि. ठाणे. ४२१२०१

(२) द्वितीय–प्रफुल्ल माधव फणसे, फणसेवाडा, जुनादुध नाका, कल्याण जि. ठाणे ४२१३०१ रु. ५०–००

(३) तृतीय–कुमार माधव वसंत सामंत. रु. २५–००
डी. ८ बँक ऑफ इंडिया वृंदावन हाऊसिंग सोसायटी, कोलडोंगरी लेन नं. २, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०६९.

गट क्रमांक २. वय १६ ते २५ वर्षे.

(१) प्रथम– नाही. –

(२) द्वितीय– नाही. –

(३) तृतीय– सतीश रामचंद्र काळे. रु. २५–००
१७४, अभ्यंकर नगर, नागपूर.
परीक्षक : डॉ. एम. के. कीर्तीकर, मुंबई.

## –श्री साईबाबा वक्तृत्व स्पर्धा–

### जिल्हा पातळींवरील, (अहमद नगर जिल्हा)

गट क्रमांक – १ (वय ६ ते ९)

पहिला – कु. गुजराथी माधवी सुभाष जीवन. शिक्षण विद्यालय, शिरडी. रु. १५-००

दूसरा – श्री. गायकवाड मनोहर पेत्रस. ,, ,, रु. ११-००

तिसरा – कु. देशपांडे शिल्पा प्रभाकर. ,, ,, रु. ५–००

**गट क्रमांक – २ (वय १० ते १३)**

पहिला – श्री. कुलकर्णी किरण हरिभाऊ, सोमैया हायस्कूल श्रीरामपूर. रु. २१-००

दूसरा – श्री. धनवटे शैलेश तात्यासाहेब, न्यू. इंग्लिश स्कूल, पुणतांबा. रु. ११-००

,, – कु. गाडगीळ स्वाती मधुकर. मॉडर्न हायस्कूल अकोला. रु. ११-००

तिसरा – मापाडी श्रीकांत शिवराम, ज्ञानोदय हायस्कूल नेवासा रु. ५-००

चौथा – कु. देशमुख माधुरी रामकृष्ण, डहाणुकर विद्यालय टिळक नगर. रु. ५-००

पाचवा – बारगळ संजय जगन्नाथ, श्री सा. मा. वि. शिरडी. रु. ५-००

**गट क्रमांक – ३ (वय १४ ते १६)**

पहिला – कुमारी हरकल कल्पना, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल अहमदनगर. रु. २५-००

| | | |
|---|---|---|
| दुसरा – कु. मोटे उषा. | ज्ञानेश्वर वि. खरवंडी नेवासा | रु. १५-०० |
| ,, – रणदिवे संजय. | मॉडर्न हायस्कूल श्रीरामपूर. | रु. १५-०० |
| तिसरा – कडदी संदीप. | डहाणुकर वि. टिळकनगर. | रु. ५-०० |
| चौथा – कुलकर्णी केतन. | भा. फि. हा. अ. नगर. | रु. ५-०० |
| पाचवा – कु. देशमुख स्वाती. | डहाणुकर वि. टिळकनगर. | रु. ५-०० |

**परीक्षक**

पहिला गट – सर्वश्री महाजन गुरुजी. २) साळी गुरुजी. ३) शेळके गुरुजी. ४) नेहेते गुरुजी.

दुसर गट – १) सौ. देशपांडे. २) सौ. उषा रसाळ. ३) श्री. रोहोम गुरुजी. ४ सौ. एच. एफ. मुथा.

तिसरा गट – डॉ. टिपनीस. २) श्री. मातोंडे. ३) श्री. ग. वि. जोशी. ४) श्री. जे. के. बारगळ, मुख्याध्यापक श्रीसाईनाथ मा. विद्यालय, शिरडी.

# श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

## श्रीसाईबाबा निबंध स्पर्धेचा निकाल–

जिल्हा पातळीवरील, ( अहमदनगर जिल्हा )

**गट क्रमांक पहिला – वय १५ वर्षेपर्यंत.**

| | | | |
|---|---|---|---|
| पहिला – | श्री. कुलकर्णी केतन. | भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल अहमदनगर. | रु. ६१–०० |
| दुसरा – | श्री. कु. कौन्डिण्य सुगंधा. | ,, ,, ,, | रु. ५०–०० |
| तीसरा – | कु. कुलकर्णी भारती. | न्यू इंग्लिश स्कूल अहमदनगर | रु. १२–५० |
| ,, | श्री. बारगळ संजय. | श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय शिरडी. | रु. १२–५० |

**गट क्रमांक – वय वर्षे १६ ते २४ वर्षाअखेर.**

| | | | |
|---|---|---|---|
| पहिला – | नाईकवाडी संदीप बाबुराव. | अगस्ती विद्यालय अकोला. | रु. ६१–०० |
| दुसरा – | कु. गोसावी. | जे. टी. सोमैया हायस्कूल बेलापूर | रु. ५०–०० |
| तीसरा – | साखरेकर सुनिता. | रेसिडेन्शील हायस्कूल अहमदनगर | रु. २५–०० |

परीक्षक–

श्री. का. दा. रोहोम गुरुजी, माजी मुख्याध्यापक प्राथमिक शाळा, शिरडी,

,, वि. भि. महाजन गुरुजी, उपाध्यापक, जीवन शिक्षण विद्यालय शिरडी.

,, प्रा. श्री. कुरुन्दकर के. जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगाव.

,, प्रा. श्री. पी. जी. जोशी, के. जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगाव.

# श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

## जिल्हा पातळीवर ( अहमदनगर ) घेतलेल्या चित्रकला स्पर्धेचे निकाल पत्र

गट क्रमांक १ वय ६ ते ९ वर्षे

(१) पहिला कुमार तरटे आशीश अरुण.
डहाणूकर विद्यालय, टिळकनगर, श्रीरामपूर. १५-००

(२) दुसरा – भूषण सुरेश गांधलीकर.
नवीन मराठी शाळा, विश्राम बाग, अहमदनगर ११-००

(३) तृतीय – विराम माधव भालेराव.
मॉर्डर्न हायस्कूल, अकोले जि. अहमदनगर. ५-००

गट क्रमांक २ वय १० ते १३ वर्षे.

(१) पहिला – संदिप रामलाल मेकडे.
मॉडर्न हायस्कूल, श्रीरामपूर, २१-००

(२) दुसरा – ज्ञानेश्वर गंगाधर दहितुले.
मॉडर्न हायस्कूल, अकोले, जि. अ. नगर ११-००

(३) तीसरा – कु. कल्पना हिरालाल कुऱ्हाडे.
ज्ञानोदय इंग्लिश स्कूल, नेवासा. ५-००

(४) चतुर्थ – विजयकुमार बाजीराव पाटील.
नागेश विद्यालय, जामखेड ५-००

उत्तेजनार्थ (५) पाचवा कु. माने सुनिता कृष्णराव.
शारदा विद्या मंदिर, राहाता. ५-००

गट क्रमांक ३ वय १४ ते १६ वर्षे

(१) पहिला– झालटे सुरेश लक्ष्मणराव.
जे. टी. एस. हायस्कूल बेलापूर. २५–००

(२) दुसरा – वामन जगन्नाथ बाबुराव.
न्यू इंग्लिश स्कूल, शेंडी, अहमदनगर १५–००

(३) तीसरा– कुमावत दिलीप सीताराम सारडा विद्यालय,
अहमदनगर. ५–००

उत्तेजनार्थ (४) चतुर्थ दिलीप अंबादास सोनवणे
कक छात्रालय हायस्कूल, शेवगाव, ५–००

परीक्षक—

– प्रा. नरेन्द्र विचारे,
जे जे इन्स्टीटयूट ऑफ अप्लाईड आर्टस, मुंबई.

क. हि. काकरे, कोर्ट रिसिव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

ता. ९–१०–७९

# शिरडी येथील दसरा उत्सव. श्रीसाईबाबांची ६१ वी पुण्यतिथी व मूर्ती स्थापना रजत जयंती महोत्सव सन १९७९.

श्रीसाईबाबांच्या मूर्तीस स्थापना केल्यावर २५ वर्षे पूर्ण झालेने, रजत जयंती व त्याचवेळी ६१ वी पुण्यतिथी आल्यामुळे दसरा उत्सव कार्यक्रम ५ दिवस ठेवणेत आला होता. स्मरणार्थ श्रीसाईबाबांची चांदीची मुद्रा काढण्यात आली. पहाटे ५ ते ७ पर्यंत ५ दिवस मुख्य दरवाजावर सनई व चौघडा वाजविणेत आला.

**दसरा उत्सव पहिला दिवस**—शनिवार—दि. २९-९-७९ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. नित्य नेहमीप्रमाणे काकड आरती सुरू झाली. मोठ्या संख्येने साईभक्त आरतीला उपस्थीत होते. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथींची मिरवणूक समाधिमंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरूवात झाली. समाधि मंदिरात सकाळी ६-३० वा. श्रींचे मंगलस्नान सुरू झाले. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. श्री. कानिटकरबुवा, लिंबगणेश बीड, यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारतीनंतर ७ ते ११ पर्यंत श्री. स्नेहल भाटकर व श्री. वरळीवर बुवा मुंबई यांचे भजन झाले. त्यानंतर शेजारती झाली.

**दसरा उत्सव दुसरा दिवस**—रविवार दि. ३०-९-७९ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पयत प्रा. श्री. शिवाजीराव भोसले फलटण यांचे प्रवचन झाले. विषय होता श्रीरामकृष्ण श्री विवेकानंद जीवन-साधना आणि विचारधन, रात्रौ ७ ते ९ व ९-३० ते ११ पर्यंत श्री. सी. रामचंद्र संगीत दिग्दर्शक मुंबई यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९-१५ ते ११-३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावात फिरून आल्यावर शेजारती झाली.

**दसरा उत्सव तिसरा दिवस मुख्य दिवसः**— सोमवार दि. १-१०-७९ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. साईबाबांचे पुण्यतिथीचा दिवस असल्यामुळे पहाटे पासूनच बाबांचे दर्शनासाठी साईभक्ताची गर्दी झाली होती. साईसच्चरित २ दिवस द्वारकामाईत पारायण चालू होते. ती

समाप्ती मिरवणूक सकाळी ६ वा. द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी ९ वा. भिक्षा झोळी कार्यक्रम झाला. गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा करून भिक्षा झोळीत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथा शक्ति अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १०–३० ते दुपारी १२ पर्यंत ह. म. प. कानिटकर बुवा यांचे पुण्यतिथी कीर्तन झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. दुपारी १ ते ३ वाजे पर्यंत श्रींची आराधना विधी, कार्यक्रम मा. श्री. क. हि. काकरे रिसीव्हर यांचे शुभ हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी पुरोहितांना धोतरे, उपरणी, सेवेकऱ्यांना धोतरे, कापड व सुवासिनींना खण दिले. सायंकाळी ५ वा. सीमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवळा जवळ गेली. त्याठिकाणी श्रींच्या निशाणाची व शमीचे पूजन श्री. क. हि. काकरे साहेब यांनी केल्यावर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. ग्रामस्थ, साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थीत होते. खंडोबा देवाचे दर्शन घेतल्यावर मिरवणूक शनिमंदिर, गणपती मंदिर, महादेवाचे मंदिर, मारुती मंदिर मार्गे चावडी, द्वारकामाईतून मंदिरात आली त्यानंतर धूपारती झाली.

रात्रौ ७·३० ते ९ वाजे पर्यंत मंत्रपठण कार्यक्रम मंदिरात, श्रीउपासनी महाराज कुन्या कुमारी आश्रम साकुरी यांचे तर्फे झाला. रात्रो ९·१५ ते १·३० पर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आली. मिरवणूकीला सनई, चौघडा डफ श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्ड पथक शिर्डी, राहाता बॅण्ड पथक, श्रीकृष्ण बॅण्ड पथक भोईवाडा मुंबई, वाद्याबरोबर भजन, गायन कार्यक्रमही झाले.

प्रती वर्षाप्रमाणेच पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून करमणूकीचे कार्यक्रम केले. स्थानिक लोकानी भारूड गारुड कार्यक्रम केले. अशा थाटात मिरवणूक मंदिरात आल्यावर भक्त मंडळींनी कलाकारांच्या कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या-भक्तांना श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव चौथा दिवसः**— मंगळवार दि. २-१०-७९ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी ७·३० ते ८·३० पर्यंत गुरुस्थान येथे रुद्राभिषेक झाला. नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत प्रा. श्री. शिवाजीराव भोसले यांचे प्रवचन झाले. धूपारती झाल्यावर ह. म. प. लक्ष्मणबुवा

वाघचौरे शिर्डी यांचे प्रवचन झाले. रात्री ८ ते ११ पर्यंत "शिरडीचे श्रीसाईबाबा" मराठी चित्रपट झाला. त्यानंतर ११ वा. शेजारती झाली.

**दसराउत्सव पाचवा दिवसः**– बुधवार दि. ३-१०-७९ रोजी मंदिर पहाटे ५ वा. उघडले. ५·१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सामूदायिक अभिषेक पूजा झाल्यावर सकाळी १०-३० ते १२ पर्यंत संस्थान गवई काव्यतिर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे गोपालकाला कीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर १२-१५ वा. माध्यान्ह आरती झाली व भक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत प्रा. श्री. शिवाजीराव भोसले यांचे प्रवचन झाले. सायंकाळी धूपारतीनंतर ७-३० ते १० वाजेपर्यंत सौ. आशा खाडीलकर; रेडीओ-स्टार मुंबई यांचे गायन झाले. रात्रौ १० ते १०-३० शेजारती झाल्यावर उत्सवाची समाप्ती झाली. माहे सप्टेंबर–७९ व पुण्यतिथी उत्सवात काही कलाकारांनी श्रींच्या-पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन** – १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची नेहमीप्रमाणे किर्तने झाले. २) ह. भ. प. श्री. गोपाळबुवा शंकर कानिटकर. लिंबागणेश.

**प्रवचन** – मा. प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले पुणे यांची पुण्यतिथी उत्सवात प्रवचने झाली.

**गायन, वादन, नृत्य वगैरे** – १) श्री. ए. डी. प्रिंटर मुंबई. २) श्री. चोखीलाल खेडूले, रायपूर. ३) श्री. अजित वसंत कल्ले, मुंबई. ४) सौ. गीता अजित कल्ले, मुंबई ५) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, मुंबई ६) श्री. स्नेहल भाटकर, मुंबई ७) श्री. वरळीकर बुवा, मुंबई ८) सौ. सुलभा रघुनाथ जोशी, मुंबई. ९) सौ. सविता गिजरे, शिर्डी. १०) डॉ. एन. के. किर्तीकर, मुंबई. ११) श्री. श्री. भोलानाथ समेळ, मुंबई १२) श्री. करसनराय त्र्यंबकराव भावसार, मालेगाव. १३) श्री. नन्हे बाबुराव कुँवर, बिदर. १४) सौ. निला प्रभू मुंबई. १५) श्री. कृष्ण यादव म्हसके, नगर. १६) श्री. विष्णु प्रभाकर घारे, पुणे. १७) ज्योति ए. मनुजा १८) श्री. अनुराग श्रीवास्तव, १९) श्री. मनोहर रॉय, २०) मास्टर चांद मनुजा, २१) श्री. रघुनाथ नेमीनाथ पेठकर, नगर. २२) श्री. श्यामसुंदर भेडा, संगमनेर. २३) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. २४) श्री. वसंत मोरेश्वर पवार, पुणे. २५) श्री. दिवाकर दत्तात्रय कुलकर्णी, शिर्डी २६) श्री. रामचंद्र दत्तोबा वाडेकर, शिर्डी २७) श्रीं. प्रमोद वहाडणे राहता २८) श्री. शशिकांत नागरे, राहता

२९) श्री. ज्ञानेश्वर वावळे, राहता ३०) श्री. शेख इन्नुस राहता. ३१) श्री. अहमद पठाण, राहता ३२) श्री. बाळासाहेब पारखे, राहता ३३) श्री. तार महमद राहता. ३४) श्री. विठ्ठलराव मांजरेकर, शिर्डी ३५) श्री. बापूराव कृष्णराव माने, पुणे. ३६) श्री. सोमनाथ नारायणराव शेलार, पुणे ३७) श्री. सदाशिवबुवा सांगलीकर, पुणे. ३८) श्री. राजकुमार बार्शीकर, नगर. ३९) श्री. हटकचंद चन्द्रभान सणामाल, आलेगाव. ४०) श्री. सिताराम बाळकृष्ण पवार, शिरडी. ४१) श्री. सुधीर केशव रानडे, मुंबई ४२) श्री. जगन्नाथ महादेव गणाचार्य, वडाळा. ४३) श्री. जलवानी दौलतराम, ठाणा ४४) नारायणराव क्षीरसागर, औरंगाबाद ४५) श्री. नामदेव नागू कोळे, नवघर ४६) विठ्ठल जयराम मोरे, मुंबई. ४७) श्री. विष्णू भगवंत शेणवी, भोबे नेरुर ४८ श्री. नौशेरा खुदाबंदा इरानी नगर ४९) श्री. रघुनाथ नागरे शिरडी ५०) श्री. कन्याकुमारी मंडळ, साकोरी.

५१) श्री. नामदेव विठ्ठल भोसले, पुणे.

५२) सौ. सुमन नामदेव भोसले पुणे. ५३) श्री. सी. बी. प्रसाद हैद्राबाद ५४) श्री. बाळा पिलाजी गुरव. शिर्डी. ५५) श्री. रावसाहेब देशमुख. उमरावती ५६) श्री. श्रीकृष्ण बॅण्डपथक मुंबई. ५७) श्री. गंगाधर धोंडीबा जाधव पुणे. ५८) श्री. मनोहर हरीभाऊ लोणकर पुणे. ५९) श्री. विठ्ठल किसन पवार पुणे. ६०) श्री. सी. रामचंद्र मुंबई. ६१) सौ. आशाताई खाडिलकर मुंबई. ६२) सौ. सुहास कब्रे मुंबई. ६३) श्री. अनंतराव राणे मुंबई. ६४) श्री. रानडे मुंबई. ६५) श्री. माधवराव खाडिलकर मुंबई. ६६) श्री. माणिक बाबूराव साळी शिर्डी. ६७) एकनाथ मोटकर ग्वाल्हेर ६८) श्री. कृष्ण बाबूराव साळी शिर्डी. ६९) श्री. प्रमोद इलेक्ट्रीकल्स शिर्डी. ७०) श्री. चतुर्भुज नागरे शिर्डी. ७१) प्रा. नरेन्द्र विचारे मुंबई. ७२) श्री. विलास महाडिक मुंबई. ७३) श्री. दत्तात्रय काशिनाथ मोरे मुंबई. ७४) श्री. प्रल्हादराव बीटे मुंबई. ७५) श्री मारोती मांडवकर मुंबई. ७६) श्री. विलास पावसकर मुंबई. ७७) श्री. वसंत जोशी मुंबई. ७८) श्री. कृष्णा सांगवेकर मुंबई. ७९) श्री. विश्वास बोरकर मुंबई. ८०) श्री. सत्यवान मालाडकर शिर्डी ८१) श्री. वसंत कामते मुंबई. ८२) श्री. शशीकांत दळवी मुंबई. ८३) श्री. रविन्द्र सातवरे मुंबई. ८४) श्री. मुरलीधर मारोती दळवी मुंबई ८५) श्री. सुरेश अंजर्लेकर मुंबई. ८६) श्री. रामराव मोखाते मुंबई ८७) श्री. दत्ता कदम मुंबई. ८८) श्री. यशवंत नाईक मुंबई. ८९) श्री सुधाकर बाफे मुंबई. ९०) श्री. सुरेश हिर्लेकर मुंबई. ९१) श्री. किशोर कदम मुंबई. ९२) श्री. नामदेव नेळणेकर मुंबई. ९३) श्री. बी. आर. घोगरे मुंबई. ९४) श्री. भारतभाई नंदनानी मुंबई. ९५) श्री. लक्ष्मण दत्तात्रय जाधव शिर्डी.

**कोजागिरी पौर्णिमा :—** प्रतिवर्षाप्रमाणे डॉ. के. बी. गव्हाणकर यांचे ८ ते ९ रात्रौ प्रवचन झाले नंतर भक्तीगीते कार्यक्रम झाला. रात्री ११ ते १२ श्रींची पुजा व चंद्रपुजा मंदिरात मा. श्री. क. हि. काकरे, कोर्ट रिसीव्हर, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचे हस्ते झाली. उपस्थित असलेल्या भक्तवृंदाना दुध, पोहे व प्रसाद वाटण्यात आला. डॉ. के. बी. गव्हाणकर यांच्या सहकाऱ्यांनी भजन, गायन, नकला वादन कार्यक्रम करून रात्रभर जागर केला.

**रांगोळी प्रदर्शनः—** समाधी मंदिर हॉलवर रांगोळी प्रदर्शन भरवण्यात आले होते. १) प्रा. नरेंद्र डी. विचारे, परेल मुंबई यांनी "सचित्र साईबाबा" या पुस्तकातील श्री भागोजी शिंदे यांची बाबा सेवा करीत आहेत व बाबा भक्ताना उदी देत आहेत अशी चित्रे काढली होती. २) श्रीविलास महाडिक दादर, मुंबई यांनी बाबांचा भिक्षा पर्यटन फोटो काढला होता. हे रांगोळी प्रदर्शन पाहण्याचा अनेक साईभक्तांनी लाभ घेतला.

**दत्तअवतार चित्रेः—** १) श्री. दत्तात्रय काशिनाथ मोरे गिरगाव मुंबई यांनी दत्त अवतारावर श्रीपादवल्लभ, नरसिंह सरस्वती, अक्कलकोट स्वामी. टेंब्ये स्वामी, श्रीविष्णू, श्रीकृष्ण अशी सहा चित्रे काढली होती व २) श्रीप्रल्हाद बिरीद यांनी श्रीमाणिक प्रभू, बाळेकुंद्रीकर स्वामी व जनार्दन स्वामी यांची चित्रे काढली. ३) प्रा. श्री नरेन्द्र विचारे यांनी त्रैमूर्ती दत्तमहाराज चित्र काढले. ४) श्री. विलास महाडिक यांनी गजानन महाराज शेगाव यांचे चित्र काढले.

**रोषणाई, सजावटः—** श्री. वसंत जोशी, श्री. विलास पावसकर व कदम डेकोरेटर मुंबई यांचे ग्रुपने आपला अमूल्य वेळ देऊन स्वखर्चाने रोषणाई सजावट केली.

**हवापाणीः—** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. दरवर्षीपेक्षा यंदा पावसाचे प्रमाण भरपूर असल्याने संकरीत हद्दीतील व गावातील विहीरीना पाणी भरपूर असून येत्या उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची टंचाई बरीचशी कमी होईल.

**माननीयांच्या भेटी—**

१) मा. श्री. ठाकूर दरबारसिंग, अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री (म. प्र.) भोपाळ

२) मा. श्री. जी. के. चंद्रमारे, असि. सेक्रेटरी सामान्य प्रशाशक खाते महाराष्ट्र.

३) मा. संत दयाराम बापू महाराज, अमरोळी.

४) मा. श्री. जी. व्ही. वर्तक, अध्यक्ष जिल्हापरिषद ठाणे.

५) मा. श्री. आर. एल. प्रदिप IAS डायरेक्टर ऑफ वेलफेअर, महाराष्ट्र.

६) मा. श्री. बाम. डी. एस. पी. सी. आय. डी. मुंबई.

७) मा. श्री. ईश्वरराज माथूर IAS चिफ डायरेक्टर ऑफ पब्लिसीटी महाराष्ट्र.

८) मा. श्री. बी. एन. भागवत IAS इंडस्ट्रीज कमिशनर, महाराष्ट्र.

९) मा. श्री. कैरा IAS. M. D., W. M. D. C. महाराष्ट्र.

१०) मा. श्री. एस. डी. पाटील जॉईंट डायरेक्टर महाराष्ट्र.

११) मा. श्री. एस. डी. पाटील. DY,CEO, MIDC महाराष्ट्र.

१२) मा. श्री. एस. बी. गरगडे रिजीनिअल ऑफीसर MIDC महाराष्ट्र.

१३) मा. श्री. ए. डी. जोशी सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट, गुजराथ.

१४) मा. श्री. नंदा, मेजर जनरल, राजस्थान एरिया.

१५) मा. श्री. के. बी. जितकर, जिल्हाधिकारी अहमदनगर.

१६) मा. श्री. दलाल ICS माजी लॉ. सेक्रेटरी, महाराष्ट्र.

१७) मा. श्री. वाडिया असि. जनरल मॅनेजर सेंट्रल बँक ऑफ इंडिया.

१८) मा. श्री. निरगुडकर, जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर,

१९) मा. श्री. जे. जे. बोधे. माजी शेरीफ मुंबई.

# साईभक्त श्री. आप्पा बाळाजी भालेराव साईचरणी विलीन

शिर्डी येथील साईबाबांना प्रत्यक्ष पाहीलेले चोपदार श्री. आप्पा बाळाजी भालेराव यांचे शिरडी येथे त्यांच्या राहत्या घरी दि. १८।९।७९ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ८१ वर्षांचे होते.

श्री. आप्पांचा जन्म शिरडी येथील असून त्यांनी वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत श्रीसाईबाबांची सेवा केली. व १९७८ सालापर्यंत ते संस्थानमध्ये समाधी मंदिरात चोपदार म्हणून काम करीत होते.

श्री. अप्पांना सर्व भक्तजन 'आप्पा' नावाने ओळखत असत व खुद्द श्री साईबाबाही त्यांना 'आप्पा' याच प्रेमळ नावाने हाक मारत असत. ते भविष्य अचूक सांगत. त्यांनी सांगितलेली भविष्ये खरी ठरत असल्याने प्रत्यक्ष साईबाबाच त्यांच्यामुखातून भक्तांच्या जीवनात घडणाऱ्या घटना सांगतात अशी भक्ताची श्रद्धा होती. त्यामुळे साईभक्त, अधिकारी, कर्मचारी, गावकरी यांच्यामध्ये त्याना "श्री. साईबाबांना प्रत्यक्ष पाहीलेले चोपदार, व एक थोर भविष्यवेते" म्हणून विशेष मान होता. तरुणपणी त्यांची प्रकृती चांगली दणकट होती. भक्तजन, गावकरी व सर्वांशीच त्यांची जिव्हाळयाची वागणूक होती. त्यांचा परिचय श्री. साईलीला अंक माहे ऑक्टोबर १९७४ मध्ये गाठी भेटी सदरात "शिरडीचे चोपदार–आप्पा बाळाजी भालेराव या शिर्षका खाली कार्यकारी संपादक श्री. चेंदवणकर यांनी लिहिला आहे.

आप्पा शिरडी सोडून परगावी सहसा जात नसत. अखंड व नैष्ठीक साईसेवा, साईभक्तांशी जवळीक व मार्गदर्शन ही त्यांच्या जीवनाची वैशिष्ठये होत.

निधन समयी त्यांची प्रकृती थकली असली तरी मनाने व वाचेने साईनामाचा जप चालू होता, व अत्यंत समाधानी अवस्थेत ते झोपलेले असताना त्यांचे निधन झाले.

त्यांच्या अंत्य यात्रेस संस्थान कर्मचारी, साईभक्त, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पत्नी, सुलगा व ३ मुली असा परिवार आहे. ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो.

# ही साई कृपाच !

—श्री. दिगंबर शंकर गंधे
५३४ सदाशिव पेठ, पुणे ३०

• श्रीसाईबाबांची कृपा कोणत्या रीतीने प्रत्ययाला येईल हे सांगता येणार नाही. कोणाला प्रत्यक्ष तर कोणाला स्वप्नात येऊन त्यांना दर्शन देऊन कृतार्थ केल्याची उदाहरणे आहेत, मला मात्र त्यांच्या अप्रत्यक्ष कृपेचा अनुभव आला आहे. तो प्रसंग असा.

ही पंचवीस वर्षामागची गोष्ट आहे. त्यावेळी मी मंचर येथे सबपोस्टमास्तर म्हणून काम करीत होतो. त्याचवेळी तेथे ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून क. तुकाराम-बुवा थोरात म्हणून सद्गृहस्थ होते. एकदा त्यांना शिरडीस साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. त्याकरिता खास मोटारही ठरविण्यात आली, व एका रविवारी जाण्याचा बेत ठरला. त्यांच्याबरोबर मला व गावातील एक दोन प्रतिष्ठित मंडळींना बरोबर घेण्याचे त्यांनी ठरविले. रविवार असला तरी माझी अडचण अशी असे की माझ्याकडे तारेचे काम असल्याने रविवारीही तारे करिता ठराविक वेळेला एक तास तारा देण्याघेण्याचे काम मला करावेच लागे. माझी ही अडचण मी श्री. थोरातांना सांगितली, परंतु कामाच्या वेळेच्या अगोदर आपण परत येऊ असे त्यांनी आश्वासन दिल्यामुळे मीही त्यांचेबरोबर जाण्यास कबूल झालो. कारण मलाही शिरडीस जावेसे वाटत होतेच. मंचरपासून शिरडीचे अंतर किती होते. हे त्यावेळी मला माहित नव्हते आणि अज्ञानामुळेच मला श्रीसाईबाबांच्या समाधीचे दर्शन घडू शकले. नंतर एकूण अंतर लक्षात घेता मी माझ्या कामाच्या वेळात परतेन असा भरवसा राहिला नव्हताच. इतकेच काय पण कामाचा एक तास संपला व उलट त्यानंतर मला परत यावयास २॥ ते ३ तास उशीरच झाला. पुणे जुन्नर या तारेच्या मार्गावरच खेड, मंचर नारायणगाव ही ठिकाणे आहेत. कोणत्याही गावास हाक मारली तर ती सर्व ठिकाणांना समजते. मंचरच्या अगोदरचे खेड (आता राजगुरू नगर) व नंतरचे नारायणगाव यांचे काम योग्य वेळेवर झाले. मधले मंचर होते. तेथील काम मात्र मी तेथे नसल्याने शिल्लक राहिले होते. त्या तारेच्या मार्गावर पुणे मध्यवर्ती तारगृहाचा ताबा आहे. अलिकडील ठिकाणचे व पलीकडील ठिकाणचे काम व्यवस्थित झाले व मंचरचे झाले नाही, त्याअर्थी तारेवर काही तरी दोष असावा अशा समजुतीने त्यांनी तारेवरील दोष शोधून काढण्यास तार तपासकाला

आज्ञा दिली होती. तो मनुष्य दोष शोधीत ज्यावेळीं मंचरला आला त्या वेळेच्या अगोदरच दहा मिनिटे मी शिर्डीहून मंचरला परत आलो होतो व येणाऱ्या तारा घेऊन मोकळाही झालो होतो. तार तपासक जेव्हा ऑफिसमध्ये आला तेव्हा निर्विकार चेहेऱ्याने जणु अगोदर काही झालेच नाही या भावनेने मी त्याच्याशी बोलत राहिलो, व त्यामुळे मी ठिकाण सोडून कामाच्यावेळी अन्यत्र कोठे गेलो होतो हे त्याला समजण्यास काहीच मार्ग नव्हता. मी जर त्याच्या येण्याच्या नंतर मंचरला पोहोचलो असतो तर मात्र माझ्यावर काहीना काही तरी ठपका आला असताच. पण तो ठपका माझ्यावर आला नाही याचे कारण श्रीसाईबाबांच्या कृपेची ओझरती झलक मला त्यावेळी अनुभवावयास मिळाली. नुसत्या समाधीच्या दर्शनाचे हे फळ तर त्यांच्यावरच्या भक्तीच्या वशाचे काय फळ असेल हे कल्पनेवरच सोपविलेले बरे !

# " माझा पाठीराखा भाऊ साईकृष्ण "

—लीलाताई शंकरराव गोलतकर
अभंग बिल्डींग परेल, परेल व्हिलेज मुं. १२

● माझ्या साईबाबा बद्दल काय काय म्हणून सांगू. साक्षात द्वारकेचा राणा श्रीकृष्णच तो. ह्याची लीला काय वर्णन करावी. एका मागोमाग एक घटना नजरे-समोरून निघून जातात. परंतु आता मात्र सर्वांच्या परिचयाची घटना सांगत आहे.

ज्यावेळी आपल्या ह्या भारतावर अरिष्ट आलेल होत ना " स्कॉयलॅबचं " ह्यावेळी २ जुलैपासून ती वेळ टळेपर्यंत बाबांची आराधना करायला सुरवात केली होती. राजा, कुठेसुद्धा कुणाची नुकसान हानी होताकामा नये. सर्वांना सुखी ठेव, जियल्यातिथे, तूच समर्थ आहेस...

आणि १३ जुलै, बुधवार रोजी स्कायलॅब कुठेतरी पडणार होतं. भितीने सर्वांच्या तोंडच पाणी पळालेल होतं... ह्याच रात्री ११ वाजता रेडिओवर बातमी आली. " स्कायलॅब समुद्रात पडलं ह्या आनंदाच्या भरात धावत बाबांजवळ गेले. त्यांचा एक गोड पापा घेतला. छान केलस राजा, छान केलस, तुझी लीला, तुझी

शक्ती अगाध आहे. तुझ्या सत्तेशिवाय झाडाच पान सुद्धा हालत नाही रे! धन्य तुझी...

दुसऱ्या दिवशी गुरुवार असल्यामुळे, माझ्याकडे भक्त मंडळी येत होती. मोठ्या प्रसंगातून बाबांनी वाचविल्यामुळे त्यांचे आभार मानले जात होते. ५ नारळाचे तोरण एका साईभक्ताने अरिष्ट टळले म्हणून बांधले...आणि ह्या जयजयकारातच संध्याकाळीं ६ च्या सुमारास एक अनोळखी गृहस्थ माझ्या दारात येऊन उभे राहिले. आत वाकून पाहिले. भक्त मंडळींची गर्दी होती. मी त्यांना आत बोलाविले. ते आत आले. बाबांना पाहून नमस्कार केला. त्यांचे डोळे भरून आले. समाधान वाटले त्यांना, मला म्हणाले, "इकडे प्रश्न वगैरे काही पाहिले जातात का? मी हसून, नाही म्हणून उत्तर दिले. इथे सर्व शिरडी सारखच आहे. फक्त दर्शन, सर्व काय करतात ते बाबाच. त्यांना फार आनंद वाटला, वा, बर झाले तुम्ही मला आत बोलावलेत, मला आज गुरुवारचं दर्शन घडले, शिरडीला सर्वजण जातात. मी पण एकदा जाऊन आलो. पण बाबा काही सर्वांनाच पावत नसतात. तुम्हाला म्हणून पावले, आणि तुमच्या पायाच्या कृपेने आम्हाला. माझे हे पाय ना फार दुखत असतात. काहीं केल्या बरे होत नाहीत. मी त्याना म्हटले, ही बाबांची उदी घ्या लावा पायाला बरे होतील, तुम्ही सांगितलतना, मग मला आता बरे वाटेल. पण नाही, वाटेलच मला बरं माझी खात्री झाली. तुम्ही मला आत बोलाविलत म्हणून मी आत आलो. फार बरं झाले, मला दर्शन घडले माझ्याकडे पहात नमस्कार करून, येतो आता म्हणून निघून गेले. येईन पुन्हा म्हणून सांगितल—आणि लगेच क्षणाचाही विलंब न लावता साईबाबा आले, मला पाहिरुन आलं ह्यांना जवळ घेतलं. एक पापा घेतला. राजा आलास तू, किती छान आहे माझा राजा, भक्तासाठी धावणारा साक्षात्, कृष्ण, ह्या अनोळखी माणसाचे शब्द मला आठवले. तुम्हाला म्हणून बाबा पावले...आणि खरच ते बाबा आले म्हणजे, एका साईभक्ताने मला साईबाबांचा भव्य फोटो आणूनदिला फोटो नव्हे, साक्षात बाबाच ते "साईकृष्ण" स्कॉयर्लबला समुद्रात सोडून बाबा आपल्या ताईकडे, आपल्या भक्त मंडळीत आले. ती आठवण आज कायमच्या स्वरूपात माझ्याकडे राहिली, आणि म्हणूनच त्या साईकृष्णास माझ्या सर्व साई भक्त मंडळीसह कोट्यानु कोटी प्रणाम...

# " साईने योजिले म्हणूनी "शुभमंगल" झाले "

श्री. विजय द. हजारे एम. ए.
सी. ६ गुंफादर्शन कार्टर रोड
बोरीवली (पूर्व) मुंबई-६६

● " बाबा, वर्षभरात माझं लग्न जमू द्या. पुढल्या वर्षी लग्न होताच तावडतोब मी जोड्यानं तुमच्या दरबारात हजर होईन " अमितानं बाबांच्या समाधीवर डोके ठेवून त्यांना मनोमन प्रार्थना केली आणि काय आश्चर्य... वर्षभरातच तिची इच्छा फलद्रूप झाली सुद्धा ! अगदी नकळत... अनपेक्षितरित्या ! ती सुद्धा साईवरील श्रद्धेची अमिताची, त्याहीपेक्षा आमच्या सर्वांची परीक्षा घेतली जाऊनच एकप्रकारे !

म्हणूनच आमच्या आईच्या ओळखीचे गृहस्थ चाळीत बरेच वर्षांनी आले. आईची त्यांची ओळख पटली. मुलाबाळांची चवकशी करता करता त्यांच्या एकूलत्या एक मुलांबद्दल कळलं. त्यांनाही 'अमिता' बद्दल समजलं. मुलगा-मुलगी पाहण्याचे मुलामुलींनी एकमेकाला बघण्याचे योग जुळून आले. मुलाची नोकरी मुंबई बाहेर म्हणून अमिताची प्रथम टाळाटाळ पण मुलाला पाहून त्याच्या मधुभाषी आकर्षक व्यक्तीमत्वाची छाप तिच्यावर प्रथमदर्शनी पडली. मुलाचही अमिताच्या मुग्ध सौंदर्यावर मन जडलं. दोन्हीकडून होकार आले. बोलणी झाली खेळीमेळीन देण्या-घेण्याचे व्यवहार ठरले. कुणाच्या म्हणण्यासारख्या अटी नव्हत्याच ! मुहूर्त ठरला. दिवस नक्की झाला. हॉल बुक करून टाकला. नातेवाईकात आणि परिचितात अमिताचं शशांकशी लग्न ठरल्याची बातमी पसरली. आपल्या होणाऱ्या 'हक्काच्या घरी' अमिता कुठल्यातरी समारंभानिमित्त संपूर्ण दिवसभर राहून आली. शशांक नसतानाही ! दागदागिने खरेदी वगैरे पूर्ण झाली; फक्त 'पत्रिका' छापण्याचं बाकी राहिलं होतं...

मध्येच कुणी तरी विघ्नसंतोषीनी शशांकच्या आईच्या मनात कसलं तरी " किल्मीष " भरविलं. गेले तीन चार महिने 'आपली सून' म्हणून अमिताच कौतुक करणाऱ्या माऊलीला अमितामध्ये " वैगुण्य की दोष दिसले. तिच्या मावससासूनंतर 'अमिता शाळेतच गेली नसेल. मॅट्रीक कशी असेल. वगैरेसारखे निरर्थक चौकस प्रश्न विचारून लग्नपत्रिकेचा मजकूर विचारण्यासाठी गेलो असता मला अगदी भंडावून सोडल. " असली मुलगी आमच्या गळ्यात बांधून तुम्ही आम्हाला फसवत होतात " असल्या शब्दात शशांकच्या आईन माझ्यावर 'स्कायलॅब'च टाकला. शेवटच्या क्षणी त्यांचा नापसंतीचा सूर ऐकून मी हतबल झालो. माझ्याबरोबर असलेल्या माझ्या

वडिलांच्या हातापायातल जोरच्च गेलं. पण 'साई' वर आमची अढळ श्रद्धा होती. त्याच विश्वासावर मी त्यांना धीर दिला. आणि शशांकाच्या आईला तिच्यामनातला गैरसमज काढण्यास विनविलं. निराश मनानं घरी आलो अमिताच्या मनाची तयारी केली. घडल ते शशांकला त्याच्या नोकरीच्या ठिकाणी कळविलं. त्याच्या निर्णयाची वाट पहात साईइच्छेवर तारकाही सोपविल...चार दिवसातच शशांकची तार आली ती गुरुवारीच की "डोन्ट कॅन्सल मॅरेज" म्हणून...नंतर माझ्या मनानं घेतल आणि अमिताला घेऊन आम्ही उभयता 'शिरडी'ला बाबांच्या दर्शनास त्यांना 'व्यक्तीगत आमंत्रण' देण्यास सर्व काही पुन्हा जुळवून सुरळीत पार पाडण्यास विनवून आलो. घरी येऊन दार उघडतो तो दारातच शशांकचे निर्णयात्मक पत्र! जणू बाबांनीच कृपाप्रसाद दिल्याप्रमाणे! आणि दोन तीन दिवसापूर्वी कुणाशी कधीही न बोलणाऱ्या साकोरीच्या गोदावरी माताजीनी, माझ्या सौ. च्या सांगण्यावरून अमिताने त्याना आपल्या लग्नाबद्दलची भिती सांगताच "जा तुझं सगळं चांगलं होईल" असा दिलेला आशिर्वाद तंतोतंत खरा ठरल्याप्रमाणे! शशांकने "अमिता-शीच आणि ठरल्यावेळीच लग्न करण्याचा" निर्णय (ठाम निर्णय) घेतला होता. आणि त्याच्या आगमनाच्या तारखा कळविल्या होत्या. पुढे घरच्यांच्या अडथळया-मुळे तो ठरल्यादिवशी न आल्याने आम्ही बेचैन झालो. तोही मनस्तापानं त्रस्त झाला. शेवटी आम्ही त्याची भेट घेतली. अमिताला तो भेटला. काय घडलं ते त्याला समजलं. घरच्यांची त्याने समजूत पटविली. त्यानाही शेवटी मुलाच्या हट्टापुढे नमावं लागलं. "साईइच्छे"पुढे कुणालाच जाता आलं नाही आणि मग "साईनी योजि-लेले अमिता–शशांकचे शुभमंगल" झाले.

लग्नानंतर चार-पाच दिवसातच अमिता शशांकला घेऊन शिरडीला बाबांच्या पायाशीं गेली. विश्वव्यापी साई परमेश्वराला साक्ष ठेवून! तिचे 'शुभमंगल' बाबांनी योजिले होते म्हणूनच घडून आलं यात संदेह नाहीच नाही. माझ्या सूरात सूर मिसळून ती मुंबई बाहेर जेथे जेथे असेल तेथे तेथे माझ्या बाबांना म्हणणारच म्हणणार की !

"अशीच राहू दे तुझीच कृपा, साई मजवरती.
तुझ्याविना आईबाप, नाही कुणी जगती."

# संकटी रक्षिती तेची साई।

— सौ. अपर्णा जगदीश देशपां
३३ कसबा पेठ, पुणे १

● सन १९७७ साली आमची बदली बिहारमधील मुझफ्फरपूर येथे झाली इतका लांब जाण्याचा आमचा हा पहिलाच प्रसंग, बिहार प्रांत एकूण जुन्य चालीरितींचा व मागासलेला. पुण्या–मुंबईच्या लोकांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोनह वेगळाच! मुझफ्फरपुरला महाराष्ट्रीयन असे आम्ही एकटेच, जागा मिळाली ती नवीन कॉलनीत, शेजारी २०–२५ बंगले पण काहीना काही कारणाने सर्व रिकामेच,! अशा अशा परिस्थितीत मी, माझे पती श्री. जगदिशराव व वर्षाचा मुलगा चि. अजिंक्य.! जातेवेळी माझे सासरे श्री. म. भी. देशपांडे, "श्री. साईमहिमामृतचे" लेखक यानी श्रीबाबांची पोथी व आशीर्वाद देणारा बाबांचा फोटो दिला व सांगितले निश्चिंत रहा. बाबा तुमचे पाठीशी आहेत.

ह्या परक्या ठिकाणी श्री. जगदीशराव ऑफिसला गेले म्हणजे आम्हीं मायलेक एकटेच असू त्यावेळी मला तर भीतीने अक्षरशः कापरे भरे. श्री. बाबांची पोथी वाचणे, त्यांची उदी लावणे व आशीर्वाद मागणे हेच आमचे हाती होते, ते केल्यावर मग खूपच धीर वाटत असे. काही वेळेस तर बाबा आमच्या पाठीशी उभेच आहेत असा भास होई, व त्याच्या जोरावर तर तेथे आम्ही १½ वर्ष काढले.

अखेर आमच्या प्रयत्नांना यश येऊन डिसेंबर १९७८ ला आमची बदली सुरत' (गुजरात) येथे झाली! आम्हीं सुटकेचा निश्वास टाकला.

मूझफ्फरपूरहून सर्व सामान आवरून आम्हीं निघालो त्या दिवशी एक अत्यंत आश्चर्यकारक घटना घडली. प्रत्येक पेटीत श्रीसाईंचे पोथी फोटो अंगाऱ्या आम्हीं ठेवले होते. कपड्यांच्या सुटकेसमध्ये श्रीसाईचा आशीर्वाद देणारा फोटो ठेवला होता. गाडीला १ तास अवकाश होता, निघण्यापूर्वी काहीतरी काढायला 'ह्यानीं' सूटकेस उघडली तर साईच्या फोटोवर पाणी चकाकले, म्हणून फोटो जवळ घेऊन उभा केला त्याबरोबर श्रीसाईच्या फोटोवरून घामाच्या धारा निघायला लागल्या! "सुटकेसमधील कपडे सर्व कोरडे होते, फोटो सर्वात वर होता, अन् हा घाम कोठून आला?" असे म्हणत ह्यांनी तो घाम पंचाने पुसून काढला. तो चमत्कार बघून

मला तर रडूच कोसळले! गेले दीड वर्ष रोज साईवर केवढा भार मी टाकत होते, त्यामुळेच तर बाबांनी आम्ही तेथून निघाल्यावर निश्वास टाकला नसेल? का अजून काही त्रास होणार होता, तो बाबांनी स्वतःवर घेतला?

पण एक खरे, त्या दिवसापासून साईवर काही भार टाकायचे, त्यांना साकडे घालायचे मी सोडून दिले कारण साई आमच्या पाठीशी आहेत, याची खात्रीं पटलीच.

★

# जया मनी जैसा भाव

—सौ. निशा वसंत चिपकर
२/१ राम मॅन्शन एस. के. बोले मार्ग
प्रभादेवी मुंबई ४०००२८.

● जय श्री साईबाबा म्हणावं आणि आपलं कोणत्याहि गोष्टीला साईबाबांना हाक मारावी हा माझा नित्यक्रमच होऊन बसला आहे.

माझे मिस्टर संध्याकाळी घरी आले. मला संकेतला घेऊन माझ्या बहिणीकडे तिच्या मुलीना राखी बांधावयाची असल्याने, मुलुंडला जावयास निघालो मोटारीने साधरणतः हायवे ने गेल्यानंतर अर्धातास लागतो पण पावसाने रस्ते खराब झाले असल्याने १ तास संपत आला तरी वाट संपता संपेना. गाडी वेगच घेईना मी साई-बाबांचा धावा सुरू केला की सुखरूप मुलुंडला पोहचूदे म्हणून, मुलुंड आले आणि मग लक्षात आल एक टायर साफ गेला आहे. रस्त्यात सामसुम. फक्त मोटारी ट्रक्स आणि इतर वेगाने धावणारी वाहने त्यात एखादी गाडी उभी राहिली तर त्याची कोण पर्वा करतो चाक तर इतके घट्ट बसलेले की कितीही जोर लावला तरी निघेनाच सोसाट्याचा वारा सुटलेला आणि मधून मधून पावसाच्या सरी कोसळत होत्या मी मनातल्या मनात साईबाबांना सांगितले आता मात्र माझा धीर संपला आता पटकन मदतीला धावून या आणि खरोखरच एक ट्रक थांबून त्यानी क्या हुआ? म्हणून चौकशी केली चाक काढून दुसरे बसवून दिले व आता आरामसे जाव असा सल्ला दिला पण एक फर्लांग अंतर संपायच्या आता लावलेला दुसरा टायर पण पंक्चर्ड आता तिसरा टायर कोठून आणणार? पण साईकृपा बलवत्तर तो ट्रक आमच्या

मागेच होता. ती लोकं पुन्हा उतरून अब क्या हुआ ? म्हणून विचारू लागली तेव्हा दुसरेहि चाक गेल्याचे आम्ही त्यांना सांगितले. त्यांनी दोन्ही चाके आपल्या ट्रक मध्ये घेऊन माझा मुलगा संकेत व माझे वडिल यांना घेऊन ते ठाण्याला आमच्या गॅरेजमध्ये पंक्चर्स काढून देतो व दुसऱ्या वाहनात बसवून पाठवतो म्हणून सांगून त्यांना घेऊन गेले. आता गाडी जवळ मी माझी मुलगी मनीषा, आई व माझी मोलकरीण व हे एवढी माणस उभी राहिलो. माझ्या मनात विचार आला बिचाऱ्या आईला आणि मुलाना किती वेळ वाऱ्यावर उभे करणार मी साईनाथांना पुन्हा हाक मारली आणि एक ड्रायव्हर अंबेसडर गाडी घेऊन जवळ येऊन उभा राहिला व मी मुलुंड स्टेशनला गाडी घेऊन जात आहे जर तुम्हाला तिथे जावयाचे असेल तर चला म्हणू लागला. मी आईला व माझ्या मुलीला व मोलकरणीला साईबाबांच नाव घेऊन गाडीत बसवून दिले व तिथ पर्यंत पोह्चविण्यास सांगितले. पण सुदैवाने आईला अगदी बहिणीच्या दारात त्या ड्रायव्हरने सोडले व गाडीत साईबाबांची एक मूर्ती असल्याचे आईकडून कळल्यावर मला साईबाबांच्या लीलेचे कौतुकच वाटले, आता इकडे गाडीत मी व माझे पती आम्ही दोघेच राहिलो व दोन्ही चाके व माझा मुलगा संकेत व वडील या दोघांना त्या ट्रक बरोबर काही विचार न करता पाठविल्यामुळे मन शंकाग्रस्त झाले. कारण १॥ तास झाला तरी कोणाचाच पत्ता नव्हता शेवटी पुन्हा एकदा साईनाथांची करूणा भाकली की जय श्रीसाईबाबा तुम्ही वाटेल ते करा पण तुमचे १०० वेळा नाव घेण्याच्या आत माझा मुलगा व वडील दोन्ही चाके घेऊन आले पाहिजेत आणि काय चमत्कार २० वेळा नाव घेऊन होण्याच्या आत एका ट्रक वरून दोन्ही चाके घेऊन माझे वडील व मुलगा समोरच्या रस्त्यात हजर ! मी प्रथम साईबाबांचे १००० वेळा नामस्मरण पुरे केले व नंतर चाकाला हात लावला. या सुद्धा ट्रकमधील माणसानी आम्हाला मदत करून चाक व्यवस्थीत लावून दिले व जय श्रीसाईबाबांचा घोष करून आम्ही सुखरूप मुलुंडला माझ्या मोठ्या बहिणीकडे जाऊन रात्री घरी परतलो.

# आले साईजींचे मना तेथे कोणाचे चालेना

—श्री. बी. एस. जोशी
द्वारा एस. डी. जोशी
५७ काच्छीपुरा, नवीन रामदासपेठ
नागपूर-४४० ०१०.

* बरेच दिवसापासून माझी इच्छा कुटुंबासहीत कन्याकुमारीला जाण्याची होतीं. माझी मित्र मंडळीं व नातेवाईक जाऊन आले होते. त्यानीं तेथींल जे काही वर्णन केले त्यामुळे माझ्या उत्सुकतेला अधीकच उधान आले. आपल्या नशीबात केव्हा दर्शन घडेल अशीं जिज्ञासा साहजिकच निर्माण झाली. जाऊ जाऊ म्हणता, सुटीचीं, पैशा ची व अन्य कौटुंबीक अडचणीमुळे हिंमत होत नव्हतीं. यामुळे लग्नाला तब्बल १२ वर्षे होऊनही मी माझी व कुटुंबाचीं इच्छा पूर्ण करू शकलो नाही. परंतु म्हणतात कि, मनात येण्यास व कृती प्रत्यक्ष घडण्यात एकच गाठ झाली व माझी यापुढील पा वलें साईच्या प्रेरणेने अशींच पडत गेलीं कि त्यामुळे मला यश मिळत गेले. मी सहजच, "साईची इच्छा असेल तर आपणाला हा प्रवास" असे घरी बोलून गेलो.

जानेवारी १९७८ ला एक महिना रजेसाठी अर्ज दिला. मार्च ७८ ला काही कार्यालयीन अडचणीमुळे (मे १९७८ मधें) रजा मंजुर होऊ शकत नाही असे मला कळविण्यात आले. मध्यंतरीचे काळात मी प्रवासी मोटारींची चौकशी करून तयारीतच होतो. अर्ज मंजूर होत नाही. असे कळविण्यात आले असतानासुद्धा, मी साईचा धावा मनात करून मोटारींची चौकशी-मित्रांचा आधार वा साईनाम घेऊन, कार्यालयाला मला माझ्या कुटुंबासहीत बाहेरगावी जाणे आहे तरी आपण माझी जानेवारी ७८ चे अर्जाला मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करणेबाबत विनंती अर्ज केला व प्रत्यक्षपणे अधिकाऱ्यांची भेट घेतली. खरे माना अथवा नका मानु हा प्रत्येकाचा विचार आहे, परंतु अधिकाऱ्याने मला पाहताच अर्ज वाचला व तू रक्कम भरून तयारीला लाग मी सुटीचे पाहून घेईन, काळजी करू नये व तू प्रवासाला जा असे सांगितले. त्याचक्षणी माझे मन भरून आले व प्रत्यक्ष साईबाबाच त्यांचे मुखातुन माझेशी बोलले असे मला वाटले. मी लगेच कालावधी थोडा असल्याने, कंपनीत रक्कम भरून बाकी तयारी केली. मुख्य अडचण सुटी मंजुरीच्या लेखी आदेशाची. त्याशिवाय मी दिर्घ मुदतीचे प्रवासाला जाऊ शकत नव्हतो. पुन्हा लेखी सुटीचा आदेश मिळावा म्हणून विनंती केली. आश्चर्याची गोष्ट की माझा अर्ज न वाचताच, कार्यालयाकडून मला जाणेपूर्वी एक दिवस अगोदर सुटी मंजुरीचा


आदेश मिळाला. तो मिळाला नसता तर मी भरलेली रक्कम परत मिळाली नसती परंतु माझे व माझ्या कुटुंबावर निराशेची छाया पसरली असती. परंतु माझी बाबा-वरची दृढ श्रद्धा व त्यांची प्रेरणा म्हणुन मी या दिव्यातून पार पडलो. अशा प्रकारे माझी व माझे कुटुंबाचे ईच्छेचा एक टप्पा पूर्ण झाला.

आमची जवळ जवळ २५ दिवस यात्रा (दक्षिण भारताची) सुखरुप, मुलंबाळं आजारी न पडता–दगदग व बदलणारे हवापाणी यातून पार पाडली. मोटारीत सोबत चांगली मिळाली. नागपूरवरून निघून पुन्हा नागपूरला परत येई पावेतो आम्हाला आमचे प्रवासाचे दिवस किती लौकर गेलेत याचे भानच राहिले नाही. यामुळे मानसीक उत्साह वाढून हिंमत आली. प्रवासाचे व पैश्याचे चीज झाल्यासारखे वाटले.

ही त्यांचीच इच्छा व प्रेरणा कि, ज्यांनी प्रत्येक वेळेस माझ्याकडून न कळत कार्य करून, माझी व माझे कुटुंबाची इच्छा इतक्या वर्षांनी फळाला आणली.

अशीच ते सदोदित माझी इच्छा पूर्ण करतील असा मला विश्वास आहे. म्हणुनच मी अशा प्रसंगाला म्हणतो कि,

**“ आले साईजीचे मना – तेथे कोणाचे चालेना ”**



श्रीसाईभक्त मंडळ, ग्वाल्हेर येथील मंदिरात श्रीबाबांच्या मूर्तीचा अनावरण समारंभ
२९-९-७९ रोजी करण्यात आला त्या प्रसंगीचे दृश्य

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १६–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–५० |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ८–०० |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–३० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–८० |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–३० |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–२५ |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ५–०० |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | ३–०० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | ४–५० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | १–२५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–५० |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) | बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) सदानंद चेंदवणकर | १–०० |
| (२४) | साई किर्तनमाला, (मराठी) | १–२५ |
| (२५) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२६) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२७) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२८) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२९) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ५–०० |
| | ( व्ही. पी. पद्धत नाही. ) प्रत्येक प्रत | ०–६० |